CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १९० | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



सामाजिक जीवनामध्ये एकता आणि एकात्मता साकार करण्यासाठी प्रत्येक लहान-मोठ्या गटांमध्ये सर्वमान्य, विश्वासपात्र आणि निष्पक्ष अशा व्यक्तींची गरज भासते. आपल्या येथे पुरातनकाळी प्रचलित असलेल्या पंचमुखी परमेश्वराच्या संकल्पनेचा हाच आधार आहे.

**- भारतरत्न**
**स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

## आज ज्येष्ठा गौरी विसर्जन



# धर्म ही व्यक्ती-समाजाला जोडणारी शिस्त : सरसंघचालक

## सेवाज्ञ संस्थानमच्या 'युवा धर्म संसद-२०२६'चे उद्घाटन

**उज्जैन, १८ सप्टेंबर**

धर्माला केवळ 'रिलिजन' या अर्थाने समजणे योग्य नाही. 'धर्म' या शब्दाचा संबंध 'धृ' या धातूशी आहे. ज्याचा अर्थ 'धारण करणे' असा आहे. धर्म ही एक अशी शिस्त आहे जी व्यक्ती आणि समाजाला एकत्र आणते, त्यांना विघटनापासून रोखते आणि त्यांना निरंतर प्रगतीकडे नेते. धर्म म्हणजे जीवनापासून दूर जाणे किंवा सर्व काही सोडून देणे नव्हे; उलट, तो भौतिक जीवनासोबत आध्यात्मिक प्रगती आणि सामाजिक दायित्व यांचा समतोल साधण्याचा एक दृष्टिकोन आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी धर्म आणि 'रिलिजन' यांमधील फरक स्पष्ट करताना केले.

सेवाज्ञ संस्थानमचा राष्ट्रीय उपक्रम, 'युवा धर्म संसद-२०२६ अवंतिका'चा शुभारंभ उज्जैन येथील गीता भवन येथे करण्यात आला. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी युवा धर्म संसद अवंतिकाचे औपचारिक उद्घाटन केले. यावेळी सेवाज्ञ संस्थानमचे संरक्षक पूज्य आचार्य मिथिलेशनंदिनीशरण महाराज, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी आणि



सेवाज्ञ संस्थानमचे राष्ट्रीय अध्यक्ष आशीष कुमार आशु यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

उपस्थितांना संबोधित करताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, धर्म केवळ वृद्धापकाळ किंवा धार्मिक विधींपुरता मर्यादित नसतो. धर्माची संकल्पना तरुणपणापासून सुरू झाली पाहिजे. धर्म हा व्यक्तीच्या आचरणाला आणि निर्णयांना जीवनाच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत मार्गदर्शन करतो. सुख-दुःखे येतात आणि जातात, पण धर्म शाश्वत राहतो आणि तो व्यक्तीचे कर्तव्य, आचरण आणि जबाबदारी निश्चित करतो.

निसर्गतः अत्यंत मर्यादित क्षमता असलेला प्राणी असूनही, मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर सृष्टी निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सरसंघचालकांनी तरुणांना कठोर परिश्रम आणि आर्थिक प्रगतीसोबतच सामाजिक जबाबदारी स्वीकारण्यास प्रोत्साहित केले. स्वतःच्या गरजा पूर्ण करताना मानवाने इतरांच्या कल्याणाचा आणि हिताचाही विचार केला पाहिजे यावर त्यांनी जोर दिला.

तरुणांनी वैयक्तिक यशाला व्यापक सामाजिक यशाशी जोडण्याचे आवाहन करताना ते म्हणाले की, एखाद्या व्यक्तीचा विजय तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा त्यात इतरांच्या विजयाचाही समावेश असतो. ज्ञान, दान आणि दुर्बलांच्या संरक्षणाच्या भावनेने पुढे जाण्याचा संदेश तरुणांना देण्यात आला. याव्यतिरिक्त, आपल्या श्रद्धेवर आणि परंपरेवर ठाम राहून उपासनेच्या इतर प्रकारांबद्दल आदर राखणे हा भारतीय जीवन-दर्शनाचा एक महत्त्वाचा पैलू असल्याचे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

सेवाज्ञ संस्थानमच्या आश्रयाखाली आयोजित युवा धर्म संसदेची ही सहावी आवृत्ती आहे. यापूर्वी काशी, अयोध्या, मथुरा, हरिद्वार आणि कांचीपुरम येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. आपल्या स्वागतपर भाषणात, आचार्य मिथिलेशनंदिनीशरण महाराज यांनी उपस्थित तरुणांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, भारतीय तरुणांनी केवळ तरुण असण्यापुरते स्वतःला मर्यादित न ठेवता, स्वतःच्या विकासातून भारताला ओळखले पाहिजे. प्रा. श्रीनिवास वरखेडी यांनी तरुणांना भारताच्या ज्ञान परंपरेशी आणि आत्म-साक्षात्काराशी जोडून घेण्याचे आवाहन केले. (वृत्तसंस्था)

### २५ राज्यांमधील १,६०० तरुणांचा सहभाग

'युवा धर्म संसद'मध्ये देशभरातील २५ राज्यांमधील सुमारे १,६०० तरुण, तसेच ३०० पेक्षा जास्त शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, संशोधक, विद्वान आणि धार्मिक नेते सहभागी झाले आहेत. ते धर्म, संस्कृती, शिक्षण, तंत्रज्ञान, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रउभारणी यांसारख्या विषयांवर संवाद साधत आहेत.

# जी-२० देशांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्था सुसाट

- जागतिक रेटिंग संस्था मूडीजने केली स्तुती
- चालू आर्थिक वर्षात विकासदर ७ टक्के राहणार
- मध्यपूर्वेतील संकट, एल निनोमुळे महागाईचा धोका



**नवी दिल्ली, १८ सप्टेंबर,**

मध्यपूर्वेतील संघर्षाची परिस्थिती, जागतिक भूराजकीय बदल आणि कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला असतानाही भारताची अर्थव्यवस्था जी-२० देशांच्या तुलनेत अधिक बळकट आणि सुसाट असल्याचे निरीक्षण जागतिक रेटिंग संस्था मूडीजने नोंदवले आहे. २०२६-२७ चालू आर्थिक वर्षात भारताचा विकासदर (जीडीपी) सात टक्क्यापर्यंत राहणार असून, ही वाढ जी-२० देशांच्या तुलनेत अधिक असल्याचा अंदाज मूडीजने शुक्रवारी जारी केलेल्या अहवालातून व्यक्त केला आहे. त्याचवेळी मध्यपूर्वेतील संकट आणि एल निनोमुळे महागाईचा धोका अधिक राहणार असल्याचे नमूद करण्यात आले.

यापूर्वीच्या अहवालात मूडीजने चालू आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी ६ टक्क्यापर्यंत राहणार असल्याचा अंदाज वर्तवला होता. नव्या अंदाजात त्यांनी जीडीपीत एक टक्क्याची वाढ नोंदवली. मजबूत देशांतर्गत खप, पायाभूत सुविधांवरील सरकारी खर्च, खासगी गुंतवणुकीत सुधारणा होण्याची चिन्हे आणि सेवा क्षेत्राची सातत्यपूर्ण मजबुती यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची गती कायम असल्याचे मूडीजने म्हटले आहे. विशेष असे की, मूडीजचा जीडीपीसंदर्भातील अंदाज सर्व जी-२० अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक आहे. मूडीजचा अंदाज चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट जीडीपीच्या ४.३ टक्क्यांपर्यंत कमी करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचे द्योतक आहे, जी आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ४.४ टक्के होती. आर्थिक वर्ष २०२७ साठीचा हा ७ टक्के जीडीपी वाढीचा अंदाज रिझर्व्ह बँकेने वर्तवलेल्या ६.७ टक्के, एस अँड पी ग्लोबल रेटिंग्सने वर्तवलेल्या ६.६ टक्के आणि फिच रेटिंग्सने वर्तवलेल्या ६.४ टक्क्यांच्या अंदाजापेक्षा अधिक आहे. एल निनो संबंधित व्यत्ययांमुळे अन्नधान्याच्या किमतींवर दबाव वाढू शकतो, ज्यामुळे खाजगी उपभोग आणि आर्थिक घडामोडींवर परिणाम होईल, असा इशारा मूडीजने दिला आहे.

**परकीय चलन साठा मजबूत**

मध्यपूर्वेतील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमती लक्षणीयरीत्या वाढल्या, ज्यामुळे चलनवाढीची भीती वाढली. युद्धापूर्वी प्रतिबॅरल सुमारे ७३ डॉलर असलेल्या कच्च्या तेलाच्या किमती या महिन्यात १०० डॉलर प्रतिबॅरलपेक्षा जास्त वाढल्या आहेत. मात्र, इतर देशांना परकीय चलनाच्या तुटवड्याची भीती सतावत असताना भारताची स्थिती मजबूत असल्याचे मूडीजने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### भारताचे रेटिंग 'बीएए-३' वर कायम

केंद्र सरकारने आर्थिक वर्ष २०२७ साठी १६.०९ लाख कोटी रुपयांचे एकूण कर्ज घेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. मागील कर्जांच्या परतफेडीची दखल घेत मूडीजने भारताचे रेटिंग 'बीएए-३' वर कायम ठेवले आहे. या महिन्याच्या सुरुवातीला, जपानची पत मानांकन संस्था जेसीआरने आर्थिक वाढ आणि मजबूत वित्तीय प्रणालीचा हवाला देत, भारताचे सार्वभौम मानांकन 'ए' केले होते.

## महत्त्वाचे

### सेन्सेक्समध्ये किरकोळ घसरण

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी संमिश्र व्यवहार पाहायला मिळाले. आठवड्याच्या शेवटच्या व्यवहारात दोन्ही प्रमुख निर्देशांक परस्परविरोधी दिशांना बंद झाले. नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी वाढीसह बंद झाला, तर बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या सेन्सेक्सने किरकोळ घसरण नोंदवली. दिवसभरातील चढ-उतारानंतर मेटल, मीडिया आणि बँकिंग क्षेत्रातील खरेदीमुळे निफ्टीला बळ मिळाले, तर आयटी आणि एफएमसीजी क्षेत्रातील दबावामुळे सेन्सेक्स मंदावला. व्यवहार अखेर निफ्टी ७५ अंकांनी उंचावून २३,३४६ च्या पातळीवर स्थिरावला. निफ्टीने दिवसाच्या नीचांकी स्तरावरून उत्तम पुनर्प्राप्ती दर्शवली. दुसऱ्या बाजूला, बीएसई सेन्सेक्स १९ अंकांनी घसरून ७४,२९४ वर बंद झाला. बाजारात क्षेत्रनिहाय मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या, ज्यात काही क्षेत्रांनी बाजाराला सावरले तर काहींनी निर्देशांकावर दबाव आणला. निफ्टी मेटल इंडेक्स १.५१ टक्क्यांच्या उल्लेखनीय वाढीसह १३,०५३ वर बंद झाला.

### नफ्यासाठी खासगी विद्यापीठे चालवता येणार नाही

**नवी दिल्ली, १८ सप्टेंबर**

केवळ नफा कमावण्यासाठी खाजगी विद्यापीठे चालवता येणार नाहीत. त्यांचा उद्देश शिक्षणाशी संबंधित सार्वजनिक ध्येय पूर्ण करणे हा असला पाहिजे. या संस्थांना नफा देणाऱ्या व्यवसायाप्रमाणे चालवण्याची परवानगी देता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले. पुढील सुनावणी १९ नोव्हेंबरला होणार आहे. न्या. अहसानुद्दीन अमानुल्लाह आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या न्यायासनाने राज्ये आणि सहा केंद्रशासित प्रदेशांना आठवड्यांत विद्यापीठांची लेखापरीक्षित खाती सादर करण्यास सांगितले आहे. या खात्यांमध्ये अतिरिक्त उत्पन्न, खर्च, शुल्कवसुली आणि कर्मचाऱ्यांचे वेतन यांची माहिती द्यावी लागेल. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना प्रवेश, भरती आणि शिक्षणाच्या स्तराशी संबंधित माहितीही द्यावी लागेल. हा आदेश एमिटी विद्यापीठाशी संबंधित प्रकरणात देण्यात आला आहे.

# विधि विद्यापीठ कुलगुरुपदी डॉ. ज्योती भाकरे

**नागपूर/पुणे, १८ सप्टेंबर**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी प्रभारी कुलसचिव आणि विद्यापीठातील विधि अभ्यासक्रमाच्या प्राध्यापिका डॉ. ज्योती भाकरे यांची नागपूर येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठाच्या (एमएनएलयू) कुलगुरुपदी निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी नागपूरचे कुलपती अतुल चांदूरकर यांनी डॉ. ज्योती भाकरे यांची कुलगुरुपदी निवड झाली असल्याचे



जाहीर केले असून, याबाबतचे पत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसेच विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. दीपक भागवत यांनी नियुक्ती परिपत्रक जाहीर केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. डॉ. भाकरे पाच वर्षे कुलगुरू म्हणून राहणार आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विधि विभागप्रमुखांनी कुलगुरू म्हणून काम करण्याची परंपरा मी पुढे घेऊन जात आहे. माझ्या एकूण वाटचालीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे योगदान खूप मोठे आहे, असे डॉ. ज्योती भाकरे म्हणाल्या. (तभा वृत्तसेवा)

# तृणमूलच्या दोन्ही गटांना निवडणूक चिन्हे बहाल

## ममता बॅनर्जी गटाला 'फुटबॉलपटू' तर बंडखोर गटाला 'लिफाफा'

**नवी दिल्ली, १८ सप्टेंबर**

तृणमूल काँग्रेसमध्ये बंडखोरीनंतर निर्माण झालेल्या पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हाच्या वादावर निवडणूक आयोगाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. आयोगाने ममता बॅनर्जी गट व ऋतब्रता बॅनर्जी गटाला पक्षाचे नवीन नाव आणि चिन्ह बहाल केले आहे. विशेष म्हणजे, गुरुवारी या वादावर सुनावणी झाल्यानंतर निवडणूक आयोगाने तृणमूलचे नाव आणि चिन्ह गोठवले होते.





आयोगाने ममता बॅनर्जी यांनी सुचवलेल्या तीन नावांच्या आधारे पक्षाला 'ऑल इंडिया तृणमूल ममता काँग्रेस', असे नाव आणि 'फुटबॉलपटू' निवडणूक चिन्ह दिले आहे. तर ऋतब्रता बॅनर्जींच्या बंडखोर गटाला 'डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस' या नावासह 'लिफाफा' हे चिन्ह देण्यात आले आहे. ऋतब्रता गटानेही आयोगाला दोन नावे सुचवली होती. हा निर्णय पश्चिम बंगालमधील दोन विधानसभा मतदारसंघात सहा ऑक्टोबरला होणाऱ्या पोटनिवडणुकांच्या पृष्ठभूमीवर घेण्यात आला आहे. आता दोन्ही गटाला पक्षाचे मूळ नाव आणि निवडणूक चिन्ह वापता येणार नाही.

**अंतिम निर्णय होईपर्यंत ही व्यवस्था**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाने दोन्ही गटांना शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत तीन पसंतीची तात्पुरती नावे आणि मुक्त निवडणूक चिन्हांच्या यादीतील तीन पर्याय सादर करण्याचा निर्देश दिला. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानी नौदलाचे वर्तन अत्यंत बेजबाबदार

**नवी दिल्ली, १८ सप्टेंबर**

अरबी समुद्रात आयएनएस कोलकाता या युद्धनौकेला धडक देण्याची पाकिस्तानी नौदलाची कृती अत्यंत बेजबाबदार आणि चिथावणीखोर होती असा पलटवार करत भारताने पाकिस्तानने केलेले आरोप फेटाळून लावले.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी पत्रपरिषदेत पाकिस्तानी नौदलाच्या कृतीचा निषेध करत म्हटले की, भारतीय नौदलाची युद्धनौका आयएनएस कोलकाता, उत्तर अरबी समुद्रात नियमित निगराणी मोहिमेवर असताना पाकिस्तानी नौदलाचे जहाज पीएनएस हुनैन भारतीय युद्धनौकेच्या अगदी जवळ आले आणि अत्यंत अव्यावसायिक व अस्वीकार्य पद्धतीने वागले, ज्यामुळे ही टक्कर झाली. भारताने पाकिस्तानच्या प्रतिसादाचा आढावा घेतला आहे आणि त्यात त्यांच्या सबबी आणि टाळाटाळीच्या पूर्वीच्या पद्धतीचे प्रतिबिंब दिसते. पाकिस्तानने केलेले हे सर्व आरोप आणि सूचक विधाने भारत पूर्णपणे नाकारतो. त्यांनी परस्पर करारांचा आदर करणे शिकले पाहिजे. ही कृती एप्रिल १९९१ च्या भारत-पाकिस्तान द्विपक्षीय कराराच्या कलम १० चे गंभीर उल्लंघन आहे. पाकिस्तानी नौदलाने समुद्रातील टक्कर टाळण्यासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन केले आहे. लाल समुद्रातील सुरक्षेवर चिंता

लाल समुद्रातील जलमार्गात बिघडलेल्या सुरक्षा परिस्थितीबद्दल तीव्र चिंता व्यक्त करताना जयस्वाल म्हणाले, भारत सौदी अरबचा सार्वभौम भूभाग, नागरिक आणि आर्थिक मालमत्तेवरील हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध करतो. मक्का या पवित्र शहरावरील हल्ले प्रादेशिक शांतता आणि सुरक्षेला धोका निर्माण करतात आणि बाब अल-मंदेब जलमार्गातून जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीला धोका निर्माण करतात. या प्रदेशात शांतता व स्थैर्य लवकरात लवकर परत येईल अशी आशा आम्ही व्यक्त करतो. (वृत्तसंस्था)

# ऑस्करसाठी मराठी चित्रपट 'गोंधळ'ची एंट्री

**नवी दिल्ली, १८ सप्टेंबर**

यंदाच्या ९९ व्या अकादमी पुरस्कारांसाठी (ऑस्कर २०२७) 'गोंधळ' या मराठी चित्रपटाची भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड झाली आहे. याबाबतची घोषणा फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने (एफएफआय) शुक्रवारी केली. मराठी लोकपरंपरेवर आधारित असलेला हा 'थ्रिलर' चित्रपट ऑस्करसाठी 'सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट' या श्रेणीत सादर केला जाईल.

यावर्षी ऑस्करच्या दावेदारीसाठी देशभरातील विविध भाषांमधून एकूण ३३ चित्रपट एफएफआयकडे पाठवण्यात आले होते. यात सर्वाधिक १४ चित्रपट हिंदी भाषेतील होते. याशिवाय मराठी, तेलुगू आणि गुजराती भाषांमधून प्रत्येकी चार चित्रपट, तमिळमधून तीन, तर मल्याळम् आणि नागामी भाषांमधून प्रत्येकी एका चित्रपटाचा समावेश होता. हिंदी आणि इतर प्रादेशिक भाषांमध्ये जोरदार स्पर्धा सुरू असताना 'गोंधळ' या मराठी चित्रपटाने बाजी मारली.

## फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने केली घोषणा



दोन तासांच्या रनटाईमचा हा मराठी चित्रपट ग्रामीण महाराष्ट्रातील लोकपरंपरा आणि धार्मिक विधी 'गोंधळ' यावर आधारित एक मानसशास्त्रीय 'थ्रिलर' आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन संतोष डावखर यांनी केले आहे. चित्रपटाची कथा नवविवाहित जोडपे आनंद आणि सुमन यांच्या घरी आयोजित करण्यात आलेल्या रात्रभर चालणाऱ्या गोंधळ विधीभोवती फिरते. पूजाअर्चा आणि उत्सवादरम्यान गावकऱ्यांमधील दडलेले जुने वाद, वैयक्तिक वैर आणि राजकीय तणाव उफाळून येऊ लागतात. गावच्या पाटलाचा मुलगा सरजेराव, सुमनशी लग्न होऊ न शकल्यामुळे नाराज होता. त्यामुळे तो हे लग्न स्वीकारू शकत नाही आणि हळूहळू हा पवित्र विधी क्राईम आणि सस्पेन्स ड्रामामध्ये बदलतो. चित्रपटात किशोर कदम, इशिता देशमुख, योगेश सोहणी, निषाद भोईर आणि सुरेश विश्वकर्मा यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. (वृत्तसंस्था)

### प्रवेशिकांच्या सखोल परीक्षणानंतर निवड

चित्रपटाच्या निवडीसाठी फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने एका विशेष ज्युरीची स्थापना केली होती. या ज्युरी पॅनेलमध्ये पी. शेषाद्री, विजय पाटकर, हितू कनोडिया, शांती कुमार, संदीप पराशर, संजय पाटील, साबू जोसेफ, अनिल थॉमस, विवेक वासवानी, बिजॉन दासगुप्ता, हासन, वासन आणि तनिष्ठा चटर्जी यांसारख्या दिग्गजांचा समावेश होता. ज्युरी सदस्यांनी सर्व प्रवेशिकांचे सखोल परीक्षण केल्यानंतर या मराठी 'थ्रिलर'ची ऑस्करसाठी निवड केली.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# आदर्श ग्रामसेवक पुरस्कार निवड समितीतून मुख्य कार्यकारी अधिकारी वगळले

## प्रशासकीय प्रक्रियेत मोठा बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ सप्टेंबर-**

जिल्हास्तरावर दिल्या जाणाऱ्या आदर्श ग्रामसेवक पुरस्काराच्या निवड प्रक्रियेत महत्त्वाचा प्रशासकीय बदल करण्यात आला आहे. संबंधित जिल्हा परिषदेला पुरस्काराचे वाटप आणि निवड प्रक्रियेशी संबंधित जबाबदाऱ्या असल्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारीच निवड समितीत सहभागी राहिल्यास मूल्यांकन प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते, यापार्श्वभूमीवर शासनाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा समितीतील समावेश वगळण्याचा निर्णय घेतला आहे.

यासंदर्भात शासनाने यापूर्वी जलसंधारण तसेच ग्रामविकास विभागामार्फत काढलेल्या शासन निर्णयांचा संदर्भ घेतला आहे. आदर्श ग्रामसेवक पुरस्कारासाठी पात्र उमेदवारांची निवड करताना वस्तुनिष्ठ आणि निष्पक्ष पद्धतीने कामकाजाचे मूल्यमापन होणे आवश्यक असल्याचे शासनाच्या निर्णयातून स्पष्ट होते.

जिल्हास्तरावरील पुरस्कार निवड प्रक्रियेत जिल्हा परिषदेची महत्त्वाची भूमिका असते. पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविणे, पात्रतेची पडताळणी, कामगिरीचे मूल्यांकन आणि अंतिम निवड या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध निर्माण होऊ नये, यासाठी समितीच्या रचनेत बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे आदर्श ग्रामसेवक पुरस्काराच्या निवड प्रक्रियेत प्रशासकीय भूमिकांचे विभाजन होणार असून, मूल्यांकन करताना अधिक वस्तुनिष्ठता राखण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेषतः ग्राम



स्तरावर उल्लेखनीय काम करणाऱ्या ग्राम सेवकांच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन होणे आणि पात्र व्यक्तीला पुरस्कार मिळणे, हा या बदलामागील प्रमुख प्रशासकीय उद्देश मानला जात आहे. शासन निर्णयानुसार संबंधित विभागांनी सुधारित समिती रचनेनुसार पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्यामुळे आगामी काळातील आदर्श ग्रामसेवक पुरस्काराच्या निवड प्रक्रियेकडे ग्रामविकास विभागासह ग्राम सेवकांचे लक्ष लागले आहे.

## सज्जन कुमार यांच्या दुःखवटा प्रस्ताव प्रकरणी चौकशीची मागणी

**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या सभेत १९८४ मधील शीखविरोधी दंगलीतील दोषी ठरलेले माजी खासदार सज्जन कुमार यांच्या निधनाबाबत दुःखवटा प्रस्ताव मांडून सभेला अपूर्ण व चुकीची माहिती देऊन दिशाभूल केल्याचा आरोप महापालिका कामगार कल्याण समिती सभापती श्रद्धा पवार यांनी केला आहे. सज्जन कुमार यांच्यावर १९८४च्या शीखविरोधी दंगलीसंदर्भात न्यायालयीन कारवाई होऊन त्यांना शिक्षा झाली होती. अशी पार्श्वभूमी असताना त्यांच्या निधनाबाबत दुःखवटा प्रस्ताव मांडणे गंभीर बाब चुकीच्या माहितीच्या आधारे मंजूर झालेला प्रस्ताव इतिवृत्तातून रद्द करावा, दिशाभूल करणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचारी किंवा घटकांची चौकशी करून कारवाई करावी आणि चौकशी अहवाल सार्वजनिक करावा, अशा तीन मागण्या पवार यांनी केल्या आहेत.

## महत्वाचे...





## प्रबोधनकार ठाकरे यांना शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळात केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक मल्लिकार्जुन हिरेमठ, लेखापाल महेश वालावलकर, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, सुरेश कासार, निलोफर सय्यद, तरंगिणी कोंडा, सुवर्णा गुरुव, अविनाश शिंदे, रियाज अतार, अबरार डोंगरी, अमित लांबतुरे, प्रशांत साठे, भालचंद्र साखरे, सायली ढोले, सचिन साखरे उपस्थित होते.



## 'लोकसंवाद २०२६'चा आजोबा गणपती येथून शुभारंभ

**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

माहिती व जनसंपर्क विभागांतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाने सुरू केलेल्या 'लोकसंवाद २०२६' (१६ ते २४ सप्टेंबर २०२६) या उपक्रमाचा शुभारंभ शहरातील सर्वात जुना आणि मानाचा आजोबा गणपती सार्वजनिक गणेश मंडळ येथून करण्यात आला. याप्रसंगी सोलापूर महानगरपालिकेचे पीएम स्वनिधी योजना समन्वयक समीर मुलानी यांनी पथविक्रेत्यांना योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या योजनेद्वारे व्यवसाय वाढीसाठी टप्प्याटप्प्याने १५ हजार, २५ हजार आणि ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून दिले जाते. नियमित परतफेड करणाऱ्यांना पुढील कर्जासाठी पात्रता मिळते, तसेच ३० हजार रुपयांपर्यंत युपीआय लिंक्ड रुपे क्रेडिट कार्ड सुविधाही उपलब्ध आहे. पारदर्शकतेसाठी पथविक्रेत्यांनी डिजिटल व्यवहारांचा वापर करावा, असे सांगत मुलानी यांनी प्रधानमंत्री घरकुल योजना व एकल महिला योजनांचीही माहिती दिली. कार्यक्रमाला जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, मंडळाचे केदार वनारोटे, गंगाधर गवसणे, जगदीश किनीकर व सातलिंगप्पा शेट्टी उपस्थित होते. सूत्रसंचालन मिलिंद भिंगारे यांनी केले.

## विद्युत डीपीचा दरवाजा सताड उघडा ठेवल्याने जीविताला धोका

**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

नवी पेठ येथील महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या आवारातील कंपाउंडलगत असलेल्या विद्युत डीपीचा दरवाजा सताड उघडा असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. डीपीखाली ठिणग्या पडत असल्याचेही निदर्शनास येत असून संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी महावितरणने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.



**महावितरणच्या दुर्लक्षामुळे नवी पेठेत सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या आवारात अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांची दररोज मोठी वर्दळ असते. अशा वर्दळीच्या ठिकाणी विद्युत डीपीचा दरवाजा उघडा राहणे धोकादायक ठरू शकते. विशेषतः लहान मुले अथवा नागरिक अनावधानाने डीपीजवळ गेल्यास गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकाराकडे महावितरणच्या संबंधित कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. डीपीचा दरवाजा सुरक्षितपणे बंद करून परिसराची तातडीने तपासणी करावी. ठिणग्या पडत असल्यास बिघाड दूर करून संभाव्य धोका टाळावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. नेहमीच येथील डीपीचा दरवाजा उघडा ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## बाप्पा डॉट ओआरजीवर गणेशोत्सवाच्या आठवणी अपलोड करा; जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, गृहनिर्माण संस्था, ग्रामपंचायती आणि नागरिकांनी 'बाप्पा डॉट ओआरजी' या डिजिटल चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे. परिसरातील वैशिष्ट्यपूर्ण कथा, परंपरा, पाककृती, आरत्या आणि छायाचित्रे या संकेतस्थळावर अपलोड करून आपला सांस्कृतिक वारसा जगासमोर मांडण्याचे त्यांनी आवाहन केले. सोलापूरचा वारसा जागतिक पटलावर या उपक्रमामुळे सोलापूर जिल्ह्यातील गणेशोत्सवाची वैशिष्ट्ये, स्थानिक सजावट, मूर्तिकला आणि खाद्यसंस्कृती देश-विदेशात पोहोचणार आहे. यामुळे स्थानिक कलाकारांना मोठी ओळख मिळेल आणि जिल्ह्यातील सांस्कृतिक व आध्यात्मिक पर्यटनाला गती येईल.सहभाग नोंदवा आणि मिळवा प्रमाणपत्र! या अभियानात माहिती व आठवणी नोंदवणाऱ्या नागरिकांना शासनातर्फे डिजिटल कल्चरल प्रिजर्वर प्रम णपत्र देऊन गौरविण्यात येईल. नागरिकांनी संकेतस्थळाला भेट देऊन 'तुमची कथा सांगा' या पर्यायातून आपली माहिती भरावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



## साने गुरुजीपासून सोनकवडे पर्यंतच्या शिक्षकांनीच महाराष्ट्र घडविला : हेरंब कुलकर्णी

### सोनकवडे गुरुजी प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

सानेगुरुजीपासुन सोनकवडें गुरूजीपर्यंत या देशात घडून गेलेल्या लोकशिक्षकांनीच विद्यार्थी घडविण्याबरोबर महाराष्ट्र घडविला आहे, असे प्रतिपादन जेष्ठ शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी केले. गुरुवारी सोनकवडे गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने येथील डॉ. किर्लोस्कर सभागृहात आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी सांगोल्याचे माजी नगराध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके होते.

यावेळी मंचावर जेष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड, प्रतिष्ठानचे अध्यक्ष लक्ष्मीदास सोनकवड़े, नागनाथ सोनकवड़े, सचिदानंद व्हटकर, बी. टी. म्हेत्रे, दत्ता थोरे, चन्नवीर भद्रेश्वरमठ आदी प्रमुख मान्यवर होते. प्रारंभी हरिभाई देवकरण प्रशालेचे निवृत्त शिक्षक श्रीमंत कांबळे यांना सावित्री ज्योति गुरु गौरव पुरस्कार तर संगीता जाधव (मनपा शाळा क्र. २, सोलापूर), गौरीशंकर नारायणे (मनपा शाळा क्र. २८, सोलापूर), किरण बाबर (जि. प. प्राथमिक शाळा, अर्जुनसोंड, ता. मोहोळ), प्रीती साबणे (जि. प. शाळा, तीर्थ, ता. दक्षिण सोलापूर), शकीला शेख (अंगणवाडी, होटगी, ता. दक्षिण सोलापूर), सरिता माळवदकर (अंगणवाडी, दोड्डी, ता. दक्षिण सोलापूर) आणि शीला हावळे (गोपाबाई रामकिसन बलवदा हायस्कूल, देगाव) यांना रोख पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. दत्ता थोरे यांनी प्रस्ताविक केले. तर यावेळी संगीता जाधव, गौरीशंकर नारायणे आणि शिला हावळे यांनी पुरस्कारानंतर मनोगत केले. चन्नवीर भद्रेश्वरमठ यांनी आभार मानले.

## सिध्देश्वर पॉलिटेक्निकमध्ये अभियंता दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

येथील श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये अभियंता दिन' आणि कै. अप्पासाहेब काडादी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या निमित्ताने महाविद्यालयातील विविध अभियांत्रिकी विभागांच्या वतीने विद्यार्थिनींसाठी विविध तांत्रिक आणि शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन साजरा केला जातो. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन विद्यार्थिनींमध्ये तांत्रिक ज्ञान, नाविन्यपूर्ण विचार आणि अभियांत्रिकी कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने या स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच, कै. अप्पासाहेब काडादी यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत त्यांना आदरांजली वाहण्यात आली. स्पर्धात्मक परीक्षांवर भर कार्यक्रम ला प्रमुख पाहुण्या म्हणून सायली जांभूळकर उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थिनींनी स्पर्धा परीक्षांकडे गांभीर्याने पहावे, उच्च ध्येय निश्चित करून ते पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. संस्थेच्या गव्हर्निंग बॉडीचे सदस्य आर. एस. पाटील यांनी कै. अप्पासाहेब काडादी यांच्या दूरदृष्टीचा आणि संस्थेच्या प्रगतीमधील त्यांच्या योगदानाचा उल्लेख केला. प्राचार्य प्रा. गजानन धरणे यांनी विद्यार्थिनींना तांत्रिक शिक्षणासोबतच व्यावहारिक कौशल्ये आणि स्पर्धात्मक दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी गव्हर्निंग बॉडीच्या सदस्या डॉ. नीता आळंगे व श्रेयस आळंद उपस्थित होते.

## राज्यस्तरीय चालकरत्न सन्मान सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

चालक दिनानिमित्त वाहतूक संघटना संयुक्त महासंघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेला राज्यस्तरीय चालकरत्न सन्मान सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी आसीफ मुलानी साहेब, मोटार वाहन निरीक्षक गिरी साहेब, झगडे साहेब, गटनेत्या वहिदा शेख आपा, नगरसेवक अड्डेवाले, जुबेर बागवान साहेब, मतीन बागवान साहेब, अप्पा लंगोट, सलाहुद्दीन शेख, जमीर भाई शेख यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.





यावेळी वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांनी महासंघाच्या माध्यमातून चालक बांधवांसाठी करण्यात येणाऱ्या विविध कामांची माहिती दिली.

तसेच चालकांच्या विविध समस्या, प्रलंबित प्रश्न आणि त्यांच्या हक्कांसाठी महासंघाच्या वतीने सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती उपस्थित मान्यवरांसमोर मांडली. या सोहळ्यात महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या चालक बांधवांचा 'चालकरत्न' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला चालक बांधव, महासंघाचे पदाधिकारी, विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक उपस्थित होते.

## झाडाला गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**सोलापूर :** अज्ञात कारणावरून एका २८ वर्षीय तरुणाने वडाच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना होटगी रोडवरील साई बाबा मंदिर जवळील बागेत आज शुक्रवारी सकाळी नऊ वाजता उघडकीस आली. केरप्पा बालप्पा कांबळे (वय २८ वर्ष, रा. होटगी) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. आज शुक्रवारी सकाळी केरप्पा याचा मृतदेह वडाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. नातेवाईकांच्या साह्याने गळफास सोडवून त्याचा मृतदेह भाऊ सिद्धाराम याने येथील शासकीय रुग्णालयात दुपारी दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.



## सेवा संकल्पनेतून रक्तदान शिबिराचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा संकल्पनेतून' सुनील नगर येथील जय भवानी मित्र मंडळ संचलित वरदविनायक मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. म हापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी मंडळाच्या वतीने दीपोत्सवाचेही आयोजन करण्यात आले असून, आवश्यक दिव्यांचे वाटप महापौरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राजू चलमेटी, रमेश चक्राल, नरेश कोतम, राकेश चक्राल, प्रवीण बोड्डू उपस्थित होते.

## मराठवाडा मुक्ती दिन साजरा

**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर -**

मराठवाडा मित्र मंडळाच्या वतीने मराठवाडा मुक्ती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन विवेक पाटील यांच्या निवासस्थानी करण्यात आले. प्रास्ताविक सुनील व्हसाळे यांनी केले. यावेळी पांडुरंग चौधरी, ठोंबरे आणि विश्वजीत माणिक्षेट्टी यांनी आपले मनोगत व्यक्त करत मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या इतिहासावर प्रकाश टाकला. मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे व योगदानाचे स्मरण करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. स्वातंत्र्यसैनिकांच्या शौर्य, त्याग आणि देशभक्तीचा आदर्श आजच्या पिढीने जपावा, असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठवाडा मुक्तिसंग्राम ाच्या इतिहासाची आठवण करून देत सामाजिक एकोपा, देशप्रेम आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याचा गौरव करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास महावीर लाळे, सुग्रीव कलाकार यांच्यासह मराठवाडा मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात मानवी रांगोळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात मानवी रांगोळीच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्यात आला.

या उपक्रमात जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्यासह म हसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.



यावेळी सह आयुक्त नगरपालिका प्रशासन आशिष लोकरे, सहाय्यक महसूल अधिकारी परमेश्वर कांबळे, सहाय्यक महसूल अधिकारी विलास रणसुभे, महसूल सहाय्यक सम्राट कोळी, महसूल सहायक गंगाधर हाके, अविनाश स्वामी, श्रीकांत घुगे, शेखर सुरवसे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषी व्यवस्थेला उत्पादन वाढीसोबतच संसाधन संवर्धनाची आवश्यकता

पर्यावरणपूरक शेती ही केवळ रासायनिक निविष्ठांचा वापर कमी करण्याची पद्धत नसून कृषी व्यवस्थेकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे. तिच्या केंद्रस्थानी माती, पाणी, जैवविविधता, शेतकरी आणि भविष्यातील अन्नसुरक्षा हे पाच महत्त्वाचे घटक आहेत. आजच्या कृषी व्यवस्थेला उत्पादन वाढीसोबतच संसाधन संवर्धनाची आवश्यकता आहे. अभ्यासांमधून कृषी-अन्न प्रणालींच्या पर्यावरणीय, आरोग्यविषयक आणि सामाजिक परिणामांचा मोठा आर्थिक प्रभाव असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे शेतीचे यश केवळ उत्पादनाच्या टनांमध्ये मोजणे पुरेसे राहणार नाही; मातीचे आरोग्य, पाण्याची बचत, जैवविविधता, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि पर्यावरणीय स्थैर्य यांचाही विचार करावा लागेल.





### पर्यावरणपूरक शेती आणि अचूक कृषी तंत्रज्ञान

डिजिटल तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक शेती यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा ठरतो आहे.माती परीक्षण, हवामान अंदाज, GIS, remote sensing, ड्रोन, सेन्सर्स, स्वयंचलित सिंचन आणि डिजिटल कृषी सल्ला यांच्या मदतीने पाणी, खत आणि कीडनियंत्रणासाठी आवश्यक निविष्ठा अधिक अचूकपणे वापरता येऊ शकतात.

### पर्यावरणपूरक शेती आणि हवामान बदल

हवामान बदलामुळे कृषी क्षेत्रासमोर अनेक प्रकारचे धोके निर्माण होत आहेत. तापमानातील वाढ, पर्जन्यमानातील अनिश्चितता, अतिवृष्टी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि नवीन कीड-रोगांचा धोका यांचा कृषी उत्पादनावर परिणाम होतो. पर्यावरणपूरक शेती हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी आणि काही प्रमाणात त्यावरील कृषी क्षेत्राचा परिणाम कमी करण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. म्हणून हवामान-लवचिक शेतीमध्ये पुढील बाबींना प्राधान्य आवश्यक आहे :हवामान-सहनशील वाण + जलसंधारण + मृदा आरोग्य + पीक विविधीकरण + कृषिवनीकरण + अचूक कृषी तंत्रज्ञान + हवामान माहितीचा वापर.

### पर्यावरणपूरक शेतीचे आर्थिक परिणाम

पर्यावरणपूरक शेतीचा विचार केवळ पर्यावरणीय दृष्टिकोनातून करणे अपुरे आहे. शेतकऱ्यासाठी शेती आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य असणे अत्यावश्यक आहे. कृषी व अन्न संघटनेच्या २०२३ च्या The State of Food and griculture अहवालाने कृषी-अन्न प्रणालींच्या hidden costs कडे लक्ष वेधले आहे. या खर्चांमध्ये पर्यावरणीय, आरोग्यविषयक आणि सामाजिक परिणामांचा सम ावेश होतो, जे नेहमी बाजारातील अन्नाच्या किमतीत प्रतिबिंबित होत नाहीत. म्हणून शेतीच्या आर्थिक मूल्यांकनात केवळ एकूण उत्पादन ÷ बाजारभाव इतकाच विचार न करता, उत्पादन + संसाधन बचत + पर्यावरणीय लाभ उत्पादन खर्च पर्यावरणीय नुकसान या व्यापक दृष्टिकोनातून शेतीचे मूल्यम ापन करणे आवश्यक आहे.

### संक्रमण काळ

मृदा आरोग्य सुधारण्यास वेळ लागू शकतो. त्यामुळे काही पर्यावरणपूरक पद्धतींचे फायदे त्वरित दिसून न आल्यास शेतकऱ्यांचा विश्वास कमी होऊ शकतो. पर्यावरणपूरक पद्धतीने उत्पादित मालासाठी योग्य किंमत, प्रमाणन, स्वतंत्र बाजारपेठ आणि ग्राहकांचा विश्वास आवश्यक आहे. जैविक निविष्ठांच्या बाबतीत गुणवत्ता, प्रमाणिकता आणि शास्त्रीय शिफारस महत्त्वाची आहे.

**- डॉ. नितीनकुमार रणशूर**
**सहयोगी संशोधन संचालक**
**विभागीय कृषी संशोधन केंद्र, सोलापूर**
७८७५३१७६७३



राज्यातील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, औपचारिक निकषांची प्रतीक्षा न करता तत्काळ दुष्काळ जाहीर करण्यात यावा. गंभीर परिस्थिती असलेल्या तालुक्यांना तातडीने दुष्काळसदृश परिस्थितिग्रस्त घोषित करून दुष्काळी सवलती लागू करण्यात याव्यात.
**- शरद पवार**, अध्यक्ष, श प गट

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
शनिवार १९ सप्टेंबर २०२६ 



४० पैसे भरले तर जीव जाणार नाही. डिजिटल पेमेंट व्यवस्था कायम सरकारी अनुदानावर चालू शकत नाही. सरकारने खर्च करावा अशी अपेक्षा करण्याऐवजी सेवेचा वापर करणाऱ्यांनीच सेवेच्या खर्चात आपला वाटा उचलला पाहिजे.
**- अशोक कुमार लाहिरी**, उपाध्यक्ष, नीती आयोग

# अमेरिकेवर युद्धगुन्ह्याचा ठपका




**जीनिव्हा, १८ सप्टेंबर**

गेल्या आठ महिन्यांत अमेरिकेने इराणवर अनेक मोठे हल्ले केले. यात शेकडो लोक मारले गेले. त्यापैकी एक हल्ला फेब्रुवारीमध्ये एका इराणी शाळेवर झाला होता. यात विद्यार्थी आणि शिक्षक मारले गेले, हा हल्ला मानवतेला काळीमा फासणारा होता. इराणमध्ये झालेल्या बहुतांश हल्ल्यात मानवाधिकारांचे सर्रास उल्लंघन झाले असून, अमेरिकेला युद्ध गुन्हेगार घोषित करावे, अशी शिफारस करणार अहवाल मानवाधिकार आयोगाने संयुक्त राष्ट्रांना सोपवला आहे.

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या तथ्य शोधक पथकाने युद्धक्षेत्र भागात सर्वेक्षण करून अहवाल तयार केला आहे. यात संयुक्त राष्ट्राची एक समिती सहभागी होती. इराणमध्ये झालेल्या हल्ल्यात मानवाधिकांराच्या उल्लंघनाचा पथकाने तपास केला आणि अहवाल संयुक्त राष्ट्र महासचिवांना सोपवला. अहवालात म्हटले की, अमेरिकन सैन्याने इराणवर केलेल्या हल्ल्यात मानवाधिकारांचे उल्लंघन केले. महिला, मुलांना लक्ष्य करत त्यांनी क्षेपणास्त्र, ड्रोनचा मारा केला, यात शेकडो निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. एका शाळेवर झालेला हल्ला मानवी मूल्यांना काळीमा फासणारा होता. यात विद्यार्थी आणि शिक्षक मारले गेले. या हल्ल्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावर निषेध करावा आणि अमेरिकेला युद्ध गुन्हेगार म्हणून घोषित करण्यात यावे.

### विद्यार्थ्यांचा अमेरिकेच्या हल्ल्यातच मृत्यू

संयुक्त राष्ट्रांच्या पथकाने म्हटले की, फेब्रुवारीमध्ये इराणमधील एका शाळेवर आणि एका क्रीडा सुविधेवर झालेल्या दोन लष्करी हल्ल्यांमागे अमेरिका होता आणि यासंदर्भात आमच्याकडे पुरेसे पुरावे आहे. याशिवाय सरकारविरोधी आंदोलने प्राणघातकपणे दडपून टाकताना इराणी अधिकाऱ्यांनी मानवतेविरुद्ध गुन्हे केल्याचे अहवालात म्हटले आहे. इराण युद्धादरम्यान अमेरिकेच्या वर्तनाची आणि डिसेंबरच्या अखेरीस सुरू झालेल्या देशव्यापी आंदोलनाची तपासणी करण्यात आली आहे. ■

**पेंटॅगॉनने फेटाळला आरोप**

सादर केलेल्या अहवालावर २७ सप्टेंबर रोजी चर्चा होणार आहे. दरम्यान, अमेरिकेच्या पेंटॅगॉनने आरोप फेटाळत संबंधित अहवाल एकतर्फी असल्याचे म्हटले आहे. व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या ॲना केली यांनी सांगितले की, संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेने अमेरिकेवर अद्यावर कोणताही आरोप सिद्ध केलेला नाही आणि या संघर्षासाठी इराण जबाबदार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानात आत्मघाती हल्ला

## खैबर पख्तुनख्वामध्ये १६ ठार

**इस्लामाबाद, १८ सप्टेंबर**

पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतातील कोहाट जिल्ह्यातील पोलिस क्वार्टर परिसरातील मशिदीत शुक्रवारी नमाज सुरू असताना आत्मघाती हल्ला झाला, यात पाच पोलिसांसह १६ जण ठार आणि ५० पेक्षा जास्त जखमी आहेत. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की मशिदीची इमारत आणि बाहेरचा भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. अद्याप या हल्ल्याची जबाबदारी कोणत्याही संघटनेने घेतलेली नाही. स्फोटकांनी भरलेले एक वाहन मशिदीच्या प्रवेशद्वारावर आदळले आणि त्यानंतर हा स्फोट झाला. मृतकांमध्ये पोलिसांचाही समावेश आहे. स्फोटानंतर मशिदीबाहेर गोळीबार झाला.

खैबर पख्तुनख्वाची राजधानी पेशावरपासून नैऋत्येला सुमारे ६० किलोमीटर अंतरावर, कोहाट जिल्ह्यातील जुन्या पोलिस क्वार्टरजवळ मशीद असून, शुक्रवारच्या नमाजासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. यात पोलिसांचाही समावेश होता. नमाज सुरू असताना एक गाडी मशिदीच्या प्रवेशद्वारावर धडकली.

◂ (वृत्तसंस्था)



भारतात जन्मलेल्या 'केजीपी-१२' या मादी चित्त्याने चार शावकांना जन्म दिला आहे. मध्यप्रदेशातील शिवपूर येथील कुनो राष्ट्रीय उद्यानात शावकांसोबत आराम करतानाचे तिचे छायाचित्र

# भारत-भूतानमधील अद्वितीय मैत्री अधिक दृढ



## दोन्ही देशांनी द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंचा घेतला आढावा

**थिम्पू, १८ सप्टेंबर**

भारतीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या भूतान दौऱ्यादरम्यान दोन्ही देशांनी द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंचा आढावा घेतला आणि विकास सहकार्यात झालेल्या प्रगतीचे कौतुक केले. जयशंकर दोन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर बुधवारी भूतानमध्ये दाखल झाले. दोन्ही देशांमधील परस्पर संबंध आणि सहकार्य अधिक दृढ करणे हा त्यांच्या दौऱ्याचा उद्देश आहे.

भूतान दौऱ्यादरम्यान जयशंकर यांनी राजा जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांच्यासह पंतप्रधान त्शेरिंग तोबगे यांची भेट घेत त्यांचे भूतानी समकक्ष डी. एन. धुंग्याल यांच्याशी चर्चा केली. गुरुवारी राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांची भेट घेतल्यानंतर जयशंकर यांनी 'एक्स' या समाज माध्यमामवरील एका पोस्टमध्ये म्हटले, आज थिम्पू येथे भूतानचे राजे महामहिम जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांना भेटून मला गौरवान्वित वाटत आहे. भारत आणि भूतान यांच्यातील अद्वितीय मैत्री अधिक दृढ करण्यासाठी आम्ही त्यांच्या मार्गदर्शनाला महत्त्व देतो.

दोन्ही बाजूंनी परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्यांसह द्विपक्षीय सहकार्याच्या सर्व पैलूंचा आढावा घेतला. दोन्ही बाजूंनी विशेष आणि बहुआयामी भारत-भूतान भागीदारी मजबूत करण्याच्या दिशेने झालेल्या प्रगतीचे कौतुक केले. भूतानच्या विकासाची उद्दिष्ट्ये आणि प्राधान्यक्रमांना भारताचा पाठिंबा असल्याचा पुनरुच्चार जयशंकर यांनी केला, तर भूतानने भारताच्या १३ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत विविध कार्यक्रमांना दिलेल्या पाठिंब्याचे कौतुक केले. भूतानच्या मंत्र्यांसोबत विकास भागीदारी, तसेच ऊर्जा, व्यापार, संपर्क व्यवस्था, संस्कृती आणि लोकांमधील संबंध या क्षेत्रांतील बहुआयामी सहकार्याला चालना देण्यावर चर्चा केली.

**सीमापार संपर्क, पायाभूत सुविधा वाढवण्याचे संयुक्त प्रयत्न**

दोन्ही बाजूंनी आसाममधील समरंग येथे नुकत्याच झालेल्या नवीन भू-सीमाशुल्क केंद्राच्या उद्‌घाटनाचे स्वागत केले आणि नमूद केले की, हे सीमापार संपर्क, पायाभूत सुविधा आणि सोयीसुविधा वाढवण्याच्या संयुक्त प्रयत्नांचे प्रतीक आहे. त्यांनी गेलेफू आणि कोकराझार तसेच सामत्से आणि बनारहाट दरम्यान सीमापार रेल्वेमार्ग स्थापित करण्याच्या प्रगतीचा आढावा घेतला. दरम्यान, जयशंकर यांनी ढुंगेल यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### सोनू म्हणाला, ती क्लिप बनावट




**मुंबई :** बॉलिवूड गायक सोनू निगम याचा एक एडिटेड व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो टीव्हीवर 'मैं हूं हीरो तेरा' गाणे गात असलेल्या सलमान खानच्या गायकीची खिल्ली उडवताना दिसतो आहेत. या क्लिपमध्ये सोनू डोके धरून बसलेला आणि असे गाणे ऐकून आपण रडू, असे म्हणताना दिसतो आहे. व्हिडीओवरून वाद वाढत असल्याचे पाहून सोनू निगम यांनी स्वतः इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करून या व्हायरल व्हिडीओमागचे सत्य समोर आणले आहे. इंटरनेटवर काहीही दाखवले जाऊ शकते आणि हा व्हिडीओ एडिट करून तयार करण्यात आला आहे. प्रत्यक्षात कोणाचीही खिल्ली उडवत नव्हतो, तर एका पाकिस्तानी मुलीच्या गायकीने प्रभावित होऊन रडलो होतो, असे त्याने स्पष्ट केले. ■

### 'हनुमान अंश' ३०० कोटींच्या उंबरठ्यावर

**मुंबई :** 'हनुमान अंश' चित्रपट प्रदर्शित होऊन ४० दिवस झाल्यानंतर बॉक्स ऑफिसवर ३०० कोटींचा टप्पा ओलांडण्याच्या उंबरठ्यावर आहे. प्रशांत वर्मा दिग्दर्शित या चित्रपटाने ४० व्या दिवशी भारतात ८.२५ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले आहे. भारतात ९१७५ शोजच्या माध्यमातून चित्रपटाने दमदार कमाई केली आहे. चित्रपटाची भारतातील एकूण निव्वळ कमाई २३,११३ कोटी रुपयांवर पोहोचली आहे, तर एकूण 'ग्रॉस कलेक्शन' २७,२९१ कोटी रुपये झाले आहे. या चित्रपटाने ४० व्या दिवशी विदेशातही दोन कोटी रुपयांची कमाई केलीआहे. ज्यामुळे त्याचे आंतरराष्ट्रीय 'ग्रॉस कलेक्शन' १८.५० कोटी रुपयांवर पोहोचले आहे. दरम्यान, 'हनुमान अंश'चे जगभरातील एकूण 'ग्रॉस कलेक्शन' आता २९१.४० कोटी रुपये झाले आहे. ४० व्या दिवशी ८.२५ कोटी रुपयांच्या कमाईसह 'हनुमान अंश' आघाडीवर आहे. ■

### 'टॉक्सिक' लवकरच ओटीटीवर

**मुंबई :** दाक्षिणात्य सुपरस्टार यशचा बहुचर्चित चित्रपट 'टॉक्सिक : ए फेयरीटेल फॉर ग्रोन-अप्स' चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर अवघ्या काही आठवड्यांतच ओटीटी प्लॅटफॉर्मवर दाखल होण्याची शक्यता आहे. चित्रपटगृहांमधील कमाई आणि शोच्या संख्येत झालेली मोठी घट पाहता, निर्मात्यांनी हा चित्रपट मुदतीआधीच डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचा विचार आहे. हा चित्रपट २५ सप्टेंबर रोजी 'झी-५' या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रीमियर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे ज्या प्रेक्षकांना हा चित्रपट पाहता आला नाही, त्यांना तो घरबसल्या पाहण्याची संधी मिळेल. तथापि, ओटीटी प्रदर्शनाची तारीख आणि प्लॅटफॉर्मबाबत निर्मात्यांकडून अथवा 'झी-५'कडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. गीतू मोहनदास दिग्दर्शित या चित्रपटाची कथा जुन्या काळातील गोव्याची पृष्ठभूमी आणि तिथल्या ग्लॅमरस जगामागे सक्रिय असलेल्या एका ड्रग्ज कार्टेलवर आधारित आहे. ■




# इराणचा तेलवाहू जहाजावर हल्ला

**दुबई, १८ सप्टेंबर**

इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्सने (आयआरजीसी) होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये टोगोचा ध्वज असलेल्या 'ट्रेंड' नावाच्या तेलवाहू जहाजावर क्षेपणास्त्राचा मारा केला. यात जहाजाला आग लागली. आयआरजीसीने आगीवर नियंत्रण मिळवत खलाशांना ओमानच्या हद्दीत सोडून, जहाज ताब्यात घेतले आहे. हल्ल्यानंतर पेंटॅगॉनने इराणला प्रत्युत्तराचा इशारा दिला आहे.

आयआरजीसीने निवेदनात म्हटले की, अनेकदा इशारा देऊनही जहाजावरील चालकदलाच्या सदस्यांनी सूचनांचे पालन केले नाही, त्यांनी बेकायदेशीरपणे सामुद्रधुनी ओलांडण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे क्षेपणास्त्राचा मारा करावा लागला. संबंधित जहाज आमच्या ताब्यात असून, खलाशांची सुटका करण्यात आली आहे. इराणच्या हल्ल्याचा निषेध करत पेंटॅगॉनने सडेतोड प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला. त्यांनी म्हटले की, जलमार्गात व्यत्यय आणणे सहन केले जाणार नाही, नुकत्याच झालेल्या हल्ल्याला आम्ही लवकरच प्रत्युत्तर देऊ. युनायटेड किंगडम मेरिटाइम ट्रेड ऑपरेशन्सने देखील हल्ल्याची पुष्टी करत म्हटले की, ओमानमधील खसाबच्या ईशान्येस १६ नॉटिकल मैल अंतरावर आयआरजीसीने क्षेपणास्त्राचा मारा केला. यामुळे जहाजांची वाहतूक थांबवण्यात आली आहे.

**वाटाघाटीतील विलंब भोवणार : ट्रम्प**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, कोणताही करार अमेरिकेच्या अटीवरच होईल, इराणकडून अद्याप वाटाघाटी सुरू झालेल्या नाही, त्यांनी आणखी विलंब केल्यास मोठी किंमत चुकवावी लागेल. आम्ही एकतर चांगला करार करू किंवा कोणताही करार करणार नाही. ◂ (वृत्तसंस्था)

# पंजाबमध्ये 'एएसआय'ची गोळ्या घालून हत्या

**अमृतसर, १८ सप्टेंबर**

अमृतसरमध्ये गस्तीवर असलेल्या एका सहाय्यक पोलिस उपनिरीक्षकाची गुरुवारी मध्यरात्री गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. ही घटना दाना मंडीजवळ पहाटे सुमारे २:३० वाजता घडली. ते मोटारसायकलवरुन जात असताना त्यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. हरजीत सिंग, असे मृत एएसआयचे नाव आहे. ते गेट हकीमान पोलिस ठाण्यात कार्यरत होते. या हल्ल्याची जबाबदारी तहरिक-ए-तालिबान हिंदुस्तान या संघटनेने स्वीकारली आहे.

हरजीतसिंग मध्यरात्री दुचाकीवर गस्तीवर गेले असता, त्यांचा पाठलाग करून हल्लेखोरांना अगदी जवळून गोळी झाडली. गोळी त्यांच्या मानेच्या मागच्या भागाला लागल्याने सिंग गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने अमृतसरमधील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच, वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि संबंधित पोलिस ठाण्यातील एक पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावरून ३०-बोर पिस्तुलाचे रिकामे काडतूस जप्त करण्यात आले असून, ते न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवण्यात आली आहे. हल्लेखोरांचा माग काढण्यासाठी अनेक पोलिस पथके रवाना करण्यात आली.

◂ (वृत्तसंस्था)



गुजरातमधील अहमदाबादला शुक्रवारी मुसळधार पावसाने झोडपले. यामुळे सखल भागात पाणी साचले आणि नागरिकांची तारांबळ उडाली. साचलेल्या पाण्यातून वाट काढताना नागरिक

# मांजराच्या नवीन प्रजातीचा शोध



## लांबी ४६ सेंटीमीटर, वजन सुमारे १.४ किलोग्रॅम

**ला पाझ, १८ सप्टेंबर**

बोलिव्हियाच्या ढगाळ जंगलांमध्ये मांजराच्या एका नवीन प्रजातीचा शोध लागला आहे. शास्त्रज्ञांनी 'लिओपार्डस टिल्कायो' असे नाव या नवीन प्रजातीला दिले आहे.

मागील १०० वर्षांपेक्षा जास्त काळानंतर नव्याने नाव आणि वर्णन मिळालेली ही मांजरांच्या कुळातील पहिलीच जिवंत प्रजाती ठरली आहे. स्थानिक पातळीवर 'तिलकायो' म्हणून ओळखले जाणारे हे ठिपक्यांचे मांजर, बोलिव्हियाच्या हिरव्यागार युंगास जंगलात राहते. हा एक डोंगराळ प्रदेश आहे जिथे जंगले अनेकदा ढगांनी वेढलेली असतात आणि आर्द्रता जास्त असते. या मांजराची लांबी केवळ ४६ सेंटीमीटर आणि वजन सुमारे १.४ किलोग्रॅम आहे. हे सामान्य पाळीव मांजरापेक्षा आकाराने लहान आहे. बोलिव्हियातील तो प्राणी त्यांना आधीपासून माहीत असलेल्या 'टायगर कॅट्स'सारखा (वाघासारखे पट्टे असलेल्या मांजरांसारखा) दिसत नव्हता हे संशोधकांच्या लक्षात आल्यानंतर या शोधाची सुरुवात झाली.

त्याचे केस फिकट तपकिरी असून त्यावर अनियमित आकाराचे गुलाबासारखे ठिपके आहेत, असे 'नॅशनल जिओग्राफिक एक्सप्लोरर' आणि या अभ्यासाच्या लेखिका पाओला नोगलेस-अस्कारिस यांनी सांगितले. वाघ-मांजरांना ओळखणे कठीण आहे, कारण त्यांच्या अनेक प्रजाती दिसायला सारख्या असतात. जनुकीय संशोधनाने हा गट अधिक वैविध्यपूर्ण असल्याचे आधीच सूचित केले होते तरी अनेक वर्षांपासून त्यांना मोठ्या प्रमाणावर एकाच प्रजातीचे मानले जात होते.

संशोधकांनी दक्षिण अमेरिकेतील ३८ मांजरांच्या (ज्यामध्ये संग्रहालयातील आठ नमुन्यांचाही समावेश होता) डीएनएचे विश्लेषण केले. ज्यांना पूर्वी एकच गट मानले जात होते, त्यामध्ये प्रत्यक्षात अनुवांशिकदृष्ट्या भिन्न अशा पाच प्रजातींचा समावेश आहे, असे यातून दिसून आले.

ही बोलिव्हियन 'टायगर कॅट' एक वेगळी प्रजाती असेल, अशी आम्हाला कधीच अपेक्षा नव्हती, असे उत्क्रांतीवादी जीवशास्त्रज्ञ जोनास लेस्क्रॉर्ट यांनी सांगितले. 'तिल्कायो' वंश इतर 'टायगर कॅट्स'पासून सुमारे १४ लाख वर्षांपूर्वी वेगळा झाला, असे अनुवांशिक पुराव्यांवरून सूचित होते. ◂ (वृत्तसंस्था)

### दोन मांजरांचा केला अभ्यास



मांजरांच्या बाबतीत प्रजाती-स्तरावरील फरक दर्शवण्याइतपत हा जनुकीय तफावतीचा फरक मोठा आहे, असे संशोधकांनी सांगितले. संघाने आतापर्यंत फक्त दोन जिवंत 'तिल्कायो' आणि काही कॅमेरा-ट्रॅप नोंदींचा अभ्यास केला आहे, याचा अर्थ या प्राण्याबद्दल अजूनही बरीच माहिती अज्ञात आहे. सध्या आमच्याकडे असलेली माहिती मर्यादित आहे, असे लेस्क्रोआर्ट म्हणाले. प्राथमिक पुराव्यांनुसार, ही मांजर प्रामुख्याने रात्रीच्या वेळी सक्रिय असू शकते आणि लहान उंदरांसारख्या प्राण्यांची शिकार करत असावी. 'करंट बायोलॉजी'मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात, पेरूच्या युंगासमध्ये 'लिओपार्डस टिग्रिनस अँटिसुयो' नावाच्या 'टायगर-कॅट'च्या एका नवीन उपप्रजातीची ओळखही पटवली आहे. ■

# गुन्हेगाराच्या वाहनात कोट्यवधींचे हेरॉईन

**नवी दिल्ली, १८ सप्टेंबर**

दिल्ली पोलिसांची विशेष शाखा आणि गुजरात गुन्हे शाखेने संयुक्त मोहीम राबवत रोहित गोदरा टोळीचा सदस्य आणि कुख्यात गुन्हेगार कुलदीप स्वामी याला अटक करत त्याच्या कारमधून १२ कोटी रुपये किमतीचे दोन किलो पाकिस्तानी हेरॉईन जप्त केले. या कारवाईत, गँगस्टर रोहित गोदराचा जवळचा साथीदार महेंद्र दलानाच्या नेटवर्कशी संबंधित एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

कुलदीप स्वामी राजधानी दिल्लीतील चांदणी चौकात असल्याची गोपनीय माहिती गुजरात गुन्हे शाखेकडून दिल्ली पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर शुक्रवारी पहाटे पोलिसांनी संयुक्त मोहीम राबवत आरोपीला कुचा घासी राम येथून अटक केली. त्याच्या कारमधून पाकिस्तानातून आणलेले १२ कोटींचे हेरॉइन जप्त करण्यात आले. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. ◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# सेमीकंडक्टर युगातील क्रांतिकारी पाऊल

कोणे एके काळी संगणकाकडे संशयाने पाहण्याच्या मानसिकतेचा अनुभव भारताने घेतला. पुढे काळाने कूस पालटली आणि भारताच्या विकासाचे चक्र त्याच संगणकाने गतिमान केले. विमान वाहतुकीपासून घरच्या घरी काम करणाऱ्या लोकांपर्यंत साऱ्यांच्या मदतीला संगणक आला. कधी काळी आपण त्या जुन्या काळातील अगडबंब संगणकाचे इवलेसे मोबाईलमध्ये सामावलेले रूप घेऊन वावरू शकू, असे कुणालाही वाटले नव्हते. परंतु, तसे घडले. तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे असेच असते. कधीकाळी भारतात मोबाईल फोन बनवणे हीच मोठी गोष्ट मानली जात होती. आज भारत त्या मोबाईलच्या आत असणाऱ्या सूक्ष्म चिपच्या निर्मितीच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकत आहे. ही केवळ औद्योगिक प्रगती नसून, भारताच्या आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या प्रवासातील हा एक महत्त्वाचा वळणबिंदू आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत सेमीकॉन इंडियाच्या पाचव्या आवृत्तीचे उद्घाटन जागतिक कंपन्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत केले आणि सेमीकंडक्टर युगात भारताने क्रांतिकारक पाऊल टाकले आहे. सेमीकंडक्टर दिसत नाही. त्याचा आकार अत्यंत लहान असतो. परंतु, सारे आधुनिक जग त्याच्यावर चालते. मोबाईल, मोटारगाडी, विमान, उपग्रह, वैद्यकीय उपकरणे, संरक्षण व्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर, दूरसंचार अशा आजच्या काळातील जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या तंत्रज्ञानामागे सेमीकंडक्टर असतो. त्यामुळे ज्याच्या हातात चिपचे तंत्रज्ञान आणि उत्पादनक्षमता असेल, त्याच्या हातात भविष्यातील अर्थव्यवस्थेची महत्त्वाची किल्ली असेल. भारताने या क्षेत्रात उशिरा प्रवेश केला, हे वास्तव आहे. पण उशिरा प्रवेश करणे आणि उशिरा जागे होणे यात फरक असतो. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने सेमीकंडक्टर क्षेत्राकडे ज्या गांभीर्याने पाहिले, त्याचे हे फलित आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सेमीकंडक्टर्सच्या निर्मितीसाठी सुरू झालेल्या सेमीकॉन इंडिया प्रोग्रामची सुरुवात मोठी होती. वर्ष-दोन वर्षांत त्याचा व्याप वाढला. त्यामागील उद्देश फक्त एखादा कारखाना उभारण्यापुरता मर्यादित नव्हता. चिप डिझाईनपासून फॅब्रिकेशन, असेंब्ली, टेस्टिंग आणि पॅकेजिंगपर्यंत संपूर्ण परिसंस्था भारतात उभी करणे हा त्यामागचा विचार होता. सेमीकंडक्टर उद्योग म्हणजे फक्त एक 'फॅक्टरी' नसते. त्यामागे संशोधन, डिझाईन, अत्याधुनिक यंत्रसामग्री, विशेष रसायने, औद्योगिक वायू, कुशल मनुष्यबळ, पॅकेजिंग, लॉजिस्टिक्स, गुणवत्ता नियंत्रण आणि जागतिक पुरवठा साखळी असते. मोदी सरकारने सुरुवातीपासून या व्यापक परिसंस्थेकडे लक्ष दिले आणि त्याची फळे दिसू लागली आहेत. भारतात सेमीकंडक्टर क्षेत्रातील अनेक प्रकल्पांना मंजुरी मिळाली असून, त्यांचे विश्व सतत विस्तारत आहे. हा उद्योग एका राज्यापुरता मर्यादित न राहता देशाच्या विविध भागांत पसरत आहे.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने सेमीकंडक्टर्सचे महत्त्व आधीच ओळखले होते. हे ओळखून भारताने पावले उचलली. भारताला संरक्षण उपकरणे, दूरसंचार, अवकाश संशोधन, इलेक्ट्रिक वाहने, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल अर्थव्यवस्था यासाठी मोठ्या प्रमाणावर चिप्स लागणार आहेत. अशा परिस्थितीत संपूर्ण अवलंबित्व धोकादायक ठरू शकते, हे तेव्हाच भारत सरकारच्या लक्षात आले होते. अनेक देशांनी अनेक दशकांचा काळ सेमीकंडक्टर्सच्या विकासासाठी दिला. त्या तुलनेत भारताचा प्रवेश उशिरा झाला हे खरे. परंतु, तरीही आपला देश मागे राहता कामा नये, ही भावना ठेवून जागतिक कंपन्यांशी भागीदारी करण्यासह जागतिक कंपन्यांचे तंत्रज्ञान, भारतीय भांडवल, भारतीय मनुष्यबळ आणि सरकारी प्रोत्साहन यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने केला.

सेमीकंडक्टरला मराठीत अर्धसंवाहक म्हणतात. अर्धसंवाहक म्हणजे असा पदार्थ, जो विशिष्ट घटकांवर किंवा परिस्थितीवर अवलंबून राहून वाहक (कंडक्टर) किंवा विसंवाहक (इन्सुलेटर) म्हणून कार्य करू शकतो. याच गुणधर्मामुळे तो संगणक आणि इतर आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा पाया मानला जातो. ज्या पदार्थातून वीज सहज वाहू शकते, ते पदार्थ म्हणजे वाहक. तांबे, ॲल्युमिनियम ही त्याची उदाहरणे. याउलट, विसंवाहक ज्या पदार्थातून वीज वाहू शकत नाही, त्यांना म्हणतात विसंवाहक. लाकूड, काच ही त्याची उदाहरणे. अर्धसंवाहक किंवा सेमीकंडक्टरचे अर्धसंवाहक विद्युत वाहकतेचे गुणधर्म वाहक आणि विसंवाहक यांच्या दरम्यानचे असतात. मनगटावर लावायच्या घड्याळापासून ते अत्याधुनिक संगणक-विमाने अशी सर्व उपकरणे सेमीकंडक्टरवरच अवलंबून असतात. सेमीकंडक्टरची निर्मिती अत्यंत क्लिष्ट आणि खर्चीक असते. त्यासाठी विशेष प्रकारच्या कारखान्यांची गरज असते व उभारणीसाठी फार मोठा खर्च येतो. छोट्या आणि अत्यंत वेगाने कार्य करणाऱ्या अत्याधुनिक सेमीकंडक्टर वेफर्सचे उत्पादन अख्ख्या जगात बोटावर मोजता येतील एवढेच कारखाने आहेत. तसे कारखाने भारतात सुरू होत आहेत, हे या सेमीकंडक्टरच्या युगाचे वैशिष्ट्य. दीर्घ काळापासून भारताची इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील मोठी समस्या अशी होती की आपण मोठ्या प्रमाणावर उत्पादने बनवत असलो तरी त्यातील महत्त्वाचे घटक परदेशातून येत असत. गेल्या दशकात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. आता सेमीकंडक्टरचे युग अवतरते आहे. त्याद्वारे मोबाईल तयार करणाऱ्या देशापासून मोबाईलमधील महत्त्वाचा घटक तयार करणाऱ्या देशाकडे जाणे म्हणजे मूल्यसाखळीत वर जाण्याचे मार्ग प्रशस्त होतील. मूल्यसाखळीत वर जाणे म्हणजे अधिक कौशल्य, अधिक संशोधन, अधिक उत्पादकता आणि अधिक आर्थिक मूल्यनिर्मिती. सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताची मोठी ताकद आहे भारतीयांची बुद्धिमत्ता. भारतातील अभियंते जगातील तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. आतापर्यंत या बुद्धिमत्तेचा मोठा भाग भारताबाहेर निर्माण होणाऱ्या उत्पादनांसाठी वापरला जात होता. आता देशातच चिप डिझाईन, प्रोटोटाईपिंग आणि उत्पादनासाठी संधी निर्माण होत आहेत. सेमीकंडक्टर निर्मितीत भारताचा प्रवेश हा 'मेक इन इंडिया'चा पुढचा अध्याय आहे. पहिला अध्याय होता भारतात उत्पादन करण्याचे आवाहन करण्याचा. पुढचा अध्याय आहे तो भारतात तंत्रज्ञान निर्माण करण्यासाठी झटण्याचा. त्यापुढचा अध्याय असेल जगासाठी तंत्रज्ञान तयार करण्याचा. मोदी सरकारने या दिशेने देखील सुरुवात केली आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रात तैवान, दक्षिण कोरिया, अमेरिका, जपान आणि चीनसारख्या देशांनी दशकानुदशके गुंतवणूक केली. संशोधन केले. भारताला त्या साऱ्यांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी सरकारी अनुदानासह सातत्यपूर्ण संशोधन, विद्यापीठे आणि उद्योग यांच्यातील संबंध, कुशल मनुष्यबळ, जलद पायाभूत सुविधा, विश्वसनीय वीज-पाणीपुरवठा आणि जागतिक दर्जाची उत्पादन यंत्रणा आवश्यक आहे. सरकारने संधींचे दार उघडून दिलेले आहे. आता उद्योग, विद्यापीठे, संशोधन संस्था आणि भारतीय प्रतिभेला त्यातून प्रवेश करून भारताचे भविष्य घडवावे लागेल. समजून घ्यायला हवे ते हे की, ही प्रक्रिया संक्रमणाची आहे. उपभोक्ता ते उत्पादक बनण्याच्या दिशेने होणारे हे संक्रमण आहे. सुटे भाग जोडणारा देश ते त्या भागांची निर्मिती क्षमता प्राप्त केलेला देश बनण्याच्या दृष्टीने सुरू झालेली ही वाटचाल आहे. आणि तंत्रज्ञान वापरणाऱ्या देशापासून तंत्रज्ञान विकसित करणारा देश म्हणून साऱ्या देशात मान मिळविण्याचा हा मुद्दा आहे. काही प्रसंग शांततेने घडतात, पण ते देशाच्या इतिहासाला निर्णायक वळण देत असतात. सेमीकंडक्टर मिशनच्या प्रवासाचा हा टप्पा तसाच आहे. त्यात भारताचे भविष्य दडलेले आहे. ■


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# हनुमान अंश आणि नास्तिकवाद!

'हनुमान अंश' या चित्रपटाने आता जागतिक स्तरावर ३०० कोटींचा टप्पा पार केला आहे. याआधी प्रवीण तरडे यांच्या 'देऊळ बंद २' चित्रपटाने १०० कोटींची मजल गाठली होती. अलिकडच्या आध्यात्मिक चित्रपटांच्या चमत्कारिक प्रतिसादाची सुरुवात कदाचित 'लालो - कृष्ण सदा सहायते' या गुजराती चित्रपटाने केली असावी. ५० लाखांत तयार झालेल्या या चित्रपटाने सुमारे १२० कोटी रुपये कमावले. हनुमान अंश हा देखील सुमारे २ कोटींत तयार झालेला चित्रपट आहे. हा चित्रपट मी दोनदा पाहिला. या चित्रपटाचं वैशिष्ट्य असं की, कमी बजेटमध्ये सुंदर लेखन, अभिनय, दिग्दर्शन, सिनेमाटोग्राफी आणि संगीत सगळं काही उत्तम दर्जाचं असू शकतं. दुसरी गोष्ट भारतात विशेषतः हिंदी-मराठी चित्रपटांमध्ये खूप कमी बायोपिक असे आहेत, जे चांगले आहेत. म्हणजे बायोपिक बनवताना किती दाखवू नि किती नको अशी अवस्था चित्रपटकर्त्यांची होत असते आणि या इतक्या सगळ्या डेटाच्या नादी लागल्याने स्टोरी टेलिंग गंडते. पण हनुमान अंश हा बायोपिक म्हणूनही उत्तम आहे. यातलं संगीत उत्कृष्ट आहे. भजन तल्लीन करणारे आहेत. कलाकारांनी प्राण ओतून काम केलं असल्यामुळे अनेक प्रसंगांत तुमच्या डोळ्यांत पाणी तरळतं. तिसरी गोष्ट हा आध्यात्मिक आणि चमत्कारावर आधारित चित्रपट आहे. या चित्रपटात नीम करौरी बाबांनी केलेले चमत्कारही दाखवण्यात आले आहेत. नीम करौरी बाबांचा जन्म साधारण १९०० मधला आणि त्यांनी १९७३ ला देह त्यागला. म्हणजे हे चमत्कार अलिकडील आहेत.

सध्या पुण्यातल्या विद्यानंद बापटांमुळे नास्तिकवादाची पुन्हा एकदा चर्चा झालेली आहे. विद्यानंद बापट हे डीजे विरुद्ध बोलत असताना अवांतर बोलतात. त्यांचा उत्सव आणि पंढरपूरच्या वारीला देखील विरोध आहे. ते उत्सव आणि सणाची तुलना लष्कर-ए-तोयबासोबत करतात. लष्कर-ए-सण अशाप्रकारचं भाष्य त्यांनी केलं होतं. तसे ते खूप बडबडतात. कदाचित अनेक वर्षे त्यांचं कुणी ऐकून घेतलं नसावं त्यामुळे सवंग प्रसिद्धी लाभल्याने ते स्वतःला मोठे समाजसेवक वगैरे समजू लागले आहेत. असो. पण बापटांमुळे नास्तिकवादाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेला आला आहे. ख्रिस्ती आणि इस्लाम अशा पंथांमध्ये नास्तिक असणं हे महापाप असतं. पण हिंदू धर्मात विविध उपासना पद्धती आणि विचार स्वातंत्र्य असल्याने आपल्याकडे 'हिंदू-नास्तिक' अशी संकल्पना आहे. 'ख्रिस्ती नास्तिक' असं बोललं तरी आपल्याला गंडल्यासारखं वाटतं. पण तुम्ही 'हिंदू-नास्तिक' म्हणू शकता. नास्तिकवादाची चर्चा झाली की पुरोगाम्यांना आणि हिंदुत्ववाद्यांना आठवतात ते सावरकर. बापटांमुळे देखील अनेकांना सावरकर आठवले आहेत. माझ्या मते तुम्ही नास्तिक (इथे देव मानत नाही, एवढाच अर्थ घेतलेला आहे) असणे किंवा आस्तिक असणे हा तुमचा वैयक्तिक मुद्दा आहे. सावरकर नास्तिक की आस्तिक हा मुद्दा गौण आहे. बापटांप्रमाणे किंवा इतर नास्तिकांप्रमाणे तुम्ही तुमचं बघून घ्या, आम्हाला त्रास देऊ नका अशी सावरकरांची नीती नव्हती. अनेक सुधारक आणि सावरकरांमध्ये हाच फरक होता की सावरकर सुधारणावादी असूनही हिंदुत्ववादी होते. उलट पुढे अनेक सुधारणावाद्यांना सावरकरांचं हिंदुत्व पटलेलं होतं. महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'देवाला रिटायर करा' असली बडबड त्यांनी कधीच केली नव्हती. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देण्यासाठी सावरकर धडपडले आहेत. सत्यनारायण बंद करा असेही सावरकर म्हणाले नाहीत, उलट सत्यनारायणाच्या पोथीत देशभक्तीचा आणखी एक अध्याय जोडा असं म्हणालेत. आज नास्तिकांना ज्या ढोल ताशा किंवा बॅण्डचा त्रास होतो. तो बॅण्डचा धंदा सावरकरांनी हिंदूंना सुरू करून दिलाय. सावरकरांनी सर्व हिंदूना मौंजीबंधनाचा अधिकार हवा म्हणून पुढाकार घेतला आहे. स्वतः मुंज लावली आणि धार्मिक पद्धतीने लग्नेही लावून दिलेली आहेत. हिंदूंच्या एकजुटीसाठी सावरकरांनी स्वतः ईश्वराची भजनं गायिली आहेत. त्याकाळी आज वाटणाऱ्या सामान्य बाबी भयंकर कठीण होत्या. म्हणूनच सावरकरांची भाषा काही ठिकाणी कठोर वाटत असली तरी ती त्या काळची गरज होती. आज सावरकर असते तर कदाचित अशा प्रकारची टीका केली नसती. मशिदी समोरून मिरवणूक गेली की दंगल उसळायची, तेव्हा सावरकरांनी स्वतः पुढाकार घेतला आहे. हिंदूंना प्रतिकार करायला सांगितला आहे. अंदमानात मुसलमान मुद्दामून जोरजोरात बांग देत तर सावरकरांनी तुमची बांग तर आमचा शंख असं म्हणत भजन करायला सुरुवात केली.



नास्तिक असणं म्हणजे आपण कोण बुद्धिवादी वगैरे आहोत अशा थाटात नास्तिकांनी वावरू नये. नास्तिक असणाऱ्या कम्युनिस्टांनी जगात हैदोस माजवला होता. आजही संधी मिळेल तेव्हा माजवतच असतात. आपले अनेक वैज्ञानिक, प्रसिद्ध डॉक्टर हे आस्तिक आहेत. तुम्ही नास्तिक आहात म्हणजे आस्तिकांच्या श्रद्धांवर टीका करू शकता आणि वर आपल्या सडक्या तोंडाने सावरकरांचे नाव घेऊ शकता असे समजू नका. स्वतःची तुलना सावरकरांसोबत करणं टाळा. आधी तेवढा अधिकार प्राप्त करा. साधं आणि सोपं उदाहरण म्हणजे बाळासाहेबांची ठाकरी भाषा आपण स्वीकारली. पण तशीच भाषा वापरणाऱ्या त्यांच्या वंशजांना जनतेने घरी बसवलं. थोडक्यात अधिकार प्राप्त करावा लागतो. तुमचा चमत्कार, अध्यात्म, धार्मिकता यावर विश्वास नसेल तर तो तुमचा वैयक्तिक विषय आहे. पण जर खिल्ली उडवणार असाल, तर तुमच्या नास्तिक-पंचीचे कपडे आम्हाला फाडावेच लागतील.

भारतीय प्रेक्षक अशा खुळ्यांच्या कानाखाली जाळ काढतंच असतात. हनुमान अंश, देऊळ बंद, लालो असे चित्रपट यशस्वी होणे म्हणजे जड-बुद्धिवाद्यांच्या कानाखाली सणसणीत चपराकच आहे. मात्र तरी देखील हिंदूंनी एक गोष्ट लक्षात ठेवावी की केवळ धार्मिक असून चालणार नाही. धार्मिक तर मिर्जा राजे जयसिंहही होते. पण औरंगजेबासाठी नोकरी करत होते. आपल्यासमोर धार्मिक हिंदू म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आहे. एवढे लक्षात ठेवावे. ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# हा तर नागरिकांच्या जिवाशी खेळ!

दूध आणि त्यापासून तयार करण्यात येणारे दही, ताक, लोणी, तूप इत्यादी पदार्थ नाशवंत असल्याचे सर्वांना माहीत आहे. तरीही, थोडेसे पैसे कमविण्यासाठी सणासुदीच्या दिवसात दुकानदारांकडून मुदतबाह्य तुपाचा साठा केल्याचे अकोला एफडीएच्या कारवाईत उघड झाले आहे. यावरून नफेखोरीसाठी नागरिकांच्या जिवाशी खेळत असल्याचे दिसून आहे. तुपासारख्या पदार्थाचीही साठेबाजी करणे ही तर हद्दच झाली. दूध, दही, ताक, लोणी, तूप इत्यादी पदार्थ आपल्या रोजच्या आहारातील महत्त्वाचा घटक आहे. सकस आहार आपल्या भोजनात असला पाहिजे, असे सांगितले जाते. पण, सकस आहार म्हणून अशाप्रकारे मुदतबाह्य अन्न घटक आपल्या आहारात असतील तर, आपली प्रकृती सुधारण्याऐवजी बिघडणारच. अकोल्यातील कारवाईत एफडीएने दोन ठिकाणांहून थोडेथोडके नव्हे तर, तब्बल ५९३ किलो मुदतबाह्य तूप जप्त केले. याची किंमत ४ लाख १५ हजार रुपये आहे. विचार करा की हे तूप ज्या कोण्या नागरिकांच्या जेवणात चमचाभर देखील आले असते आणि त्यामुळे त्यांना विषबाधा झाली असती तर, किती हाहाकार झाला असता. बरं, ही कारवाई होण्यापूर्वी किती लोकांनी ते खरेदी करून घरी नेले आणि त्यापासून पदार्थ तयार करण्यासाठी किंवा रोजच्या जेवणात वापरले असेल तर, त्यांचे काय होईल, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो.

जेव्हापासून अन्न व औषध विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाली तेव्हापासून त्यांनी राज्यात भेसळखोरांविरुद्ध कारवाईचा धडाका सुरू केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत अकोला एमआयडीसी परिसरातून सोयाबिन तेलाचा साठा देखील जप्त करण्यात आला आहे. दररोज राज्यभरात कारवाईचा धडाका सुरू असताना अकोल्यातील व्यापारी किंवा दुकानदारांनी त्यापासून कोणताही धडा घेतला नसल्याचेच दिसून येते. दुसरे असे की, हे दुकानदार चिल्लर विक्री करणारे आहेत की, घाऊक व्यापारी आहेत, हे पाहणे देखील क्रमप्राप्त ठरते. कारण, चिल्लर विक्रेते असतील तर, यांच्याकडील तूप थेट ग्राहकांनी खरेदी केले असेल आणि घाऊक व्यापारी असतील तर, त्यांच्याकडून शहर, तालुका, जिल्हाच नव्हे तर, जिल्ह्याबाहेरील दुकानदारांनी माल घेऊन त्यांच्या गावातील ग्राहकांना विकला किंवा विकणार असतील. तेव्हा ग्राहकांनी सणासुदीच्या दिवसांत अशाप्रकारे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तेल, तूप इत्यादी पदार्थांची खात्री करून घेणे आवश्यक आहे. त्या पदार्थाच्या पाकीट किंवा डब्यावरील लेबलवर असलेली त्याची मुदत तपासून घेतली पाहिजे. आजपर्यंत तांदळात प्लॅस्टिकचे तांदूळ, डाळीत खडे, युरियापासून दूध तयार करण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. सणासुदीच्या दिवसात खव्याची मोठी मागणी असते. त्यामुळे विक्रेत्यांकडून खव्यात देखील भेसळ केली जाते, हे आपल्याला माहीत होते. पण, आता सणासुदीच्या दिवसात नफा कमविण्यासाठी तुपाचा देखील साठा केला जात आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्याचा लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्या बालकांना माता सकस आहार म्हणून तूप, मीठ, भात एकत्र करून एक घास काऊचा, एक घास चिऊचा, असे म्हणून कौतुकाने भरवितात. पण, त्या मातांना काय माहीत की, ते तूप आपल्या चिमुकल्याला भरविण्यायोग्य आहे की नाही. शाळेच्या परिसरात बंदी असूनही जंक फूड सर्रास विकले जात आहे. विद्यार्थ्यांना सकस आणि पोषणयुक्त आहार मिळावा म्हणून सेव्ह फूड फॉर एव्हरी चाईल्ड इन महाराष्ट्र, ही मोहीम राबविण्याचे आदेश अन्न व औषध प्रशासनाने दिले आहेत. त्यानुसार शाळेच्या ५० मीरटच्या आत जंक फूड विकण्यास बंदी आहे. याबाबत राज्यातील मुख्याध्यापकांची कार्यशाळा देखील घेण्यात आली. तरीही, शाळांच्या परिसरात जंक फूडची विक्री सुरूच असल्याचे दिसून येते. यावरून कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी कठोर कारवाईच विक्रेत्यांना वठणीवर आणू शकते, असेच म्हणावे लागेल. पौष्टिक पदार्थ म्हणून तूप हा पारंपरिक पदार्थ आपल्या रोजच्या भोजनात आपण वापरतो. पण, आता अशाप्रकारे सर्व नियम धाब्यावर बसवून या पदार्थाची देखील विक्री होत असेल तर, याला काय म्हणावे. तेव्हा, नागरिकांनी सजग राहून बाजारात मिळणारे खाद्यपदार्थ व्यवस्थित तपासूनच खरेदी करा. अमुक कंपनीचा माल चांगला किंवा एखाद्या दुकानातील माल चांगला असतो, असा अंधविश्वास न ठेवता खाद्यपदार्थ खरेदी करा. सणासुदीत सकस आहार घ्या आणि आनंदात सण साजरे करा. ■

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# हतबल नेत्याची राजकीय नौटंकी!

राज्यात ऐन पावसाळ्यात दुष्काळाचे सावट गडद होत असताना, बळीराजा हवालदिल झाला आहे. हातात आलेले पीक करपून गेले आहे आणि शेतकरी डोळ्यांत पाणी आणून आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. अशा अत्यंत संवेदनशील आणि गंभीर परिस्थितीत राजकारणातील तथाकथित 'भीष्मपितामह' शरद पवार यांना अचानक शेतकऱ्यांचा पुळका आला आहे. निकषांची वाट न पाहता राज्यात तत्काळ दुष्काळ जाहीर करा, असे उपदेशामृत पाजणारे पत्र त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिले आहे. पण हे पत्र म्हणजे शेतकऱ्यांप्रति असलेले खरे प्रेम नसून, सत्ता गेल्यानंतर अस्वस्थ झालेल्या एका हतबल नेत्याची शुद्ध राजकीय नौटंकी आहे.

शरद पवारांनी आजवर चालवलेल्या सत्तेच्या राजकारणाचा बुरखा आता पूर्णपणे फाटला आहे. ज्या शरद पवारांनी महाराष्ट्रावर तब्बल १५ वर्षे एकाधिकारशाहीने सत्ता गाजवली, जे शरद पवार केंद्रात १० वर्षे देशाचे कृषिमंत्री म्हणून बसले होते, ज्या पवारांच्या आशीर्वादाने राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले होते आणि ज्यांनी स्वतः उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले, त्यांना स्वतःच्या प्रदीर्घ कार्यकाळात शेतकऱ्यांसाठी ठोस काही करावेसे का वाटले नाही? जेव्हा हातामध्ये सत्तेची संपूर्ण सूत्रे होती, निर्णय घेण्याचे अधिकार होते आणि तिजोरीच्या चाव्या होत्या, तेव्हा पवारांना या देशातील अन् राज्यातील शेतकऱ्यांचा हा कळवळा का आला नाही? आज सत्ता हातातून गेल्यानंतर अचानक मुख्यमंत्र्यांना सल्ले देण्याचे शहाणपण सुचले आहे, हा केवळ बेगडीपणाचा कळस आहे.

महाराष्ट्रात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सलग १५ वर्षे सत्तेत होते. या १५ वर्षांच्या काळात राज्याचा आणि विशेषतः ग्रामीण महाराष्ट्राचा कारभार थेट शरद पवार आणि त्यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या हाती होता. जलसंपदा, कृषी, सहकार यांसारखी महत्त्वाची आणि थेट शेतकऱ्यांशी निगडित असणारी सर्व मंत्रालये पवारांच्या पक्षाकडेच होती. परंतु याच १५ वर्षांच्या काळात महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झाल्या, हा इतिहास पुसता येईल का? हजारो कोटी रुपये सिंचनावर खर्च दाखवले गेले, पण प्रत्यक्ष शेतात पाणी पोहोचलेच नाही. सिंचन घोटाळ्याच्या चिखलात शेतकऱ्यांचे भविष्य बुडवले गेले. केंद्रात १० वर्षे कृषिमंत्री असताना पवारांना देशातील आणि राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न कायमस्वरूपी सोडवता आले नाहीत आणि स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी धूळ खात पडून राहिल्या. सत्तेत असताना ज्यांना शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून बाहेर काढता आले नाही, ते आज सत्ता गेल्यावर 'कैवारी' असल्याचा आव आणत आहेत.

२०१९ मध्ये ज्या पद्धतीचे राजकीय नाट्य घडले आणि महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले, त्याचे मुख्य सूत्रधार शरद पवारच होते. उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसवून त्यांनी सत्तेची गणिते जुळवली. उद्धव ठाकरे मुख्यमंत्रिपदावर बसण्यापूर्वी शेतकऱ्यांना सात-बारा कोरा करण्याची आणि संपूर्ण कर्जमुक्तीची मोठी मोठी आश्वासने देत होते. स्वतः पवारांनी या सरकारचे मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. पण प्रत्यक्ष घडले काय? अडीच वर्षे उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्र्याची खुर्ची नुसतीच उबवली, मात्र राज्यातील शेतकऱ्यांना कर्जाच्या दलदलीतून बाहेर काढण्यासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान तेवढे जाहीर केले. ते देण्याचे औदार्य देखील दाखवले नाही. ठाकरेंनी केलेली घोषणा देखील राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर महायुतीच्या सरकारने पूर्ण केली. अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाने जेव्हा बळीराजा उद्ध्वस्त झाला, तेव्हा मविआ सरकारने एनडीआरएफच्या निकषांचेच बोट दाखवत मदतीचे हात आखडते घेतले होते. मग आज जेव्हा तेच पवार निकषांची वाट न पाहता दुष्काळ जाहीर करण्याचा सल्ला देतात, तेव्हा त्यांच्या या सल्ल्यामागील दुटप्पीपणा उघडा पडतो. अडीच वर्षे स्वतःचे सरकार असताना हेच 'उदारपण' कुठे गेले होते?

दुष्काळ किंवा आपत्ती जाहीर करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विशिष्ट नियमावली असतात. राष्ट्रीय आपत्ती निवारण दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती निवारण दल (एसडीआरएफ) यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसारच कोणतीही शासकीय मदत किंवा दुष्काळसदृश परिस्थिती अधिकृतपणे घोषित केली जाते. उपग्रह छायाचित्रे, पावसाची टक्केवारी, भूगर्भातील पाण्याची पातळी आणि पिकांचे झालेले प्रत्यक्ष नुकसान या शास्त्रीय निकषांच्या आधारेच दुष्काळ घोषित करावा लागतो. जे नेते देशाचे केंद्रीय कृषिमंत्री राहिले आहेत, ज्यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे, त्यांना हे कायदेशीर आणि प्रशासकीय निकष माहिती नाहीत, असे म्हणणे म्हणजे पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याच्या ज्ञानाची चेष्टा करण्यासारखे आहे. जर त्यांना हे निकष माहीत असूनही ते निकष बाजूला ठेवा असे सांगत असतील, तर हा निव्वळ राजकीय खोडसाळपणा आहे. आणि जर खरोखरच त्यांना हे माहीत नसेल, तर असा अज्ञानी नेता महाराष्ट्राला इतकी वर्षे लाभला होता, हे या राज्याचे दुर्दैवच म्हणावे लागेल. आज जेव्हा शेतकरी निसर्गाच्या लहरीपणामुळे हवालदिल झाला आहे, त्याच्या डोळ्यांत अश्रू आहेत, अशा वेळी त्याच्या परिस्थितीचे राजकीय भांडवल करणे हा अत्यंत नीच राजकीय प्रवृत्तीचा प्रकार आहे. मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून ते तातडीने प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध करायचे आणि आपणच कसे शेतकऱ्यांचे तारणहार आहोत, असा आभास निर्माण करायचा, हा पवारांचा जुनाच राजकीय पॅटर्न आहे. सत्ता हातातून गेल्यामुळे आणि पक्षातील फुटीमुळे राजकीय अस्तित्व धोक्यात आल्यावर पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून गोळीबार करण्याचा हा लाचार प्रयत्न आहे.


महाराष्ट्रातील शेतकरी आता भोळा राहिलेला नाही. त्याला मावळ येथे शरद पवारांच्या गृहमंत्र्याने शेतकऱ्यांवर केलेल्या गोळीबारांची आठवण आहे. तो अजून ती जखम विसरलेला नाही. त्यावेळी मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या घरावर काय बेतली, हे अजून शेतकऱ्यांच्या विस्मरणात गेलेले नाही. शेतकऱ्यांवरच गोळीबार करून, पुन्हा त्यांच्यावरच शेकडो गुन्हे दाखल करून, वर्षोनवर्षे छळ केला, हा सगळा तुम्ही केलेला प्रताप पवार साहेब अद्याप या महाराष्ट्रातला शेतकरी विसरलेला नाही. तुम्ही सत्तेत असताना केलेली उपेक्षा आणि सत्ता गेल्यावर दाखवलेला बेगडी पुळका यातील फरक स्पष्टपणे शेतकऱ्याला समजतो.

१५ वर्षे राज्यात आणि १० वर्षे केंद्रात सत्ता उपभोगूनही ज्यांना शेतकऱ्यांना सुजलाम-सुफलाम करता आले नाही, ज्यांना शेतकरी आत्महत्या रोखता आल्या नाहीत, त्यांनी आता सध्याच्या सरकारला सल्ले देण्याची नैतिक पात्रता गमावली आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, त्यांना नियमाच्या चौकटीत बसवून जास्तीत जास्त मदत देणे हे सरकारचे कर्तव्य आहेच आणि सरकार ते करेलही. परंतु, पवारांनी शेतकऱ्यांच्या दुःखावर आपल्या राजकारणाची पोळी भाजणे आता थांबवले पाहिजे. सत्तेच्या लाचारीसाठी शेतकऱ्याचा वापर करणाऱ्या आणि बेगडी प्रेमाचा आव आणणाऱ्या शरद पवारांचा खरा चेहरा आता महाराष्ट्राच्या जनतेसमोर पूर्णपणे उघडा पडला आहे. ■

९२७०३३३८८६

### डिजिटल क्रांतीला खीळ लावणारे यूपीआयवरील शुल्क!

देवाणघेवाणीच्या व्यवहारांमध्ये जुना काळ ते आतापर्यंतचा प्रवास बघितला तर अभूतपूर्व क्रांती झालेली आहे. जुन्या काळी वस्तूंच्या बदल्यात वस्तू देऊन घेऊन व्यवहार व्हायचा आणि आता कॅश कमी आणि क्यूआर कोडचा जास्त वापर होऊन लोक व्यवहार करायला लागले. जवळपास जगाचा पन्नास टक्के व्यवहार भारतातील लोक यूपीआयच्या माध्यमातून करतात. अशा प्रगतिपथावर असणाऱ्या भारताला निःशुल्क असलेले हे डिजिटल पेमेंटची सवय झाल्यानंतर त्यावर शुल्क लावून पुन्हा एकदा कॅश वापरण्याच्या मार्गावर जनतेला सरकारला न्यायचे आहे का? आधीच कामगार वर्ग इन्कम टॅक्स, जीएसटी, घर टॅक्स, टोल टॅक्स इत्यादी कितीतरी प्रकारचे टॅक्स देतो. त्यानंतरही पुन्हा निःशुल्क सेवेवर टॅक्स लावणे कितपत योग्य ठरेल? एकीकडे सरकार डिजिटल क्रांतीला प्रोत्साहन देते आणि दुसरीकडे आपल्याच या योजनांना खीळ लावते! इथे सामान्य जनतेवर टॅक्स लागणार नाही असं जरी म्हटलं तरी व्यापारी वर्ग ही सामान्य जनताच आहे. तो टॅक्स देणार आणि कुठेतरी सामान्य जनतेकडून ते वसूल करणार याचा सरकारने विचार करावा. शुल्क लावायचे असले तरी त्याची टक्केवारी कमी असावी. शिवाय जीवनावश्यक, दररोजच्या वापरातील वस्तू, शेतीविषयक व्यवहार, वैद्यकीय उपचाराचे व्यवहार, औषधी इत्यादी महत्त्वाच्या वस्तूंचे व्यवहार यातून वगळण्यात यावे. महागड्या चैनीच्या वस्तूंचे व्यवहार यावर टॅक्स लावू शकतो. एकीकडे सरकार लाडकी बहीणसारख्या योजना राबवून लोकांना पैसे वाटते आणि दुसरीकडे कर देणाऱ्या लोकांवर आणखी कर लादते. तेव्हा या यूपीआयवरील कराचा नक्कीच पुन्हा विचार व्हावा आणि जनतेला दिलासा देणारा निर्णय सरकारकडून व्हावा हीच अपेक्षा.




**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/यवतमाळ

## वाचक पत्रे

### पालकांची भूमिका आणि संस्कारांचा अभाव

आज शिक्षणाचे बाजारीकरण होण्यामागे जेवढ्या खाजगी शाळा जबाबदार आहेत, तेवढीच पालकांची बदललेली जीवनशैली आणि विचारसरणीही जबाबदार आहे. हल्ली आई-वडील दोघेही नोकरी करत असल्यामुळे मुलांकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. मुलाचा अभ्यासक्रम काय आहे, त्याला काय येतं, काय येत नाही हेच त्यांना माहीत नसते. एकदा शिकवणी लावली की आपली जबाबदारी संपली असे पालकांना वाटते. मुलाला कमी गुण मिळाले तर स्वतःचे आत्मपरीक्षण न करता दोष थेट शिकवणीला, शाळेतल्या शिक्षकांना किंवा मुलाला दिला जातो.

सामाजिक प्रतिष्ठेच्या नावाखाली अनेक पालक मुलांना न झेपणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये घालतात. बरेचदा नववी-दहावीतील मुलांनाही साधे इंग्रजी वाचता येत नाही, मराठी तर दूरच. तरीही दहा ठिकाणी क्लासेस लावले जातात, पण स्वतः एक तास अभ्यासाला बसवण्याचा कंटाळा केला जातो. परंतु आजची सगळ्यात गंभीर आणि चिंताजनक बाब म्हणजे शिक्षकांबद्दलचा आदर संपत चालला आहे. पूर्वी शिक्षकांनी मुलाला रागावले तरी घरी सांगायची भीती वाटायची आणि पालकही म्हणायचे की, ''माझ्या मुलाचंच काहीतरी चुकलं असेल म्हणून गुरुजी रागावले असतील.'' पण आज परिस्थिती उलटी आहे. शाळेत शिक्षकांनी मुलाला साधं रागावलं, तरी त्याचं काय चुकलं असेल याचा विचार न करता पालक थेट शिक्षकांना फोन करून, शाळेत जाऊन नको त्या भाषेत त्यांचा अपमान करतात. ज्या ठिकाणी शिक्षकांचाच आदर आणि सन्मान राहिला नाही, तिथे मुले ज्ञान कसे घेणार? जे पालक स्वतःच शिक्षकांचा आदर करत नाहीत, ते आपल्या मुलांना आदराचे, नम्रतेचे संस्कार काय शिकवणार?

यावरून मुलांवर संस्कारांचा अभाव हेच लक्षात येते. पूर्वी सकाळ-संध्याकाळ देवाजवळ दिवा लावणे, स्तोत्र म्हणणे हे सर्व घरातच शिकवले जायचे. मोठ्यांचा, शिक्षकांचा आदर कसा करायचा, चांगल्या- वाईटाची जाणीव हे संस्कार घरातच होत असे. पण आता आई-वडिलांना वेळच नाही. आणि मुले घरी आल्यावर टीव्हीसमोर बसतात, काही मोबाईल घेऊन बसतात. पालकांचा शनिवार-रविवार घरची कामे आणि बाहेर फिरण्यातच जातो. आता तर दोन श्लोक शिकवण्यासाठी सुद्धा पैसे देऊन क्लास लावावा लागतो ही मोठी शोकांतिका आहे. म्हणून कितीही महागडे क्लासेस लावले तरी पालकांनी रोज थोडा वेळ मुलांसोबत बसणे, त्यांना समजून घेणे आणि सर्वात आधी शिक्षकांचा आदर करायला शिकवले पाहिजे. म्हणजेच संस्कार हेच खरे शिक्षण आहे. ■

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### कर्नाटकात कत्तलखान्याकडे १६ जनावरे घेऊन जाणारी २ वाहने गोरक्षकांनी पकडली

**मंगळवेढा, दि.१८ सप्टेंबर-**

मंगळवेढा येथून कर्नाटकात कत्तलखान्याकडे जनावरे घेवून जाणारी दोन वाहने गोरक्षक यांनी पकडून पोलीसांच्या ताब्यात पकडून दिल्याने पोलीसांनी महंमद गौस सैपनशेख (रा. नई जिंदगी सोलापूर) व अज्ञात वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला. या घटनेची हकीकत अशी, फिर्यादी तथा गोरक्षक आदित्य हळदे (रा. मसरे गल्ली सोलापूर) यांना सांगोला येथील जनावराच्या बाजारातून जनावरे भरुन चार चाकी वाहन मंगळवेढ्याच्या दिशेने कत्तलखान्याकडे जात असल्याची माहिती मिळताच फिर्यादी दि.१६ रोजी पहाटे ४.३० वाजता एम.एच.०९ ई.एम.४९०१ या वाहनामध्ये ६५ हजार रुपये किंमतीच्या ८ जर्शी गायी व काळ्या रंगाची पाडी अशी एकूण ९ जनावरे घेवून हे वाहन मरवडे रोडच्या दिशने यातील आरोपी महंमद गौस सैपन शेख हा कर्नाटकमध्ये कत्तलखान्याकडे जात असताना त्यास हाताचा इशारा करुन गोरक्षकांनी थांबवून ते वाहन पोलीसांच्या ताब्यात दिले. तर दुसऱ्या घटनेत यातील फिर्यादी अमोल चौगुले (रा. कुरुल) हे गेल्या दोन वर्षापासून गोरक्षक दलामध्ये काम करत आहेत. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता यांना गुप्त माहिती मिळाली की,वाणीचिंचाळे (ता. सांगोला) येथून हुलजंती मार्गे कर्नाटकात चार चाकी वाहनात जनावरे भरुन ती कत्तलखान्याकडे जात आहेत. तात्काळ फिर्यादी हे रस्त्यावर रड्डे येथे रात्री २ वजाता येवून थांबले. त्यावेळी त्यांना पांढऱ्या रंगाचे पिकअप येत असल्याचे दिसले. चालकाला थांबण्याचा इशारा केला असता चालकाने वाहन थांबवून अंधाराचा फायदा घेवून तो पळून गेला. सदरचे वाहन क्रमांक एम.एच.१३ डी. क्यू.८४४२ असून या वाहनात ५५ हजार रुपये किंमतीचे पांढऱ्या रंगाचे सहा खोंड, काळ्या रंगाचे एक जर्शी खोंड अशी सात जनावरे या वाहनात गोरक्षकांना मिळून आली. पोलीसांनी दोन्ही वाहने जप्त केली आहेत. या जनावरांना चारा पाण्याची मेडीकलची व्यवस्था न करता दाटीवाटीने बांधून त्यांचा छळ करीत कत्तलखान्याकडे नेत असल्याचे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. गोरक्षक हे पिकअप गाडी घेवून मंगळवेढा पोलीस ठाण्याकडे येत असताना पाठीमागून मोटर सायकल क्र. एम.एच.४५ बी.ई.८७२१ वरील अज्ञात इसमाने पिकअप गाडीवर दगडे मारुन गाडीचे नुकसान केले.



### बोराळे येथे महालक्ष्मी सणाच्या दिवशीच घरात राडा; मुलाकडून वडिलांना मारहाण

**मंगळवेढा दि.१८ सप्टेंबर-**

तालुक्यातील बोराळे (ता. मंगळवेढा) येथे महालक्ष्मी आगमनाच्या दिवशी साफसफाई सुरू असताना जमीन व घराच्या वादातून मुलाने जन्मदात्या वडिलांसह आई व भावाला स्टीलच्या पाईपने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मंगळवेढा पोलीस ठाण्यात मुलाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी गोविंद तात्याबा गावकरे (वय ६५, रा. बोराळे) हे पत्नी प्रमिला, मुले ज्ञानेश्वर, नवनाथ, सुना कोमल, नम्रता यांच्यासह घरात महालक्ष्मी सणानिमित्त साफसफाई करत होते. त्याचवेळी आरोपी गणेश गोविंद गावकरे हा घरी आला. ''हे घर माझे आहे, तुम्ही इथे राहायचे नाही, शेतात यायचे नाही, शेतजमीन माझीच आहे'' असे म्हणत त्याने सर्वांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. ''तुम्ही शेतात आलात तर जिवंत सोडणार नाही'' अशी धमकी देत त्याने घरातील फरशी पुसण्याच्या मॉबचे स्टीलचे पाईप काढून वडील गोविंद यांच्या डोक्यात व मुलगा ज्ञानेश्वर याच्या दोन्ही हातावर, पाठीवर आणि मानेवर मारहाण केली.भांडण सोडवण्यासाठी मध्ये आलेल्या पत्नी प्रमिला हिला त्याने भिंतीवर ढकलून दिले, तर मुलगा नवनाथ याचा डावा हात पिरगाळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व शिवीगाळ करत पसार झाला.या मारहाणीत फिर्यादी व त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर जखमी झाले असून त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे उपचार करून पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली.या तक्रारीवरून मंगळवेढा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८४८/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२ अन्वये आरोपी गणेश गावकरे (रा. बोराळे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हरवले आहे

मी **विश्वनाथ विवेकानंद कंदकुरे,** रा. २७३, दक्षिण सदर बाजार मौलाली चौक, सोलापूर या पत्त्यावर राहत असून दिनांक : ०१/०८/२०२६ रोजी सात रस्ता ते रेल्वे स्टेशन परिसरात माझे मूळ जातवैधता प्रमाणपत्र हरवले आहे. मी याची रितसर नोंद पोलीस स्टेशनला दिली आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावे.

**विश्वनाथ विवेकानंद कंदकुरे (मो. ९०२१८५३२६१)**
**पत्ता :- २७३, दक्षिण सदर बाजार, मौलाली चौक, सोलापूर**

## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१

**नीलकंठ को.ऑप. बँक लि., सोलापूर** - **अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २२२/ २०२६-२७ | ७३,९१५/- | १ | **अश्वजीत शंकर गोणी** रा. ३०५, रमाबाई आंबेडकर नगर, न्यू बुधवार पेठ, सोलापूर |
| | | | २ | **अजित भागवत पाटील** रा. २१७, ब्रह्मपुरी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार, दि. ०६/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल, त्याप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दिनांक : १७/०९/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/- उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

# सोलापूर जिल्ह्याचा 'दुष्काळी अहवाल' शासन दरबारी सादर

### जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

एल निनोच्या प्रभावातून यंदा पावसाने पाठ फिरवली आहे. पावसाळ्याच्या आतापर्यंतच्या ११५ दिवसांपैकी जवळपास जवळपास सरासरी ४५ दिवस ड्राय ठरले आहेत. इतर दिवसांतही पडलेला आतापर्यंतचा पाऊस सरासरीच्या ३० ते ३५ टक्के इतकाच झाला आहे. एक-दोन तालुके वगळता जवळपास सर्वच तालुक्यांमध्ये पावसाचा सलग खंड कालावधी सारखाच राहिला आहे. याचा परिणाम पिकांवर होऊन जिल्ह्यात सरासरी ७० ते ८० टक्क्यांपर्यंत पिकांचे नुकसान निदर्शनास येत असल्याचा प्राथमिक अहवाल जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी शासनाकडे पाठविला असल्याची माहिती दिली. दरम्यान, आता शासन स्तरावरून लवकरच या दुष्काळी स्थिती बाबतचा पुढील निर्णय होणार आहे.



जिल्ह्याची पावसाची सरासरी ५८४ मिमी इतकी असून, आतापर्यंत केवळ २१२ मिमीपर्यंत पाऊस झाला आहे. ऑगस्टपासून पावसाचा सलग खंड नोंदवला गेला आहे. हा खंड कालावधी जवळपास ४५ दिवस इतका प्रदीर्घ आहे. याचा परिणाम पिकांवर झाला आहे. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सुचनेनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी कृषी, महसूल, कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, आयआयटीचे तज्ज्ञ यांच्या समितीने संपूर्ण जिल्ह्यात पाहणी करुन अहवाल सादर केला आहे. त्यानुसार ७० ते ८० टक्के पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल आहे.

जिल्ह्यातील सर्वच ११ तालुक्यांत पाहणी करण्यात आली आहे. पावसातील खंड आणि कमी पावसामुळे जिल्ह्यातील काही भागांत निर्माण झालेल्या दुष्काळसदृश्य परिस्थितीची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी सोलापूर जिल्हा प्रशासन थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले होते. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी ४ सप्टेंबर रोजीच जिल्ह्यातील सर्व प्रांताधिकारी व तहसीलदारांना शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन पिकांची, पाण्याची व चारा उपलब्धतेची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांकडून दुष्काळ परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली असून, त्याचा अहवाल शासन स्तरावर पाठविण्यात आला आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन, ऊस व मका या पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी पिकांची पेरणी कधी करण्यात आली, पाऊस शेवटचा कधी झाला, त्यानंतर किती दिवसांचा पावसाचा खंड आहे आणि जमिनीमध्ये सध्या किती ओलावा आहे, याची माहिती शेतकऱ्यांकडून घेतली. याच पाहणी दौऱ्यात कागदी लिंबू उत्पन्न घेत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाचा डिजिटल क्रॉप सर्व्हे जिल्हाधिकारी यांनी स्वतः केला होता. दरम्यान, पिकांबरोबरच गावातील पिण्याच्या पाण्याची स्थिती आणि जनावरांसाठी उपलब्ध असलेल्या चारा-पाण्याचीही त्यांनी माहिती घेतली. तसेच महसूल व कृषी विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी वस्तुनिष्ठपणे दुष्काळ पाहणी करून त्वरित अहवाल सादर केला आणि जिल्हाधिकाऱ्यांनी तो अहवाल शासनाकडे पाठवून दिला आहे.

#### उपलब्ध जलसाठ्याचा योग्य पद्धतीने वापर

उजनी धरण सध्या १०० टक्के भरलेले आहे. धरण पूर्ण भरल्यानंतर अतिरिक्त पाण्याचा विसर्ग करून जिल्ह्यातील सुमारे ४० टक्के लघु पाणी प्रकल्प भरून घेण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचा योग्य पद्धतीने वापर करण्याबरोबरच भविष्यातील पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात येत आहे.

### विवाहितेस फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी अज्ञाताविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा दि. १८ सप्टेंबर-**

मंगळवेढा शहर परिसरातून एका २५ वर्षीय विवाहितेस व तिच्या दोन मुलास अज्ञात कारणावरुन फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी अज्ञात व्यक्ती विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादीची २५ वर्षीय पत्नी ही दि. ६ सप्टेंबर रोजी सकाळी ७ ते रात्री ९ च्या दरम्यान टोळनाका परिसरात राहत असलेल्या घरातून कोणी तरी अज्ञात इसमाने कशाचे तरी अमिष दाखवून गुपचूप पळवून नेले असल्याची फिर्याद सदर विवाहितेच्या पतीने पोलीसात दिल्याने अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल झाला असून पोलीस हवालदार दत्तात्रय व्हरे हे तपास करीत आहेत. दरम्यान सदर महिलेचे वर्णन- उंची ५ फुट, अंगाने मध्यम, रंग सावळे, चेहरा गोल, नाक सरळ, डोळे मोठे, अंगात नेसणेस राखाडी रंगाचा टॉप व काळ्या रंगाची पँट, भाषा हिंदी व मराठी बोलते, तसेच सोबत ५ व ४ वर्षाची दोन मुले आहेत. अशा वर्णनाची कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी तात्काळ मंगळवेढा पोलीसांशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

### रानमसले येथे एकाची गळफासाने आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

अज्ञात कारणावरून एका ५५ वर्षीय व्यक्तीने घराजवळील लिंबाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथे गुरुवारी मध्यरात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास उघडकीस आली. बाळासाहेब तुकाराम सुरवसे (वय ५५ वर्ष, रा. रानमसले, उत्तर सोलापूर ) असे त्या गळफास घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. गुरुवारी मध्यरात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास त्यांचा मृतदेह घराजवळील लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. नातेवाईकांच्या साह्याने सदरचा मृतदेह खाली उतरून भाऊ पांडुरंग यांनी येथील शासकीय रुग्णालयात पहाटे दोन वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

### एड्सविषयी शास्त्रीय माहिती आणि सजगता हवी : शेख

**'एल.बी.पी.एम.' महाविद्यालयात एड्स प्रतिबंध व नियंत्रण जागरूकता कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर -**

सोलापूर : एड्सविषयी समाजात आजही अनेक गैरसमज आढळतात. भीती किंवा अपुऱ्या माहितीपेक्षा शास्त्रीय आणि योग्य माहिती समजून घेणे महत्त्वाचे आहे. एचआयव्हीचा प्रतिबंध, त्याच्या संसर्गाचे मार्ग आणि स्वतःच्या आरोग्याविषयी जबाबदार वर्तन याबाबत तरुणांमध्ये जागरूकता निर्माण झाली, तर प्रतिबंधाच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळू शकते, असे प्रतिपादन समुपदेशक सुनाभी शेख यांनी केले.

सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग आणि जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंटेन्सिफाइड आयईसी कॅम्पेन' अंतर्गत महाविद्यालय संवेदीकरण उपक्रमात एड्स प्रतिबंध व नियंत्रण जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर पवार होते. व्यासपीठावर अमित माळी, प्रथमेश चव्हाण आणि दीपक साठे उपस्थित होते.



यावेळी शेख यांनी संसर्गाबाबतचे गैरसमज, प्रतिबंध, तपासणी, समुपदेशनाची गरज यांविषयी मार्गदर्शन केले. याविषयीची जागरूकता म्हणजे केवळ संसर्गापासून स्वतःचे संरक्षण करणे नव्हे, तर बाधित व्यक्तींकडे सन्मानाने आणि संवेदनशीलतेने पाहणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. उपप्राचार्य डॉ. किशोर पवार यांनी विद्यार्थिनींनी आरोग्यविषयक प्रश्नांकडे वैज्ञानिक आणि संवेदनशील दृष्टिकोनातून पाहण्याची गरज व्यक्त केली.

उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक डॉ. अनिल कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संतोष मारकवाड यांनी केले. डॉ. नागोराव भुरके यांनी आभार मानले.

### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर २१ सप्टेंबरला पुण्यात खलबतं

**स्थगित आंदोलन पुन्हा सुरू करण्याच्या दिशेने हालचाली**

**पुढील आंदोलनाची दिशा व कृती कार्यक्रमावर सामूहिक निर्णय**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे दीर्घकाळापासून प्रलंबित असलेले विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्यापीठे व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने पुन्हा हालचाली सुरू केल्या आहेत. यापूर्वी स्थगित करण्यात आलेल्या आंदोलनाच्या पुढील टप्प्याबाबत निर्णय घेण्यासाठी समितीची महत्त्वपूर्ण बैठक २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध महत्त्वाच्या प्रश्नांबाबत समितीने शासनाकडे वेळोवेळी निवेदने सादर करून पत्रव्यवहार तसेच विविध स्तरांवर पाठपुरावा केला आहे. मात्र, अद्याप अपेक्षित ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे समितीने बैठकीच्या सूचनेत नमूद केले आहे. त्यामुळे प्रलंबित प्रश्नांच्या तातडीच्या निराकरणासाठी पुढील भूमिका निश्चित करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

बैठकीत प्रलंबित प्रश्नांचा आढावा, शासन स्तरावर करण्यात आलेल्या पाठपुराव्याची माहिती तसेच स्थगित आंदोलन पुढील टप्प्यात नव्याने सुरू करण्याबाबत चर्चा होणार आहे. त्याचबरोबर आंदोलनाची पुढील दिशा आणि कृती कार्यक्रम निश्चित करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून सामूहिक निर्णय घेतला जाणार आहे.

समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित राहून आपली भूमिका, सूचना व मार्गदर्शन मांडावे, असे आवाहन अध्यक्ष अजय बळवंत देशमुख यांनी केले आहे. संबंधित पदाधिकाऱ्यांना बैठकीस उपस्थित राहण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे, अशी विनंती विद्यापीठे व महाविद्यालयांच्या प्रशासनालाही करण्यात आली आहे.

### ४० फूट खोल विहिरीत पडलेल्या सापाला मिळाले जीवदान

**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर -**

संतोष नगर बाळे येथील शेतकरी पावले यांच्या ४० फूट खोल विहिरीमध्ये एक महिन्यापासून एक साप पडल्याचे माहिती निखिल दारिगोल व प्रकाश अवताडे यांनी, सदस्य सुरेश क्षिरसागर यांना कळविले. ४० फूट खोल असलेल्या विहिरीमध्ये एक घोणस जातीचा विषारी साप साधारण साडे तीन फुट लांबीचा पडल्याचे आढळून आले. विहीर दगडाने बांधलेली व विहिरीत जाण्यासाठी पायऱ्या होत्या पण विहीर अर्धवट ढासळलेली होती. त्यामुळे खाली उतरता येत नव्हते. कुठलीही साधनसामग्री सोबत नसताना सुरेश क्षीरसागर यांच्या कमरेला दोरी बांधून विहीरीत उतरून एका स्नेक स्टिकच्या सह्याने अथक परिश्रमानंतर या सापाला विहिरीतून काढून नैसर्गिक अधिवासामध्ये पुन्हा सोडून देण्यात आले. या कार्यासाठी सुरेश क्षिरसागर, लखन भोगे, प्रवीण गावडे, विकी चराटे, राहुल दोरकर, गुरु चराटे व शेतकरी रेवन कांबळे यांनी परिश्रम घेतले.



## CHANGE OF NAME

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME MANISHA BHARTENDU KUMAR HAS BEEN CHANGED TO **MANISHA BHARTENDU SAHA** (AS PER PAN & AADHAR CARD) RESIDING AT FLAT NO.B-704, PANACHE APPARTMENT, VIJAPUR ROAD, OPP.ARJUN TOWER, SOLAPUR -413004 . KINDLY NOTE THE SAME. (AFFIDAVIT REGISTERED SR.NO. 4346 dated 18.09.2026)

## नावात बदल

माझे जुने नाव गंदगे ऋत्विक आनंद होते ते आता बदलून ऋत्विक आनंदकुमार गंदगे असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर प्रतिज्ञा पत्र क्र. ९२७१ /२०२६ दिनांक - १८/०९/२०२६

## बँक ऑफ बडौदा / Bank of Baroda

**नवी पेठ, शाखा - पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, विठ्ठल मंदिर चौपाड, नवी पेठ, सोलापूर - ४१३००७**

**परिशिष्ठ 3-A प्रतिकात्मक ताबा नोटीस**

ज्या अर्थी, खाली सही करणार बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, यांनी सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सेक्शन १३(२) कलमाखाली व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ चा रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन कर्जदार **श्री. लायेश बालाजी क्यातम आणि सौ. अपेक्षा लायेश क्यातम यांना दिनांक ०१/०७/२०२६ रोजी मागणी नोटीस बजावली** होती की त्यांनी सदर मागणी नोटीसीत नमूद केलेली **रक्कम रु. २२,९८,५५३.३३/- (अक्षरी - बावीस लाख आठ्याण्णव हजार पाचशे त्रेपण्ण रुपये आणि तेहतीस पैसे फक्त) + त्यावर अधिक व्याज + इतर खर्च** हे या नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार ही रक्कम परत करण्यास अपयशी ठरले असल्याने विशेषकरुन कर्जदार / जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी त्यांना / तिला सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) चा रुल ८ अंतर्गत अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. १७/०९/२०२६ रोजी प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेष करुन कर्जदार, आणि जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो बँक ऑफ बडोदा यांना येणे रक्कम **रु. २२,९८,५५३.३३/- (अक्षरी - बावीस लाख आठ्याण्णव हजार पाचशे त्रेपण्ण रुपये आणि तेहतीस पैसे फक्त) + व्याज + इतर खर्च** यांच्या अधिन राहील.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

सोलापूर जिल्हा व उप जिल्हा आणि उत्तर सोलापूर तालुका येथील सीटीएस क्रमांक १०३८७, फायनल प्लॉट क्रमांक ३३/३, सबप्लॉट क्रमांक २३/ब (एकूण क्षेत्रफळ २९०.०० चौ.मी.) या मालमत्तेपैकी पश्चिमेकडील ४६.४६ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग, जी मालमत्ता सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यु पाच्छा पेठ, सोलापूर येथे स्थित असून तिचा महानगरपालिका घर क्रमांक ३३/३/२३ असा आहे आणि जी श्री. लायेश बालाजी क्यातम व सौ. अपेक्षा लायेश क्यातम यांच्या मालकीची आहे.

चतु:सिमा :
पुर्वेस : श्री अंबाजी आनंद कट्टा यांची सब प्लॉट नं. २३/ब ची मालमत्ता
दक्षिणेस : फायनल प्लॉट नं. ३३/३/२४
उत्तरेस : सब प्लॉट नं. २३/ब, आणि लहान बोळ
पश्चिमेस : रोड

दिनांक : १७/०९/२०२६
स्थळ : नवी पेठ, सोलापूर

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

सही/-
**अधिकृत अधिकारी**
बँक ऑफ बडोदा

## अर्जुन अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर (विसर्जित)

**२९/३० रविवार पेठ, सोलापूर**

**अंतिम सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(फक्त सभासदांकरीता)**

अर्जून अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर (विसर्जित), २९/३०, रविवार पेठ, सोलापूर-४१३००५ या बँकेच्या सर्व सभासदांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदरची बँक दिनांक २९/०५/२०१३ रोजी अंतिम अवसायनात घेण्यात आल्यानंतर बँकेचा अवसायन कालावधी १३ वर्षे संपून गेलेला आहे. त्यामुळे अवसायक यांनी अवसायनाचा अंतिम अहवाल मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांना सादर केलेला असून त्यांनी दिनांक : ०४/०९/२०२६ रोजीच्या आदेशान्वये बँकेची अंतिम सर्वसाधारण सभा घेण्यास मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार या अवसायन बँकेच्या सर्व सभासदांची अंतिम सर्वसाधारण सभा वार : बुधवार दिनांक : ०७/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता बँकेचे अवसायक यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करण्यासाठी बँकेचे कार्यालय, सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक नियं., सोलापूर, २९/३०, रविवार पेठ, सोलापूर येथे आयोजित केली आहे.

तरी सर्व सभासदांनी आपले ओळखपत्र व बँकेच्या प्रतिनिधी निवडीच्या ठरावासह वेळेत उपस्थित राहावे. ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) अवसायक यांनी केलेल्या कामकाजाचा आढावा घेणे.
२) अवसायन कामकाज आटोपल्यानंतर शिल्लक राहिलेल्या येणे व देणे रक्कमेचा विचार करणे.
३) बँकेची नोंदणी रद्द करणेसंबंधी निबंधकास अहवाल सादर करणेबाबत विचार करणे.
४) अवसायक यांच्या पूर्व परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**स्थळ : सोलापूर.**
**दिनांक : १७/०९/२०२६**

शिक्का

**सही/-**
**ए.ए. गावडे**
**अवसायक**
**अर्जून अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर (विसर्जित)**

**विशेष सुचना :-**

१) ज्या सभासदांना बँकेच्या अंतिम सर्वसाधारण सभेमध्ये काही सुचना व प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दि. ०१/१०/२०२६ रोजीपर्यंत बँकेच्या कामकाजाच्या वेळेत लेखी स्वरुपात आणून द्यावेत.
२) अवसायक कामकाजाचा अहवाल बँकेच्या नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.
३) गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

## बँक ऑफ महाराष्ट्र

**आंचलिक कार्यालय, सोलापूर**
पहिला मजला, अग्रवाल पॅलेस, भारती विद्यापीठ रोड, जुळे सोलापूर, पिन - ४१३००४

Zen Life — Making Life Simpler — Bank of Maharashtra
YEAR OF DEPOSITS FY 2026-27

**कब्जा ताबा नोटीस - वळसंग शाखा**

ज्याअर्थी, बँक ऑफ महाराष्ट्र चे खालील सही करणारे अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अन्वये आणि कलम १३ (१२) सह वाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ खाली प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **१३/०७/२०२६** रोजी मागणी नोटीस जारी केली होती; ज्यामध्ये कर्जदार **सौ. सुनिता प्रविण सोणसळे (कर्जदार) आणि श्री. शेखर प्रविण सोणसळे (सह-कर्जदार)** यांना सदर नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम **रु. २५,४२,३५४/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख बेचाळीस हजार तीनशे चौपन्न फक्त)** अधिक मासिक आधारावरील न आकारलेले व्याज आणि कराराच्या दरानुसार पुढील व्याज, तसेच **१३.०७.२०२६** पासून प्रत्यक्ष भरणा करेपर्यंतचा झालेला व होणारा आनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादीसह नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत भरणा करण्याचे आवाहन केले होते.

सदर कर्जदार आणि वर नमूद इतर व्यक्ती रक्कम भरण्यास अपयशी ठरल्याने, याद्वारे कर्जदार, वर नमूद व्यक्ती आणि सर्वसामान्य जनतेस विशेषतः कळविण्यात येते की, खालील सही करणाऱ्या अधिकाऱ्याने सदर कायद्याच्या कलम १३ (४) सह वाचता नियम ८ अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा दिनांक **१७/०९/२०२६** रोजी घेतला आहे.

कर्जदार, वर नमूद इतर व्यक्ती आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, त्यांनी खालील मालमत्तेचा कसलाही व्यवहार करू नये. मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार हा बँक ऑफ महाराष्ट्र, **वळसंग** शाखा यांच्या रु. **२५,४२,३५४/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख बेचाळीस हजार तीनशे चौपन्न फक्त)** अधिक दिनांक **१३.०७.२०२६** पासूनचे कराराच्या दरानुसार पुढील व्याज, आनुषंगिक खर्च आणि शुल्कासह बोजाच्या अधीन राहील.

**मालमत्तेचे वर्णन**

सी.एस. नं./प्लॉट नं. १०३८९, ए/३५/२१५/२१६/बी मधील सर्व तुकडा व भाग, ज्याचे एकूण क्षेत्रफळ १५७.४६ चौ.मी. आहे. सदर मालमत्तेवर उभारण्यात आलेल्या 'गुंटूक कॉम्प्लेक्स अपार्टमेंट' मधील पहिल्या मजल्यावर, ईशान्य बाजूला स्थित असणारा फ्लॅट नं. १०१, ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ ३२.७७ चौ.मी., एकूण बिल्ट-अप क्षेत्रफळ ३५.८४ चौ.मी., सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ ५४.१२ चौ.मी. (५८२.३३ चौ.फूट) आणि या फ्लॅटला लागून असलेले टेरेसचे क्षेत्रफळ ६०० चौ.फूट आहे. सदर मालमत्ता ही न्यू पाच्छा पेठ, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर, सोलापूर महानगरपालिका हद्दीतील - ४१३००६ मध्ये स्थित असून तिची चतुःसीमा खालीलप्रमाणे आहे :- **पूर्व** : फ्लॅट नं. १०२, **पश्चिम** : साईड मार्जिन, **दक्षिण** : रस्ता **उत्तर** : साईड मार्जिन

तसेच सदर जागेवर उभारण्यात आलेली किंवा बांधली जाणारी इमारत, संरचना आणि त्यास जोडलेले सर्व कायमस्वरूपी फिक्सचर्ससह

CERSAI Asset ID-200070628529

**दिनांक : १७/०९/२०२६**
**ठिकाण : वळसंग, सोलापूर**

शिक्का

**सही/-**
**अधिकृत अधिकारी,**
**बँक ऑफ महाराष्ट्र**

## महत्त्वाचे

### बिचू देवीला पॉलिग्रास मॅजिक स्किल पुरस्कार

**लॉसेन :** नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये नुकत्याच पार पडलेल्या एफआयएच विश्वचषकात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल भारतीय महिला हॉकी संघाची गोलरक्षक बिचू देवी करिबम आणि पाकिस्तानचा आक्रमक खेळाडू अब्दुल रहमानने 'पॉलिग्रास मॅजिक स्किल अवॉर्ड्स' जिंकले. हे पुरस्कार चाहत्यांच्या मतांवर आधारित होते; चाहत्यांनी अशा क्षणांची निवड केली ज्यांनी हॉकीची खरी जादू दर्शवली. हे पुरस्कार एफआयएचचे जागतिक पुरवठादार 'पॉलिटन' यांच्यातर्फे प्रदान करण्यात आले. 'पॉलिग्रास मॅजिक स्किल अवॉर्ड'साठीच्या अंतिम यादीत सहा उत्कृष्ट आणि नेत्रदीपक कामगिरींचा (तीन महिला आणि तीन पुरुष खेळाडूंच्या) समावेश होता, ज्या हॉकीच्या या प्रमुख जागतिक स्पर्धेत पाहायला मिळाल्या. महिला गटातील पुरस्कार बिचू देवीला मिळाला.

### क्विन्सी, इम्रान टेकबॉलच्या कांस्य पदकाच्या फेरीत

**नागोया :** आशियाड क्रीडा स्पर्धेत भारताच्या क्विन्सी जोआकिम डिसूझा आणि मोहम्मद अनस इम्रान बेगने शुक्रवारी टेकबॉल प्रकारातील मिश्र दुहेरीचा 'रिपेचार्ज' सामना जिंकून कांस्य पदकाच्या लढतीत प्रवेश केला. या भारतीय जोडीने रिपेचार्ज सामन्यात फिलिपिन्सच्या जोआना अबुलेंसिया आणि प्रिन्स ऑगस्टिन यांचा २-० असा पराभव करून कांस्य पदकाच्या सामन्यात स्थान मिळवले. त्यांनी पहिला सेट १२-३ आणि दुसरा सेट १२-६ अशा फरकाने जिंकत दमदार कामगिरी केली. ही भारतीय जोडी आता रविवारी कांस्य पदकासाठी सामना खेळेल आणि त्यांना त्यांच्या प्रतिस्पर्ध्याची प्रतीक्षा आहे. याआधी, त्यांना उपांत्यपूर्व फेरीत व्हिएतनामच्या जिया न्घी त्रिन आणि होआंग मिन्ह टॅन गुयेन या जोडीकडून पराभव स्वीकारावा लागला होता.

### डेव्हिस चषकात भारत कोरियाविरुद्ध पिछाडीवर

**सेऊल :** येथे शुक्रवारी झालेल्या डेव्हिस चषक टेनिस पात्रता फेरी सामन्याच्या पहिल्या दिवशी, दक्षिण कोरियाविरुद्ध भारताची स्थिती ०-२ अशी पिछाडीवर पडली आहे. दक्षिणेश्वर सुरेश आणि सुमित नागलने आपापल्या एकेरीच्या सामन्यांत चांगली सुरुवात करूनही ती संधी गमावली आणि पराभव स्वीकारला. त्यामुळे भारताच्या 'फायनल ८' मध्ये पोहोचण्याच्या आशा आता धोक्यात आल्या आहेत. दक्षिणेश्वरने आपल्या डेव्हिस चषक कारकिर्दीतील पहिलाच सामना गमावला; त्याला कोरियाचा अव्वल खेळाडू सूनवू क्वॉन याने ३-६, ६-३, ६-४ असे पराभूत केले. भारताला सामन्यात परत आणण्याची जबाबदारी भारताचा अव्वल खेळाडू सुमित नागल याच्यावर होती.

### भारतीय सॉफ्ट टेनिस संघाचा पराभव

**नागोया :** आशियाड क्रीडा स्पर्धेतील सॉफ्ट टेनिस प्रकारात, शुक्रवारी झालेल्या पुरुष सांघिक उपांत्यपूर्व फेरीत भारताला इंडोनेशियाकडून ०-२ असा पराभव पत्करावा लागला; तत्पूर्वी, गट फेरीमध्ये भारताने दोन विजय मिळविले होते. गट 'सी' मधील सामन्यांमध्ये भारताने मंगोलिया आणि लाओ यांच्यावर विजय मिळविला, तर चीन तैपेईविरुद्ध त्यांना पराभव स्वीकारावा लागला. भारतीय संघाचे प्रतिनिधित्व जय मीना, आर्यन ठाकूर, योगेश चौधरी, अनिकेत पाटील आणि ओम यादव यांनी केले. उपांत्यपूर्व फेरीत भारताचा सामना इंडोनेशियाच्या संघाशी झाला, ज्यामध्ये फर्नांडो सँगर, टिओ हुटाउरुक, मुहम्मद फलेवी, रिझकी लालुयान आणि बागस प्रादेवा यांचा समावेश होता. भारतासाठी जय मीना आणि योगेश चौधरी यांनी पुरुष दुहेरीच्या सामन्यात सुरुवात केली. ■

# आशियाड क्रीडा स्पर्धा आजपासून

**नागोया, १८ सप्टेंबर**

२०२६ च्या आशियाड क्रीडा स्पर्धा जपानमधील आइची-नागोया येथे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहेत. यात आशियाभरातील ११,००० हून अधिक खेळाडू सहभागी होण्याची अपेक्षा आहे. भारत अॅथ्लेटिक्स, क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन, नेमबाजी, कुस्ती, बॉक्सिंग, कबड्डी आणि इतर अनेक खेळांमध्ये आपला मजबूत संघ उतरवणार आहे.

जपान २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेचे यजमानपद भूषवणार आहे; या स्पर्धेमुळे खंडातील सर्वोत्तम क्रीडा व्यक्तिमत्त्वे क्रीडा-वैभवाच्या मंचावर एकत्र येतील. जपानमधील आइची आणि नागोया ही या बहु-क्रीडा स्पर्धेची मुख्य शहरे असतील. येथे ४० राष्ट्रीय संघांचे प्रतिनिधित्व करणारे ११,००० हून अधिक खेळाडू अनेक दिवसांत विविध क्रीडा प्रकारांमधील स्पर्धांमध्ये सहभागी होतील.



आइची-नागोया आशियाड क्रीडा स्पर्धेसाठी नागोयातील मुख्य स्टेडियम सज्ज

हॅण्गझोऊ २०२२ मधील यशानंतर भारत या स्पर्धेत पदकांची सर्वोत्तम कामगिरी करण्याची आशा बाळगत आहे आणि देशभरातील लाखो क्रीडाप्रेमी या स्पर्धा सुरू होण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत.

उद्घाटन समारंभ १९ सप्टेंबर रोजी सुरू होईल आणि समारोप समारंभ ४ ऑक्टोबर रोजी होईल. फुटबॉल आणि क्रिकेटसारख्या काही स्पर्धा अधिकृत उद्घाटन समारंभापूर्वीच आयोजित केल्या जात आहेत.

जपानमध्ये 'जपान स्टँडर्ड टाइम' (जेएसटी) वापरला जातो, जो 'इंडियन स्टँडर्ड टाइम' (आयएसटी) पेक्षा ३ तास ३० मिनिटे पुढे आहे. विविध खेळांची ठिकाणे वेगळी असल्याने त्यांच्या स्पर्धांचे वेळापत्रकही वेगळे असेल. अनेक स्पर्धा पहाटेच्या वेळी, तर काही दुपारच्या वेळी आयोजित केल्या जातील. भारतीय चाहत्यांना बहुतेक स्पर्धा पहाटेपासून पहाव्या लागतील, तर पदकांसाठीच्या अंतिम स्पर्धा प्रामुख्याने दुपारनंतर ते संध्याकाळपर्यंत होतील.

२०२६ च्या स्पर्धेत ४१ विविध खेळ आणि ६८ क्रीडा प्रकार असतील. ही कदाचित आतापर्यंतची सर्वात मोठी उन्हाळी आवृत्ती ठरेल. ई-स्पोर्ट्स स्पर्धा ऑलिम्पिक पदक कार्यक्रमाचा भाग असतील, तर मिश्र मार्शल आर्ट्स, सर्फिंग आणि टेकबॉल यांसारखे नवीन क्रीडा प्रकार प्रेक्षकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरतील. टीव्हीवर थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी, भारतीय प्रेक्षक 'सोनी स्पोर्ट्स नेटवर्क' पाहू शकतात. थेट प्रवाहासाठी प्रेक्षक 'सोनी लिव्ह' या प्लॅटफॉर्मचा वापर करू शकतात. भारतीय उपखंडातील आशियाई खेळ २०२६ च्या प्रसारणाचे हक्क 'सोनी'कडे असल्याने, येथील प्रेक्षक नेटवर्क किंवा अॅपद्वारे कोणत्याही अडथळ्याविना या क्रीडा स्पर्धांचा आनंद घेऊ शकतील. ◂ (वृत्तसंस्था)

# भारत उपांत्य फेरीत

### श्री चरणी, शेफालीची चमकदार कामगिरी; जपानचा धुव्वा

**निशिन (जपान), १८ सप्टेंबर**

सलामीवीर शेफाली वर्माची अष्टपैलू कामगिरी व डावखुरी फिरकीपटू एन. श्री चरणीच्या भेदक माऱ्याच्या जोरावर गतविजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाने शुक्रवारी येथे अननुभवी जपानचा आठ गडी राखून सहज पराभव केला आणि आशियाड क्रीडा स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.



फटकेबाजी करताना शेफाली वर्मा

चरणी (१० धावांत ४ बळी व शेफालीने (१३ धावांत २ बळी) मिळून सहा बळी टिपले. भारताने जपानचा डाव अवघ्या ५७ धावांत गुंडाळला आणि त्यानंतर केवळ पाच षटकांत हे लक्ष्य गाठले. या विजयामुळे आता २० सप्टेंबर रोजी बांगलादेशविरुद्धचा सामना निश्चित झाला आहे. या छोट्याशा धावसंख्येचा पाठलाग करताना शेफालीने (१५ चेंडूंत नाबाद ४० धावा) व ऋचा घोषने (६ चेंडूंत १२ धावा) महत्त्वाची भूमिका बजावली. तरीही, जपानसाठी आनंदाचे काही क्षण होते; कारण त्यांनी सलामीवीर गुनालन कमलिनि आणि तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या भारती फुलमाळीला बाद करण्यात यश मिळविले. अत्यंत कमी धावसंख्येचा बचाव करत असतानाही जपानच्या खेळाडूंनी दाखवलेला उत्साह त्यांच्या जिद्दीचे दर्शन घडवणारा होता. मात्र, केवळ जिद्दीच्या जोरावर शेफाली आणि घोषसारख्या दर्जेदार खेळाडूंना रोखणे त्यांना शक्य झाले नाही; या दोघींनी सहजपणे भारताला विजय मिळवून दिला.

◂ (वृत्तसंस्था)

# भारताच्या १९ वर्षांखालील संघाचा सात धावांनी विजय

### अष्टपैलू यशवर्धन चौहानची चमकदार कामगिरी

**राजकोट, १८ सप्टेंबर**

शुक्रवारी निरंजन शाह स्टेडियमवर झालेल्या पावसामुळे संक्षिप्त करण्यात आलेल्या पहिल्या 'युथ वन-डे' सामन्यात, अष्टपैलू यशवर्धन चौहानच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर भारताच्या १९ वर्षांखालील संघाने ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघावर ७ धावांनी रोमहर्षक विजय मिळवला.

पावसामुळे प्रत्येक बाजूसाठी २० षटकांचा करण्यात आलेल्या या सामन्यात, फलंदाजीसाठी आमंत्रित केल्यानंतर भारतीय १९ वर्षांखालील संघाने ६ बाद १८२ अशी मजबूत धावसंख्या उभारली. चौहानने ३४ चेंडूंत ५४ धावांची खेळी करत सर्वाधिक धावा केल्या; त्याच्या या खेळीत पाच चौकार आणि दोन षट्कारांचा समावेश होता. या सामन्यात भारताचे दिग्गज क्रिकेटपटू राहुल द्रविड आणि वीरेंद्र सेहवाग यांचे पुत्र - अन्वय द्रविड आणि आर्यवीर सेहवाग - यांचाही सहभाग होता.

अष्टपैलू आर्यवीरने २६ चेंडूंत २८ धावा (पाच चौकारांसह) करत डावाची दमदार सुरुवात करून दिली. त्यानंतर, यष्टिरक्षक-फलंदाज अन्वयने आक्रमक पवित्रा घेत १८ चेंडूंत ३८ धावांची धडाकेबाज खेळी केली. द्रविड व चौहानने पाचव्या गड्यासाठी ६९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. १२ व्या षटकात संघाची अवस्था ४ बाद ८८ अशी असताना या भागीदारीने भारताला कठीण परिस्थितीतून सावरले. ऑस्ट्रेलियासाठी ऑफ-स्पिनर एली ब्रेनने उत्कृष्ट गोलंदाजी केली आणि त्याने आपल्या चार षटकांत २९ धावांत २ बळी घेतले.

१८३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघाने आपल्या आघाडीच्या फळीतील फलंदाजांच्या भरीव योगदानाच्या जोरावर जोरदार लढा दिला. कर्णधार जॅक झोस्नेकने २७ चेंडूंत ५५ धावांची धडाकेबाज खेळी (सहा चौकार आणि तीन षटकारांसह) करत संघाच्या विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या, परंतु त्यानंतर ऑस्ट्रेलिया अ संघाला मर्यादित षटकांत ७ बाद १७५ धावांपर्यंतच मजल मारता आली.

◂ (वृत्तसंस्था)



ध्वजारोहण सोहळ्यात अंजली भागवत व लिजो डेव्हिड थोट्टन

# आशियाडमध्ये भारत, इतर देशांचा ध्वजारोहण सोहळा

**नागोया, १८ सप्टेंबर**

आशियाड क्रीडा स्पर्धेतील भारत आणि इतर पाच पथकांचा ध्वजारोहण सोहळा शुक्रवारी एका तासाहून अधिक काळ लांबणीवर पडला. 'ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशिया' आणि स्थानिक आयोजन समिती यांच्यातील 'संवाद-त्रुटी' हे या व्यत्ययाचे कारण असल्याचे सांगण्यात आले.

खेळाडूंसाठीच्या कंटेनर-शैलीतील निवासस्थानाजवळ असलेल्या 'गार्डन पियर' येथे जपानच्या वेळेनुसार दुपारी १:३० वाजता हा सोहळा सुरू होणार होता, परंतु तो सुरुवातीलाच २० मिनिटे उशिरा सुरू झाला. सोहळ्यासाठीचे वाद्यवृंद (बँड) मंचावर आले होते, तसेच 'निन्जा' योद्ध्यांच्या वेशभूषेतील कलाकारही आपली कला सादर करण्यासाठी सज्ज होते.

भारताचे 'शेफ-द-मिशन' सहदेव यादव आणि चार 'डेप्युटी शेफ-द-मिशन' - ए. शरथ कमल, लिजो डेव्हिड थोट्टन, अलकनंदा अशोक आणि अंजली भागवत - हे सर्वजण घटनास्थळी उपस्थित होते. परंतु येमेन, उत्तर कोरिया, पॅलेस्टाईन, भारत, चायनीज-तैपेई आणि तिमोर-लेस्ते या सहा पथकांनी मंचावर पाऊल टाकण्यापूर्वीच त्यांना तिथेच थांबण्यास सांगण्यात आले. १५ मिनिटांहून अधिक काळ वाट पाहिल्यानंतर, या पथकांना अखेरीस विश्रांतीच्या ठिकाणी परत जाण्यास सांगण्यात आले.

"विलंब झाल्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. एका टीमबाबत काहीतरी अडचण निर्माण झाली आहे. आम्ही पुढील १५ मिनिटांत (सोहळा) पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करू," असे आयोजन समितीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. हा व्यत्यय एका तासापेक्षा जास्त काळ चालला, तरीही त्यामागची नेमकी 'अडचण' काही काळ स्पष्ट झाली नाही.

अखेरीस जेव्हा बराच उशीर झालेला हा समारंभ पुन्हा सुरू झाला आणि ध्वजारोहण झाले, तेव्हा भारतीय पथकाचे प्रतिनिधी म्हणून केवळ 'डेप्युटी शेफ-द-मिशन' अंजली भागवत (माजी नेमबाज) आणि लिजो डेव्हिड थोट्टन (माजी ४x४०० मीटर रिले धावपटू) मंचावर गेले. भारताचे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया आणि भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षा पी.टी. उषा हे देखील काही काळासाठी तिथे आले होते. बहु-क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या पथकांसाठी ध्वजारोहण समारंभ हा अधिकृत स्वागत सोहळा असतो आणि तो सहसा स्पर्धांच्या अधिकृत उद्घाटनाच्या आदल्या दिवशी आयोजित केला जातो.

◂ (वृत्तसंस्था)

# आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलमध्ये धुमल, मजुमदार कायम

**मुंबई, १८ सप्टेंबर**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने शुक्रवारी येथे झालेल्या ९५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अरुण सिंग धुमल आणि एम. खैरुल जमाल मजुमदार यांची इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) गव्हर्निंग कौन्सिलमध्ये पुन्हा निवड केली.

या दोन जागांसाठी इतर कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल न केल्यामुळे, आयपीएलचे अध्यक्ष म्हणून दुसरा कार्यकाळ मिळवू पाहणारे धुमल व 'इंडियन क्रिकेटर्स असोसिएशन'चे (आयसीए) प्रतिनिधित्व करणारे मजुमदार यांची अधिकृतपणे फेरनिवड होण्याचा मार्ग मोकळा झाला.

अर्जांची छाननी केल्यानंतर बीसीसीआयचे निवडणूक अधिकारी ए. के. जोती यांनी वैध उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली. यामुळे फ्रॅन्चायझी-आधारित टी-२० लीगच्या निर्णय घेणाऱ्या या समितीत प्रशासकीय स्थिरता राखण्यासाठी या दोघांची बिनविरोध फेरनिवड शक्य झाली.

एका महत्त्वपूर्ण निर्णयामध्ये, सर्वसाधारण सभेने देशांतर्गत पंच आणि सामना पंचांसाठी (मॅच रेफरीज) सुधारित मानधन रचना आणि श्रेणींचे पुनर्वर्गीकरण एकमताने मंजूर केले; तसेच महत्त्वाचे आर्थिक आणि प्रशासकीय ठरावही संमत केले.

मंडळाने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षण केलेले हिशोब विवरणपत्र अधिकृतपणे स्वीकारले आणि २०२६-२७ या वर्षासाठी वार्षिक अर्थसंकल्प मंजूर केला, तसेच आगामी आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षकांची (ऑडिटर्स) नियुक्ती केली.

देशाच्या क्रिकेट प्रवासातील हा ऐतिहासिक टप्पा साजरा करण्यासाठी शताब्दी सोहळे डिसेंबर २०२७ पासून सुरू होऊन संपूर्ण २०२८ वर्षभर चालतील.

धोरणात्मक पातळीवर, बीसीसीआयच्या 'लैंगिक छळ प्रतिबंधक धोरणा'अंतर्गत एका नवीन अंतर्गत समितीची स्थापना करण्यात आली. मंडळाने आपले 'वय पडताळणी धोरण' अद्ययावत करून अधिकृतपणे स्वीकारल्याचेही सांगितले.

◂ (वृत्तसंस्था)

### आगरकरबाबत सावध पवित्रा

**मुंबई, १८ सप्टेंबर**

राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांचा कार्यकाळ संपत असताना बीसीसीआय सचिव सावध पवित्रा घेत आहेत. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी शुक्रवारी निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर यांच्या भविष्याबाबत कोणतीही स्पष्ट उत्तरे दिली नाहीत, परंतु 'क्रिकेटच्या जगात १५ दिवस हा मोठा कालावधी असतो,' असे विधान मात्र केले.

आगरकर यांनी बुधवारी नवी दिल्ली येथे त्यांच्या सध्याच्या कार्यकाळातील शेवटची निवड समिती बैठक घेतली आणि त्यांचा करार ४ ऑक्टोबर रोजी संपत आहे. आमच्याकडे अजून पंधरा दिवस आहेत. क्रिकेटच्या जगात पंधरा दिवस हा मोठा कालावधी असतो. आम्ही योग्य वेळी निर्णय घेऊ. ■

# भारतीय पुरुष संघाची साधारण सुरुवात

### बुद्धिबळ ऑलिम्पियाड

**समरकंद, १८ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या ४६ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेच्या पहिल्या दोन फेऱ्यांनंतर गतविजेत्या भारतीय पुरुष संघाची सुरुवात साधारण राहिली आहे, तर जागतिक विजेतेपदाचा दावेदार डी. गुकेश याची 'लाइव्ह रेटिंग' २७०० च्या खाली घसरली आहे.

भारतीय पुरुष संघाने कमी मानांकन असलेल्या संघांविरुद्ध दोन विजय नोंदविले असले, तरी त्यांच्या खेळाचा दर्जा पाहता हे विजय फारसे प्रभावी वाटले नाहीत. सप्टेंबर २०२२ मध्ये, अवघ्या १६ वर्षांच्या गुकेशने २६९९ वरून २७२६ रेटिंग गुणांपर्यंत झेप घेत यशाच्या शिखराकडे वाटचाल सुरू केली होती; त्यानंतर डिसेंबर २०२४ मध्ये वयाच्या १८ व्या वर्षी सर्वात तरुण जागतिक विजेता बनण्यापर्यंत त्याने मागे वळून पाहिले नाही.

'आयुष्य पुन्हा एका वर्तुळाप्रमाणे मूळ स्थितीत येते' ही म्हण या ऑलिम्पियाडच्या दुसऱ्या फेरीनंतर खरी ठरली; कारण या फेरीत इंडोनेशियाच्या सित्रिया दुता काहायाने गुकेशला बरोबरीवर रोखले. ऑक्टोबर २०२४ मध्ये २७९४ गुणांच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचल्यानंतर, आता तो २६९९.५ गुणांवर आला आहे.

यामुळे उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हचा आत्मविश्वास नक्कीच वाढेल, जो नोव्हेंबरमध्ये स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे जागतिक विजेतेपदासाठी गुकेशला आव्हान देणार आहे.

ऑलिम्पियाडच्या समाप्तीपर्यंत '२७०० रेटिंग'च्या प्रतिष्ठित गटात (एलिट क्लब) पुन्हा स्थान मिळविण्यासाठी गुकेश जोरदार पुनरागमन करू शकतो आणि तशी आशाही बाळगतो.

२०२२ आणि २०२४ मधील मागील दोन ऑलिम्पियाड्समध्ये, गुकेशने भारतासाठी 'टॉप बोर्ड'वर सर्वोत्तम कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले होते; परंतु यावेळी संघ व्यवस्थापनाने - कदाचित सध्याचा फॉर्म लक्षात घेऊन - वेगळा निर्णय घेतला आणि त्याला चौथ्या बोर्डवर खेळवले. ◂ ((वृत्तसंस्था)

# आशियाड क्रीडा स्पर्धेत भारताची मोठ्या झेपेवर नजर

### हॅण्गझोऊमधील यशानंतर आता नागोयाची कसोटी

**नागोया, १८ सप्टेंबर**

शनिवारी येथे सुरू होणाऱ्या २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेत भारताच्या वेगाने विस्तारणाऱ्या क्रीडा-क्षमतेची मोठी कसोटी लागणार आहे. पुढील दशकात जगातील अव्वल १० देशांच्या यादीत स्थान मिळविण्याच्या भारताच्या व्यापक महत्त्वाकांक्षेचे प्रतिबिंब या स्पर्धेत उमटवण्याचे उद्दिष्ट खेळाडूंचे असेल. भारताने या आशियाड क्रीडा स्पर्धेत शंभर पदके जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

सहभागी खेळाडूंची संख्या (सुमारे ११,०००) आणि खेळांचे प्रकार (४३) यांचा विचार करता, ऑलिम्पिकच्या तुलनेत (जिथे ४५ देश सहभागी होतात) आशियाड क्रीडा स्पर्धा ही अधिक मोठी स्पर्धा ठरली आहे.

भारताचे प्रतिनिधित्व ५०१ खेळाडूंचा मोठा गट करणार आहे. नागोया येथे आता त्या गतीला आणि यशाला पुढे नेण्याची आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे. २०३६ पर्यंत जगातील अव्वल १० क्रीडा राष्ट्रांमध्ये स्थान मिळवणे आणि २०४७ पर्यंत पहिल्या पाचमध्ये झेप घेणे, हे भारताचे क्रीडा क्षेत्रातील उद्दिष्ट आहे.

**नीरजच्या अनुपस्थितीतही महत्त्वाकांक्षा कायम**

हेच अॅथ्लेटिक्स (मैदानी खेळांच्या) बाबतीतही लागू होते, जिथे भारत आपल्या एका सर्वात मोठ्या स्टार खेळाडूंविना मैदानात उतरेल. आशियाड क्रीडा स्पर्धेत दोनदा सुवर्णपदक जिंकणारा आणि देशातील सर्वात लोकप्रिय खेळाडूंपैकी एक असलेला नीरज चोप्रा दुखापतीमुळे या स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही.

७४ सदस्यांच्या या पथकात पदकांसाठी आव्हान निर्माण करण्यास सक्षम अशा अनेक खेळाडूंचा समावेश आहे. पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात तजिंदरपाल सिंग तूर सलग तिसऱ्यांदा आशियाड क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक जिंकण्याचा प्रयत्न करेल. लांब उडीत मुरली श्रीशंकर, लांब अंतराच्या शर्यतींमध्ये गुलवीर सिंग, भालाफेकीत रोहित यादव, डेकॅथलॉनमध्ये तेजस्विन शंकर आणि महिलांच्या लांब उडीत अँसी सोजन हे देखील पदकाच्या आशा असलेल्या खेळाडूंमध्ये समाविष्ट आहेत. १०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत ज्योती याराजी आणि तिहेरी उडीत प्रवीण चित्रवेल हे देखील भारतीय संघाची ताकद वाढवतील.



**क्रिकेटकडे सर्वांचे विशेष लक्ष**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने या स्पर्धांना किती महत्त्व दिले आहे, हे स्पष्टपणे व्यक्त केले आहे. हरमनप्रीत व मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांनी आइची-नागोया आशियाड क्रीडा स्पर्धा हे ऑलिम्पिकसाठी एक प्रकारची पूर्वझलक असल्याचे म्हटले आहे.

दुसरीकडे, पुरुष संघासमोर एक अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्याचे आव्हान आहे.

**सात्त्विक-चिराग, सिंधूकडून सुवर्णाची अपेक्षा**

बॅडमिंटनमध्ये सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी हे हॅण्गझोऊमधील यशानंतर आणखी एक पाऊल पुढे टाकण्याचा आणि पुरुष दुहेरीत सुवर्णपदक जिंकण्याचा प्रयत्न करतील. पी.व्ही. सिंधू हिच्याकडे मोठ्या बहु-क्रीडा स्पर्धांचा अनुभव आहे.

**हॉकीत पुरुष, महिला संघाकडून आशा**

हॉकी हा भारताच्या आशियाड क्रीडा स्पर्धेतील मोहिमेचा आणखी एक मुख्य आधारस्तंभ आहे. कर्णधार हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील गतविजेता पुरुष संघ विश्वचषक आणि प्रो-लीग मधील अलीकडील निराशाजनक कामगिरी मागे सारून, आशियाड क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकासह मिळणारे लॉस एंजेलिस ऑलिम्पिकचे थेट पात्रता स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करेल. दरम्यान, महिला खेळाडू हॅण्गझोऊमधील कांस्यपदकापेक्षा चांगली कामगिरी करण्याचा निर्धार करतील.

**तिरंदाजी, मुष्टियुद्ध, कबड्डीत पदके जिंकण्याचा प्रयत्न**

तिरंदाजी, बॉक्सिंग आणि कबड्डी या खेळांमधूनही पदके जिंकण्याचे प्रयत्न केले जातील. ग्लासगो येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील दमदार कामगिरीनंतर भारतीय महिला बॉक्सर नव्या आत्मविश्वासासह स्पर्धेत उतरत आहेत; तसेच कबड्डीमध्ये, भारतीय पुरुष संघ आशियाई क्रीडाविश्वातील एक प्रबळ शक्ती म्हणून कायम आहे.

◂ ((वृत्तसंस्था)

### मैदानी खेळाडू, नेमबाज आघाडीवर

या मोहिमेत भारताचे ट्रॅक-अँड-फील्ड (मैदानी) खेळाडू आणि नेमबाज आघाडीवर असतील. विशेषतः नेमबाजी पथकात युवा जोश आणि अनुभव यांचा एक प्रभावी संगम पाहायला मिळेल; या पथकाचे नेतृत्व दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती आणि पिस्तूल प्रकारातील अव्वल खेळाडू मनू भाकर करेल. संघामध्ये ३० नेमबाजांचा समावेश असल्याने, रायफल, पिस्तूल आणि शॉटगन अशा विविध प्रकारांमध्ये दमदार आव्हान उभे करण्यासाठी भारताकडे पुरेसे सामर्थ्य आहे. भारतीय नेमबाजांमध्ये विविध प्रकारांत पदके जिंकण्याची क्षमता आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आज देणार जवळा सोसायटीला भेट

**सांगोला, दि.१८ सप्टेंबर-**

राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आज शनिवार दि.१९ सप्टेंबर रोजी जवळा (ता.सांगोला) येथे येत आहेत. यावेळी ते राज्यातील अग्रगण्य विकास सेवा सोसायटी म्हणून नावलौकिक असणाऱ्या सांगोला तालुक्यातील जवळा विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या कामाची पाहणी करणार आहेत. दुपारी २ वाजता ही भेट असणार आहे. यावेळी संस्थेचे मार्गदर्शक माजी आ.दिपक साळुंखे-पाटील हे देखील उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या सर्व सभासद, शेतकरी तसेच संचालक मंडळ यांनी उपस्थित रहावे असे आवाहन सोसायटीचे चेअरमन सुनील साळुंखे यांनी केले आहे.






मोडनिंब (ता. माढा) येथील गडेकर कुटुंबियांच्या घरातील सामाजिक संदेश देणाऱ्या गौराई.

## निधन वृत्त...

### रामचंद्र त्यारला

**सोलापूर, दि.१८ सप्टेंबर-**



पद्मशाली समाजातील ज्येष्ठ नागरिक रामचंद्र रामय्या त्यारला यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अक्कलकोट रोडवरील पद्मशाली समाजाच्या शांतीधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले.

# आजपासून राज्यात वादळी वाऱ्यासह पाऊस?

### हवामान विभागाचा अंदाज; 13 जिल्ह्यांना अलर्ट

### सोलापूर जिल्ह्यातही हलका ते मध्यम पावसाचा अंदाज

### रब्बी हंगामासाठी फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी काही भागांत पावसाचा जोर राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने राज्यातील १३ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. सोलापूर जिल्ह्यातही हलका ते मध्यम पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.

राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर ११ जिल्ह्यांमध्ये कोणताही अलर्ट नसला तरी पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये हवामान मुख्यतः कोरडे राहण्याची शक्यता आहे. कोकण विभागात रायगड आणि रत्नागिरी या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट दिला आहे. या भागात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. पालघर, ठाणे आणि मुंबई या भागांत मात्र कोणताही अलर्ट नसला तरी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

उत्तर महाराष्ट्रात धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होऊ शकतो. अहिल्यानगर जिल्ह्यातही यलो अलर्ट असून पावसाची शक्यता कायम आहे.

मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, नांदेड आणि लातूर या चार जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे. या भागात विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे. जालना, परभणी, बीड आणि धाराशिव या जिल्ह्यांत अलर्ट नसला तरी काही ठिकाणी पाऊस पडू शकतो.

### सोलापूरला अलर्ट नाही; मात्र पावसाची शक्यता

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा या जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. या जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस होऊ शकतो. कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर या जिल्ह्यांत कोणताही अलर्ट नसला तरी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

### खरीपाला नाही तर रब्बीलाच फायदा

सोलापूर जिल्ह्यातील खरीप हंगामाची सर्व पिके पावसाअभावी वाळून गेली आहेत. ज्यांच्याकडे पाणी आहे अशा १० ते १५ टक्के लोकांच्याच पिके हाताला लागली आहेत. दरम्यान, आता परतीचा पाऊस जरी पडला तरी त्याचा फायदा रब्बी हंगामासाठीच होणार आहे. जर हा पाऊसही नाही पडला तर मात्र दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे.



## पंढरपूर पंचायत समितीत सेवा संकल्प अभियानाचा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१८ सप्टेंबर -**


पंचायत समिती पंढरपूर येथील शेतकी भवन सभागृहात सेवा संकल्प अभियानचा प्रारंभ झाला. सभापती शुभम आगावणे यांच्या अध्यक्षतेखाली व माजी आमदार प्रशांत परिचारक यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी उपसभापती प्रमोद देशमुख, जि. प. सदस्य व पंचायत समिती सदस्य व गट विकास अधिकारी अमोल जाधव उपस्थित होते. दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत तालुक्यातील ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रम व कामांचा निपटारा करण्यात येणार आहे. गट विकास अधिकारी अमोल जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी अभियान राबवितांना कोणते उपक्रम हाती घ्यायचे आदींबाबत मार्गदर्शन केले. सभापती डॉ शुभम आगावणे यांनी आभार मानले. सचिन सोनकांबळे, स.प्र.अ. शहाजहान तांबोळी, क.प्र.अ. महेश वैद्य, वरिष्ठ सहाय्यक व प्रताप बोंगाळे, तालुका समन्वयक यांनी परिश्रम घेतले.

## ज्येष्ठा गौरींचे मनोभावे पूजन; पुरणपोळीसह १६ भाज्यांचा महानैवेद्य

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १८ सप्टेंबर -**

भाद्रपद शुद्ध सप्तमीला घरोघरी आगमन झालेल्या ज्येष्ठा गौरी अर्थात महालक्ष्मींचा शुक्रवार दि.१८ सप्टेंबर रोजी ज्येष्ठा नक्षत्राच्या शुभमुहूर्तावर भक्तिमय वातावरणात मुख्य पूजन सोहळा पार पडला. गणेशोत्सवाच्या आनंदात भर घालणाऱ्या तीन दिवसीय गौरी उत्सवातील हा दुसरा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गौरीला आदिशक्ती पार्वतीचे रूप मानले जाते, तसेच माहेरवाशीण म्हणून तिचे लाडाने स्वागत करून तिचे आदरतिथ्य केले जाते.



गौरींच्या आगमनानंतर शुक्रवारी पारंपरिक पद्धतीने त्यांची सजावट करून पूजा-अर्चा करण्यात आली. घरोघरी गौरींना सुवर्णालंकार, विविध प्रकारची फुले, आकर्षक दागिने आणि पारंपरिक साजशृंगाराने सजवण्यात आलेले आहे. गौरींसमोर आकर्षक आरास, खेळणी, रांगोळ्या विद्युत रोषणाई, फुलांची सजावट केली आहे. यावेळी घरातील महिला व सुवासिनींनी उपवास करून मनोभावे पूजा केली. कुटुंबात सुख, शांती, समृद्धी आणि उत्तम आरोग्य नांदावे, यासाठी गौरीच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

ज्येष्ठा गौरी पूजनातील सर्वांत आकर्षणाचा भाग म्हणजे महानैवेद्य. गौरीसाठी पुरणपोळी, विविध गोडधोड पदार्थांसह पारंपरिक पद्धतीने विविध पदार्थांचा नैवेद्य तयार केला. त्याचबरोबर शेतातील सोळा प्रकारच्या भाज्यांचा समावेश असलेला महानैवेद्य तसेच मेथी, गवारी, भेंडी, भोपळा,अळू यांसह ज्वारी-बाजरीच्या भाकरीचा नैवेद्यही करण्यात आला.उद्या तिसऱ्या दिवशी उत्तरपूजा करून दही-भाताचा नैवेद्य दाखविला जाईल.

## श्री विठ्ठल-रुक्मिणी व महालक्ष्मी मातेस पारंपरिक सुवर्ण अलंकार

### श्री गौरी पूजनानिमित्त सजावट; तिन्ही देवतांचे विलोभनीय रुप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ सप्टेंबर -**

श्री गौरी पूजन निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल, रुक्मिणी माता व महालक्ष्मी मातेस आकर्षक व पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले. सुवर्ण अलंकारांनी सजलेले तिन्ही देवतांचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी तसेच दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, पितांबर, कौस्तुभ मणी, दंडपेट्या व हिऱ्याचे कंगन जोड, मोत्याचा तुरा व शिरपेच, मत्स्य जोड, विविध पदरी माळा, लॉकेट, मोहर माळा, पुतळ्याची माळ, जवेची माळ, तुळशीची माळ, एकदानी व चंद्रहार आदी अलंकार परिधान करण्यात आले आहेत. रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या व तोडे जोड, तारवड जोड, चिंचपेटी, जवमणी पदक, जवेच्या माळा,



लक्ष्मीहार, मोहरांची व पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी व कंबरपट्टा आदी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. महालक्ष्मी मातेस सोन्याचे गंठण, मोत्याची कंठी एक पदरी, चंद्रहार पाच पदरी, लक्ष्मी पेंडल लॉकेटसह, तांदळया हार सात पदरी, अष्टपैलू मण्याची कंठी आठ पदरी, नेकलेस आदी अलंकारांनी सजविण्यात आले आहे.

### जिल्हा वुशू स्पर्धेत कबाडे द्वितीय

**बार्शी :** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या यशराज कबाडे याने शालेय जिल्हा वुशू स्पर्धेत ४८ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामुळे त्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.



त्यास प्रशिक्षक विनोद कबाडे व तेजमाला खबाले, कोच फूलचंद जावळे, क्रीडा शिक्षक पुष्कराज पाटील, योगेश उपळकर तसेच प्राचार्या के. डी. धावणे यांचे मार्गदर्शन लाभले. यशराजचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे आंदींनी अभिनंदन केले.

## सोलापूरची लेक चमकली

### राष्ट्रीय फुटबॉल संघात पूर्वी सावंतची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर -**

डॉ. तालीमिरान ट्रॉफी (टियर-१) ज्युनिअर गर्ल्स (१५ वर्षाखालील) नॅशनल फुटबॉल चॅम्पियनशिपसाठी महाराष्ट्र राज्य फुटबॉल संघात सोलापूरच्या पूर्वी सावंतची निवड झाली आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून निवड झालेल्या १८ खेळाडूंमध्ये सोलापूर जिल्ह्यातून पूर्वी सावंत ही एकमेव खेळाडू आहे.

मुंबईतील कुपरेज मैदानावर झालेल्या कठोर प्रशिक्षण शिबिरात तिने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर अंतिम संघात आपले स्थान पक्के केले. यापूर्वी शिरपूर येथे पार पडलेल्या आंतरजिल्हा फुटबॉल स्पर्धेतील



तिच्या चमकदार कामगिरीच्या आधारावरच या शिबिरासाठी तिची निवड झाली होती.आंध्र प्रदेशातील अनंतपूर येथे सुरू होत असलेल्या या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत ती महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत आहे. पूर्वी सावंत ही सोलापूरच्या सेंट थॉमस स्कूलमध्ये इयत्ता ९ वी मध्ये शिकत असून, तिच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक फादर रॉबिन तसेच सोलापूर शहर व जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव डॉ. प्रा. किरण चौगुले यांनी तिचे अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तिची ही घौडदौड प्रशिक्षक राजेंद्र गायकवाड व प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## बार्शीच्या सिल्वर जुबली प्रशालेस दुहेरी मुकट

### शालेय जिल्हा टेबल टेनिस

### अन्य गटातून डॉ. खान दक्षिण सोलापूर, मंगरुळे अक्कलकोट व अक्षर कंदलगाव यांची बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित शालेय जिल्हा टेबल टेनिस स्पर्धेत बार्शीच्या सिल्वर जुबली प्रशालेने १४ व १७ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. अन्य गटातून डॉ. असदुल्लाह खान प्रशाला (दक्षिण सोलापूर), मंगरुळे प्रशाला, (अक्कलकोट) आणि अक्षर जुनिअर कॉलेज (कंदलगाव) या संघांनी विजेतेपद संपादले.

क्रीडा अधिकारी इलियास पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे झेड. एम. पुणेकर, ए. ए. मुंढे, एस. एस. मुनोळी आणि गोवर्धन यांच्या सहकार्याने ही स्पर्धा पार पडली.



डॉ. असदुल्लाह खान प्रशाला दक्षिण सोलापूर विरुद्ध मंगरुळे प्रशाला अक्कलकोट या १४ वर्षाखालील मुलींच्या अंतिम सामन्यातील क्षण.

**या स्पर्धेतील अंतिम निकाल : १४ वर्षे मुले:** सिल्वर जुबली प्रशाला (बार्शी) विजयी विरुद्ध सेंट जोसेफ प्रशाला (बार्शी) ३-१. **मुली:** डॉ. असदुल्लाह खान प्रशाला (दक्षिण सोलापूर) विजयी विरुद्ध मंगरुळे प्रशाला (अक्कलकोट) ३-१ ने विजय.

**१७ वर्षे मुले:** सिल्वर जुबली प्रशाला (बार्शी) विजयी विरुद्ध डॉ. असदुल्लाह खान प्रशाला (दक्षिण सोलापूर) ३-०. **मुली:** मंगरुळे प्रशाला (अक्कलकोट) विजयी विरुद्ध अमोगसिद्ध प्रशाला (मोहोळ) ३-१ ने विजय.

**१९ वर्षे मुले:** अक्षर जुनिअर कॉलेज (कंदलगाव) विजयी विरुद्ध विश्वाशांती जुनिअर कॉलेज (वाखरी, पंढरपूर) ३-२.

# आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंना आणि मार्गदर्शकांना मिळणार भरघोस रोख पारितोषिके

### महाराष्ट्र शासनाचा ऐतिहासिक निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि. १८ सप्टेंबर-**

राज्यातील क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार आणि जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने क्रीडा धोरण-२०१२ मध्ये सुधारणा करत एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सर्वसमावेशक निर्णय घेतला आहे. या नवीन निर्णयानुसार, आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करून देशाचे व राज्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या पदकप्राप्त खेळाडूंना आणि त्यांच्या क्रीडा मार्गदर्शकांना भरघोस रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.

शासनाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील खेळाडूंना मोठे आर्थिक स्थैर्य मिळणार असून, ते अधिक जोमाने आंतरराष्ट्रीय स्तरावर देशासाठी पदक जिंकण्यासाठी प्रेरित होतील, यात शंका नाही. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार आणि केंद्र शासनासह इतर क्रीडा-प्रगत राज्यांच्या धर्तीवर ही सुधारित योजना तयार करण्यात आली असून, राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर आता तिचा सविस्तर शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये व उद्दिष्टे**

बदलत्या काळातील क्रीडा क्षेत्रातील वाढती स्पर्धा लक्षात घेऊन ही योजना अधिक तर्कसंगत आणि खेळाडू-केंद्रित बनवण्यात आली आहे. पुरस्कारांच्या वितरणासाठी पारदर्शक, गतिमान आणि कालबद्ध प्रशासकीय यंत्रणा निर्माण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा (ऑनलाइन पोर्टल) वापर केला जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी खेळाडू महाराष्ट्र राज्याचा रहिवासी (अधिवास प्रमाणपत्र असणे अनिवार्य) असावा आणि त्याने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा किंवा राष्ट्रीय एकविध खेळ क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणे बंधनकारक असेल. विहित केलेल्या नियमांनुसार ऑलिम्पिक खेळांपासून ते खेल इंडिया स्पर्धांपर्यंतच्या विविध स्पर्धांमध्ये पदक मिळवणाऱ्या खेळाडूंसाठी रोख पारितोषिकांची रक्कम निश्चित करण्यात आली आहे:

**रोख पारितोषिकांचे स्वरूप**

**ऑलिम्पिक खेळ:** सुवर्ण पदकासाठी ५ कोटी, रौप्य पदकासाठी ३ कोटी आणि कांस्य पदकासाठी २ कोटी.

**क्रीडा मार्गदर्शकांसाठी विशेष प्रोत्साहन**

खेळाडूंना मिळणाऱ्या रोख पारितोषिक रकमेच्या एकूण १०% टक्के रक्कम संबंधित खेळाडूने प्रमाणित केल्यानुसार क्रीडा मार्गदर्शकांना खालील सूत्रानुसार विभागून दिली जाईल.

**पायाभूत स्तर - ३०%:** प्राथमिक प्रशिक्षण देणाऱ्या मार्गदर्शकांसाठी ही रक्कम राखीव.

**विकासात्मक स्तर - ३०%:** कौशल्य विकास व मध्यंतरी प्रशिक्षण देणाऱ्या मार्गदर्शकांसाठी ही रक्कम.

**उच्च स्तर - ४०%:** अंतिम व प्रगत प्रशिक्षण देणाऱ्या मार्गदर्शकांसाठी ही रक्कम वितरित केली जाईल.

**आशियाई खेळ व राष्ट्रकुल खेळ :** सुवर्ण पदकास १ कोटी, रौप्य पदकास ७५ लाख रुपये आणि कांस्य पदकास ५० लाख.

**जागतिक अजिंक्यपद/विश्वचषक स्पर्धा (४ वर्षातून एकदा):** सुवर्ण पदकासाठी १ कोटी रुपये, रौप्य पदकासाठी ७५ लाख रुपये आणि कांस्य पदकासाठी ५० लाख रुपये. दर दोन वर्षांनी होणाऱ्या स्पर्धेसाठी अनुक्रमे ५०, ३० व २० लाख रुपये आणि वार्षिक स्पर्धेसाठी २५, २० व १५ लाख रुपये.

**आशियाई अजिंक्यपद स्पर्धा:** ४ वर्षातून एकदा होणाऱ्या स्पर्धेसाठी ५० लाख (सुवर्ण), ३० लाख (रौप्य) व २० लाख (कांस्य); २ वर्षातून एकदा होणाऱ्या स्पर्धेसाठी २५ लाख, १५ लाख व १० लाख; आणि वार्षिक स्पर्धेसाठी १५ लाख, १० लाख व ५ लाख.

**जागतिक विद्यापीठ खेळ :** सुवर्ण पदकास १० लाख, रौप्य पदकास ७ लाख व कांस्य पदकास ५ लाख रुपये.

**पॅरा ऑलिम्पिक गेम्स :** पॅरा खेळाडूंना ऑलिम्पिकच्या धर्तीवर सुवर्ण पदकासाठी ५ कोटी, रौप्य पदकासाठी ३ कोटी आणि कांस्य पदकासाठी २ कोटी.

**पॅरा आशियाई गेम्स (वरिष्ठ गट) :** सुवर्ण पदकास १ कोटी, रौप्य पदकास ७५ लाख आणि कांस्य पदकास ५० लाख रुपये. पॅरा वर्ल्ड गेम्स/आयपीसी वर्ल्ड कपसाठी : चार वर्षांनंतर होणाऱ्या स्पर्धेस १००% रक्कम, दोन वर्षांनंतर होणाऱ्या स्पर्धेस ५०% रक्कम आणि वार्षिक स्पर्धेस २५% रक्कम.

**डेफ, अंध, स्पेशल इ. गटातील स्पर्धा:** डेफ ऑलिम्पिकसाठी सुवर्ण पदकास ४० लाख, रौप्य पदकास ३० लाख व कांस्य पदकास २० लाख रुपये. आयबीएसए वर्ल्ड चॅम्पियनशिप, अंध क्रिकेट वर्ल्ड कपसाठी सुवर्ण पदकास ३० लाख, रौप्य पदकास २० लाख व कांस्य पदकास १० लाख. विशेष ऑलिम्पिक/वर्ड गेम्स फॉर मेन्टली चॅलेंज्डसाठी सुवर्ण पदकास ४० लाख, रौप्य पदकास ३० लाख व कांस्य पदकास २० लाख रुपये.

**युथ व जुनिअर गटाच्या स्पर्धा:** युथ ऑलिम्पिक व युथ पॅरा ऑलिम्पिकसाठी सुवर्ण पदकास ५० लाख, रौप्य पदकास ३० लाख व कांस्य पदकास २० लाख रुपये. युथ कॉमनवेल्थ/युथ आशियाई गेम्ससाठी २० लाख, १५ लाख व १० लाख रुपये . जुनिअर वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी १० लाख, ७ लाख व ५ लाख रुपये.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा :** या स्पर्धेसाठी सुवर्ण पदकास ७ लाख रुपये, रौप्य पदकास ५ लाख रुपये आणि कांस्य पदकास ३ लाख.

खेल इंडिया अंतर्गत स्पर्धा: या स्पर्धांसाठी सुवर्ण पदकासाठी ३ लाख र, रौप्य पदकासाठी २ लाख आणि कांस्य पदकासाठी १ लाख रुपये.

**विशेष खेळांसाठी पारितोषिक रचना**

बॅडमिंटन स्पर्धा: थॉमस कप, उबर कप किंवा सुदीरमन कप (दर दोन वर्षांनी आयोजित होणाऱ्या) स्पर्धेत विजयी खेळाडूला ४० आणि उपविजेत्या खेळाडूला २० लाख रुपये दिले जातील. टेनिसमधील चारही ग्रँड स्लॅम स्पर्धांसाठी विजयी खेळाडूला ३ आणि उपविजेत्या खेळाडूला २ कोटी रुपये. हॉकी स्पर्धा: अझलन शाह कप (वरिष्ठ गट) आणि चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी विजयी खेळाडूला ४० व उपविजेत्याला २० लाख रुपये मिळतील. सुलतान जोहर कप (कनिष्ठ गट) साठी विजयी खेळाडूला २० व उपविजेत्याला १० लाख रुपये.

**सांघिक खेळांसाठी विशेष गणनेचे सूत्र**

कबड्डी, खो-खो, हॉकी यांसारख्या सांघिक खेळांमध्ये खेळाडूंचे योगदान लक्षात घेऊन सांघिक पारितोषिक वितरण सूत्र लागू करण्यात आले आहे. यामध्ये २ खेळाडूंच्या संघासाठी वैयक्तिक पारितोषिक रकमेच्या १.५ पट रक्कम दिली जाईल जी दोन्ही खेळाडूंमध्ये समान विभागली जाईल. ३-४ खेळाडूंच्या संघासाठी २ पट, ५-१० खेळाडूंच्या संघासाठी ३ पट आणि १० पेक्षा जास्त खेळाडूंच्या संघासाठी ५ पट रक्कम संबंधित खेळाडूंमध्ये समान प्रमाणात वाटली जाईल.

# 'केडर'च्या निवडणुकीसाठी १ हजार २०५ ठराव

**मोहोळ, बार्शी, करमाळा, अक्कलकोटमधून 100 टक्के**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ सप्टेंबर-**
केडर अर्थात सोलापूर जिल्हा देखरेख संघाच्या निवडणुकीसाठी १ हजार २३२ सभासद संस्थापैकी १ हजार २०५ संस्थांचे ठराव दाखल झाले आहेत. मोहोळ, बार्शी, करमाळा आणि अक्कलकोट या तालुक्यात १०० टक्के ठराव प्राप्त झाले आहेत, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी दिली.

दि.१ ऑगस्ट २०२६ ही अर्हता तारीख जाहीर करुन जिल्हा देखरेख संघ प्रशासकांकडून सभासद संस्था आणि व्यक्ती यांची यादी मागवली होती. प्रशासक उमेश पवार यांनी ही यादी आमच्या कार्यालयाकडे दाखल केली. प्रारुप यादीवर दावे, हरकती मागवल्या जातील. त्यानंतर अंतिम यादी तयार केली जाईल.

मंगळवेढा तालुक्यात सर्वाधिक १७ ठराव आले नाहीत. माळशिरसमधील ४, सांगोल्यातील २, माढा, पंढरपूर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्रत्येकी एका संस्थेने १ ठराव दिला नाही. असे एकूण २७ संस्थांचे ठराव प्राप्त झाले नाहीत, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

तालुकानिहाय सभासद संस्था संख्या, मिळालेल्या ठरावांची संख्या आणि ठराव न दिलेल्या संस्थांची संख्या याप्रमाणे;मोहोळ-१२०-१२०-० सांगोला-८१-७९-२ मंगळवेढा-७९-६२-१७ माळशिरस-१३१-१२७-४ बार्शी-१३४-१३४-० माढा-१७३-१७२-१ पंढरपूर-१७८-१७७-१ करमाळा-११३-११३-० उत्तर सोलापूर-५२-५१-१ दक्षिण सोलापूर-८२-८१-१ अक्कलकोट-८९-८९-० एकूण-१२३२-१२०५-२७



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींचे पूजनाप्रसंगी पोलिस आयुक्त एम. राजकुमार, प्रिसिजन कॅमशॉफ्टचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा, भाजपाचे महापालिकेतील सभागृह नेते नरेंद्र काळे. याप्रसंगी मुख्य संपादक प्रशांत माने आणि कर्मचारी वृंद.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींचे पूजन करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींचे पूजन मोहोळ तालुक्यातील कामती येथील श्रीकृष्ण गुरुकुल शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रमोद आवताडे, उपाध्यक्ष हनुमंत निकम यांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी विरवडे बुद्रुक मुकुंदकाका अवताडे, बिरवडे बुद्रुकचे चेअरमन हनुमंतभाऊ अवताडे, मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा आवृत्तीचे राजाराम मस्के उपस्थित होते.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींचे पूजन करताना विजापूर नाका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुहास चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक विष्णू गायकवाड.

## छायाचित्रातून...



सोलापूर : हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील श्री गणेशाची पूजा व आरती शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या मातृ संस्थेचे इस्टेट मॅनेजर नितीन राख यांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य प्रकाश कांबळे, पर्यवेक्षक भानुदास बनसोडे, औदुंबर सर्वगोड, महेंद्र रणधीर, मारुती शहाणे, माणिक साळसकर, क्रिकेट प्रशिक्षक प्रकाश कंपली, श्रीकृष्ण लोंढे आणि खेळाडू विद्यार्थी उपस्थित होते.



**गणराया पेपरफुटीचे विघ्न दूर कर...**
जुना देगाव नाका परिसरातील लक्ष्मी पेठ येथील उषा ज्ञानेश्वर लांबतुरे परिवाराने गणरायापुढे देखाव्याच्या माध्यमातून देशभरात गाजलेल्या एमपीएससी, नीट यांसारख्या परीक्षांमधील पेपरफुटीच्या समस्येकडे लक्ष वेधले. देखावा पाहण्यासाठी परिसरातील नागरिक गर्दी करीत आहेत.



**आशीर्वादाचा दिवा...**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पद्मशाली महिला मंडळ संचलित लक्ष्मीबाई तिप्पण्णा दासरी शाळेच्या सहशिक्षिका तथा माजी नगरसेविका इंदिरा कुडक्याल यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षरा आडम व हर्षिता कोकुल या विद्यार्थिनींनी अशा पध्दतीने शुभेच्छा दिल्या.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींचे पूजन करताना पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रविण घम. याप्रसंगी उपस्थित मुख्य संपादक प्रशांत माने.



होटगी रोड परिसरातील शंकर नगर येथील शाबादे परिवारच्या वतीने गौरी गणपतीची अशा पध्दतीने सजावट करण्यात आली.

# समर्थ बँक निवडणुकीत ५६ अर्ज वैध; एक अर्ज बाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ सप्टेंबर-**
समर्थ सहकारी बँक निवडणुकीत ५६ अर्ज वैध ठरले आहेत. दाखल झालेल्या ६० पैकी एक अर्ज बाद झाला. विद्याधर हिरेमठ यांचा सर्वसाधारण गटात भरलेला अर्ज बाद झाला. तीन अर्ज दुबार होते, त्यामुळे आता सद्यस्थितीत ५६ जणांचे अर्ज राहिले आहेत, अशी माहिती असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मुकुंद पवार यांनी दिली.

थकबाकी, फर्म असणे, इतर पतसंस्थेत संचालक किंवा चेअरमन असणे, बँकेकडून अॅडव्हान्स घेणे, बँकेसाठी जागा करारावर देणे, बँकेच्या पॅनलवर असणे, फर्मचे नाव यादीत असणे अशा मोठ्या कारणांमुळे तब्बल १० अर्ज राखून ठेवण्यात आले होते. या सर्व उमेदवारांनी कायदेशीर बाजू मांडल्याने उमेदवारीची अडचण दूर झाली. हायकोर्टाने इतर बँकांबाबत केलेले निवाडे सादर केले, असेही त्यांनी सांगितले.

मतदारसंघनिहाय उमेदवार संख्या आणि वैध झालेल्या अर्जांची संख्या याप्रमाणे; सर्वसाधारण प्रतिनिधी-४० उमेदवार, महिला राखीव प्रतिनिधी-७ उमेदवार, विमुक्त जमाती/भटक्या जाती/विशेष मागास प्रवर्ग-४ उमेदवार, अनुसूचित जाती/जमाती प्रतिनिधी-२ उमेदवार, इतर मागासवर्गीय प्रतिनिधी-३ उमेदवार.



एस.टी.स्टॅन्डनजीक असलेल्या वसंत विहार येथील सौ. व श्री. रेणुका नागनाथ उंडाळे यांच्या निवासस्थानी करण्यात आलेली गौरी-गणपतीच्या सजावटीचे छायाचित्र.

# ओम गर्जना मंडळात 'लोकसंवाद' अंतर्गत शासकीय योजनांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**
लोकसंवाद २०२६ या उपक्रमांतर्गत जुळे सोलापूर येथील ओम गर्जना युवा शक्ती सामाजिक व सांस्कृतिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने विविध शासकीय योजनांविषयीची माहिती देण्यात आली.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ यांनी या योजनेअंतर्गत सर्वसामान्य नागरिकांसाठी पाच लाख रुपयांपर्यंत उपचार मोफत असून सोलापूर शहरातील २२ रुग्णालयांमध्ये ही सेवा उपलब्ध असल्याचे सांगितले. तसेच आयुष्मान भारत कार्ड काढण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती दिली.

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त नविनता संगीता खंदारे यांनी शासनाच्या कौशल्य विभागामार्फत रोजगार निर्मितीसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. प्रधानमंत्री स्वनिधी योजना तसेच महिला बचत गटाविषयी सविस्तर माहिती महापालिकेचे समन्वयक समीर मुलानी यांनी दिली. माहिती कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक मिलिंद भिंगारे यांनी उपक्रमाचा उद्देश सांगितला. यावेळी ओम गर्जना गणेश मंडळाचे अध्यक्ष श्याम शिवराम धुरी, सचिव अंबादास कृष्णात पांढरे, खजिनदार संगमेश्वर सातलगावकर, सदस्य अर्चना जमादार, वसंत धोत्रे, शशिकांत जमादार आदी उपस्थित होते.



सोलापूर : होटगी रोड वरील विमानतळ परिसरातील रहिवासी विजयकुमार पाटील यांच्या घरातील गौराईचे छायाचित्र.

# 'लाला गणपती'च्या वतीने खेळाडूंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ सप्टेंबर-**
बुधले गल्ली बाळीवेस येथील लाला गणपती सामाजिक संस्थेच्या वतीने स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियामध्ये निवड झाल्याबद्दल प्रांजली कोरे, ज्ञानदा शिरवळ आणि अथर्व बारसे या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. गणरायाचे पूजन नगरसेवक विनायक विटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळेस मंचावर लक्ष्मण पाटील सर, मोहन कावळे, अण्णाराव सुतार यांची प्रमुख उपस्थिती होती.



सत्काराला उत्तर देताना ज्ञानदा शिरवळ म्हणाली कि, आम्हा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मैदानी खेळ हे महत्वाचे आहे. आमची ही झालेली निवड नक्कीच आमचं उज्वल भविष्य घडवणारी असेल तसेच केलेला सत्काराबद्दल मंडळाचे विशेष आभार मानले. नगरसेवक विनायक विटकर म्हणाले की, मंडळाचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून आपल्या पाल्याचा सर्वांगीण विकास व्हावा, या दृष्टीने आपण त्यांना खेळात सहभाग होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले.

# सोलापूरच्या दोन मान्यवरांचा श्रीलंकेत गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ सप्टेंबर-**
शिक्षण, समाजसेवा, धार्मिक, सांस्कृतिक आणि मानवतावादी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील दोन मान्यवरांचा श्रीलंकेत आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रा. गौरीशंकर बिराजदार यांनी सांगितले.

वेळापूर (ता.माळशिरस) येथील श्री बृहन मठाचे श्री. ष.ब्र. १०८ सद्गुरू सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी आणि जेऊर (ता. अक्कलकोट) येथील श्री काशिविश्वेश्वर प्रशालेच्या





प्रा.गायत्री बिराजदार यांना 'द ग्लोबल अचीव्हर्स अवॉर्ड २०२६' जाहीर झाला आहे. कर्नाटक राज्य डिजिटल मीडिया असोसिएशनच्या वतीने २० ते २३ सप्टेंबरदरम्यान श्रीलंकेतील कोलंबो येथील पेगासस रीफ येथे पुरस्कार सोहळा होणार आहे. या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींची निवड करण्यात आली आहे.

सद्गुरु सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी यांनी धार्मिक कार्यासोबत व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि गुरुकुलाच्या माध्यमातून संस्कारक्षम शिक्षणासाठी कार्य केले आहे.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक साहित्य तसेच गरजूंना अन्न, वस्त्र आणि विवाहासाठी मदत केली आहे. प्रा.गायत्री बिराजदार ह्या गेल्या १६ वर्षांहून अधिक काळ ग्रामीण व सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांसाठी कार्यरत आहेत. या पत्रकार परिषदेला पुरस्कारार्थींसह निसार शेख, डॉ. आप्पासाहेब उमदी उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कोरडा दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी ५० हजारांची मदत द्या!

### लोहारा तालुका काँग्रेसची तहसीलदारांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ सप्टेंबर -**
मराठवाड्यात पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप पिकांवर गंभीर संकट निर्माण झाले असून, धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी लोहारा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदारांकडे दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यासह म राठवाड्यातील अनेक भागांत पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर यांसह विविध खरीप पिकांची अवस्था बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी पिके वाळण्याच्या मार्गावर असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पिकांचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

दरम्यान, या मागण्यांची तातडीने दखल घेऊन निर्णय न झाल्यास २१ सप्टेंबर २०२६ रोजी लोहारा तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल, असा इशारा तालुकाध्यक्ष दयानंद पाटील यांनी दिला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### ‘जगाचा तू अधिपती, तूच रे गणपती’ भक्तिगीताचे पोस्टर अर्पण

**तुळजापूर, दि.१८ सप्टेंबर -**
गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तुळजापूरचे युवा संगीतकार व गायक रंगराज पुराणिक यांनी संगीतबद्ध केलेल्या ‘जगाचा तू अधिपती, तूच रे गणपती’ या भक्तिगीताचे पोस्टर तुळजाभवानी देवीच्या चरणी अर्पण करण्यात आले. श्रीनिवास गोविंद कुलकर्णी व मधुसूदन गोविंद कुलकर्णी निर्मित या गीताचे शब्द निलेश काटके यांचे असून, अभिमन्यू कार्लेकर यांनी संगीत निर्मिती केली आहे. गायक सौरभ साळुंके यांनी गीताला भावपूर्ण स्वर दिला आहे. डाऊन स्टुडिओ येथे गीताचे रेकॉर्डिंग करण्यात आले. पोस्टर अर्पणप्रसंगी संगीतकार रंगराज पुराणिक यांच्यासह विविध पुजारी मंडळांचे पदाधिकारी, तहसीलदार माया माने, देविदास गायकवाड, लेखक देविदास सौदागर, ज्ञानेश्वरी महेशराव कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.



### डी.टी.एस. परीक्षेत अदिरा दुबे हिचे सुवर्णयश

**लोहारा, दि.१८ सप्टेंबर -**
लोहारा तालुक्यातील धानुरी येथील विद्यामाता इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी कुमारी अदिरा अशोक दुबे हिने डी.टी.एस. स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत सुवर्णपदक पटकावले. या यशाबद्दल सालेगावच्या केंद्रप्रमुख के.ए. नडगेरी व शाळेच्या प्राचार्या हिरा हावळे-सोलापुरे यांच्या हस्ते अदिराला सुवर्णपदक व पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. अदिराच्या यशाबद्दल शेतकरी विकास संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अशोकराव जवळगे, सचिव किशोर साळुंके, ॲड. दीपक जवळगे, शिक्षक, पालक व मान्यवरांनी अभिनंदन केले.



### उमरग्यात लोटस पोदार स्कूलचे फुटबॉलमध्ये वर्चस्व

**उमरगा, दि.१८ सप्टेंबर -**
गुंजोटी येथील तालुका क्रीडा संकुलात १५ सप्टेंबर रोजी झालेल्या तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगाच्या १४ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुले आणि १७ वर्षांखालील मुली या तिन्ही संघांनी विजेतेपद पटकावले. या कामगिरीमुळे तिन्ही संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंना क्रीडा शिक्षक शाम दूधभाते, रोहित पायमल, प्रणिता मुळे व पल्लवी वाकळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य बी.पी. सिंग, उपप्राचार्य अतुल फावडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडू व क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.



### व्यापारी गणेश मंडळाच्या आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**नळदुर्ग, दि.१८ सप्टेंबर -**
गणेशोत्सवानिमित्त नळदुर्ग येथील व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने १६ सप्टेंबर रोजी आयोजित सर्व रोग निदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मल्लिकार्जुन मंदिराच्या सभागृहात झालेल्या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी २०६ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार केले. शिबिराचे उद्घाटन उपजिल्हा रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. चंचला बोडके यांच्या हस्ते झाले. यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे, नगरसेवक, पोलिस निरीक्षक रविंद्र गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मंडळाच्या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मंडळाचे अध्यक्ष आनंद काटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## २९ संरक्षित स्मारकांत दडले धाराशिवचे वैभव...

# धाराशिवच्या पर्यटनाला मिळणार नवी झळाळी

**इतिहास,श्रद्धा अन् निसर्गाची सांगड ; २९ राज्य संरक्षित स्मारकांच्या संवर्धनासह पर्यटनस्थळांच्या विकासाला चालना... पुरातत्व विभागाची माहिती...**







**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**
प्राचीन लेण्यांमधून उलगडणारा हजारो वर्षांचा इतिहास, तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची श्रद्धा, नळदुर्ग-परंड्यासारख्या भुईकोट किल्ल्यांचा दिमाख आणि तेरसारख्या प्राचीन नगरीचा सांस्कृतिक वारसा अशा इतिहास, अध्यात्म, संस्कृती आणि पर्यटनाच्या समृद्ध पदरांनी धाराशिव जिल्ह्याची ओळख घडली आहे. या वैभवशाली वारशाचे जतन करतानाच पर्यटक आणि भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी जिल्ह्यातील संरक्षित स्मारके व पर्यटनस्थळांच्या विकासाला नियोजनबद्ध चालना दिली जात आहे.

धाराशिव हा मराठवाड्यातील प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा असून, पूर्वी या जिल्ह्याचे नाव ‘उस्मानाबाद’ होते. प्राचीन काळापासून ‘धाराशिव’ या नावाने हा परिसर ओळखला जात असल्याचे शिलालेखांमधील उल्लेखांतून स्पष्ट होते. राष्ट्रकूट काळात सातव्या-आठव्या शतकात या परिसराला विशेष महत्त्व होते. जिल्ह्याचा बहुतांश भाग पठारी असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ७ हजार ५१२ चौरस किलोमीटर आहे. हा ऐतिहासिक व भौगोलिक वारसाच जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी मोठी ताकद ठरत आहे.

धाराशिव जिल्ह्यातील २९ वास्तू व स्थळे राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित करण्यात आली आहेत. यामध्ये धाराशिव लेणी, चामर (चांभार) लेणी, शिवगुरू समाधी मंदिर, हजरत समशुद्दीन दर्गा, तेर येथील त्रिविक्रम मंदिर, उत्तरेश्वर मंदिर, संत गोरोबा काकांचे घर, तीर्थकुंड, तसेच विविध प्रागैतिहासिक स्थळे आणि टेकड्यांचा समावेश आहे.

याशिवाय वडगाव येथील प्रागैतिहासिक स्थळ, जागजी येथील महालक्ष्मी मंदिर व बारव, तुळजापूरचे भवानी मंदिर व लावणी घुमट, नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला, परंडा किल्ला, माणकेश्वरचे महादेव मंदिर, शेंद्री (बु.) येथील प्रागैतिहासिक स्थळ, मुरूम येथील हिंदू मंदिर व शिलालेख, उम रग्याचे महादेव मंदिर आणि सास्तूर येथील घुमट यांचाही या संरक्षित वारशात समावेश आहे.तुळजापूर हे महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक असून, कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी राज्यासह देशभरातून भाविक येतात. तेर येथील संत गोरोबा काकांचा वारसा, जागजीचे महालक्ष्मी मंदिर, माणकेश्वरचे महादेव मंदिर तसेच उमरगा व मुरूम येथील प्राचीन धार्मिक वास्तू यामुळे जिल्ह्याच्या तीर्थपर्यटनाची व्याप्ती मोठी आहे.

दुसरीकडे नळदुर्ग व परंड्याचे किल्ले इतिहासप्रेमींना आकर्षित करतात, तर धाराशिवच्या लेण्या प्राचीन स्थापत्य आणि सांस्कृतिक वारशाची साक्ष देतात. या सर्व स्थळांना परस्परपूरक पर्यटन साखळीत जोडल्यास तीर्थपर्यटनासोबत ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पर्यटनालाही मोठी चालना मिळू शकते.

पर्यटनाचा विकास हा केवळ स्थळांच्या सुशोभीकरणापुरता मर्यादित नसतो.

पर्यटक व भाविकांची संख्या वाढल्यास स्थानिक वाहतूक, निवास, भोजन, प्रसाद विक्री, हस्तकला, लघुव्यवसाय, बचतगट आणि युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे वारसा संवर्धनासोबत पायाभूत सुविधांचा विकास स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ देणारा ठरू शकतो. यामध्ये तुळजापूर येथील घाटशीळ मंदिर, वडगाव (देव) येथील खंडोबा मंदिर, धाराशिव लेणी, चामर लेणी आणि नळदुर्ग किल्ला (भाग-२) या स्थळांचा समावेश आहे. ऐतिहासिक वास्तूंचे मूळ स्वरूप व महत्त्व जपत त्यांचे संवर्धन झाल्यास ही स्थळे भाविक व पर्यटकांसाठी अधिक आकर्षक ठरणार आहेत.

या स्थळांचे शास्त्रीय संवर्धन, पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा आणि प्रभावी प्रसिद्धी यांची सांगड घातल्यास धाराशिव जिल्हा तीर्थ, इतिहास आणि सांस्कृतिक पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून पुढे येऊ शकतो. स्मारकांचे संवर्धन म्हणजे केवळ वास्तूंची निगा राखणे नव्हे, तर इतिहासाशी असलेला जिवंत संवाद जपणे होय.

या वारशाला पर्यटन विकासाची जोड मिळाल्याने भाविकांना सुविधा, पर्यटकांना इतिहासाचा अनुभव आणि स्थानिकांना रोजगार-व्यवसायाच्या संधी अशी विकासाची नवी साखळी निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

### वारसा जपला तर पर्यटनाला नवी भरारी

धाराशिवची पर्यटनशक्ती त्याच्या विविधतेत दडलेली आहे. एका बाजूला तुळजाभवानी मातेचे श्रद्धास्थान, दुसरीकडे नळदुर्ग-परंड्याचे इतिहास सांगणारे किल्ले, प्राचीन लेण्या आणि तेरमधील संत गोरोबा काकांच्या स्मृती असा समृद्ध वारसा जिल्ह्याला लाभला आहे.

### आणखी तीन स्थळे विकासाच्या प्रतीक्षेत

पर्यटन विकासाची ही वाटचाल पुढे नेत उपळा येथील त्रिकुटेश्वर मंदिर, तेर येथील मुलानी टेकडी आणि धाराशिव येथील शिवगुरू समाधी या तीन स्थळांच्या विकासकामांचे प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) निधी योजनेंतर्गत करण्यात आले आहेत. ही कामे प्रत्यक्षात आल्यास जिल्ह्यातील आणखी काही महत्त्वाच्या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना पर्यटनाच्या नकाशावर ठळक स्थान मिळण्यास मदत होणार आहे.

### १४.३४ कोटींच्या निधीतून पाच स्थळांचा विकास...

जिल्ह्यातील ऐतिहासिक व पर्यटनस्थळांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीअंतर्गत गड-किल्ले, मंदिरे आणि महत्त्वाच्या संरक्षित स्मारकांच्या संवर्धनासाठी १४ कोटी ३४ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीतून पाच पर्यटनस्थळांच्या विकासाची कामे सुरू असल्याची माहिती पुरातत्त्व विभागाने दिली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार; छायाचित्रे व्हायरल करण्याची धमकी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**
लग्नाचे आमिष दाखवून ३२ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा तसेच फोनवर संदेश पाठवून त्रास देत छायाचित्रे व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी धाराशिव शहर पोलिस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला (नाव व गाव गोपनीय) हिच्यावर संबंधित तरुणाने दि. २१ सप्टेंबर २०२५ ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर फोनवर संदेश पाठवून तिला त्रास देण्यात आला. तसेच तिचे छायाचित्रण व्हायरल करण्याची धमकी दिल्याचे पीडितेने पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे.

या प्रकरणी पीडितेन दिलेल्या प्रथम खबरीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## तीन अनाथ बालकांना ‘आपले सरकार’ केंद्रातून स्वावलंबनाची संधी

### महिला व बाल विकास विभागाचा पुनर्वसनाचा उपक्रम; पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**
लहान वयातच मायेचे छत्र हरपलेल्या तीन अनाथ बालकांच्या पुनर्वसनासाठी महिला व बाल विकास विभागाने रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. मराठवाडा म ुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमात पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते साक्षी शिंदे (कळंब), आकाश जावळे (वाशी) आणि सिद्धिनाथ अनपट (तुळजापूर) यांना संबंधित तहसील कार्यालयात ‘आपले सरकार’ केंद्र चालविण्यासाठी मंजुरी प्रमाणपत्र देण्यात आले.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर



यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

प्रभारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे यांनी पुनर्वसनासाठी पुढाकार घेतला. या तिन्ही बालकांना केंद्र चालविण्यासाठी आवश्यक कक्षासह संपूर्ण किट मोफत देण्यात आले आहे.

‘आपले सरकार’ केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय व ऑनलाइन सेवा देतानाच या बालकांना उत्पन्नाचे शाश्वत साधन मिळणार असून, पुनर्वसनातून स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

## शेतकऱ्यांना ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात दिलासा : सरनाईक



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**
पावसाच्या दीर्घ खंडामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून, पाण्याच्या दुर्भिक्षामुळे शेतकऱ्यांसमोरील संकट गंभीर बनले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात दिलासा देण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे. अधिकारी व लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांशी संवाद साधून शासन त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास निर्माण करावा, असे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

**जिल्हा नियोजन समिती बैठकीत शाळा व आरोग्य सुविधांचा आढावा**

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जीर्ण झालेल्या जिल्हा परिषद शाळांच्या वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच गंभीर रुग्ण एमआरआय तपासणीपासून वंचित राहू नयेत, यासाठी आरोग्य विभागाने दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी केल्या.

बैठकीस खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर, आम दार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, पोलिस अधीक्षक रितू खोखर आदी उपस्थित होते.

दरम्यान, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत २०२६-२७ साठी ५७० कोटी ५३ लाख रुपयांचा नियतव्यय मंजूर असून, १५ सप्टेंबरअखेर ७० कोटी ५८ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. १६ कोटी ९१ लाख रुपये वितरित झाले असून, १२ कोटी ५७ लाख रुपयांचा खर्च झाला आहे.

## ना पाऊस, ना पीक; चाऱ्याचाही प्रश्न गंभीर!

### सोयाबीन पिके करपली, शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१८ सप्टेंबर -**
यंदाच्या खरीप हंगामात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने मोठी उघडीप दिल्याने वाशी तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. सुरुवातीला झालेल्या रिमझिम पावसाच्या भरवशावर आणि पुढे पाऊस चांगला होईल, या आशेने शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली. मात्र त्यानंतर पावसाने दीर्घ खंड दिल्याने पिकांना मोठा फटका बसला असून, विशेषतः सोयाबीन पिकांची अवस्था बिकट झाली आहे.

मागील वर्षी जूनपूर्वीच पावसाने दमदार हजेरी लावत परंडा, भूम आणि वाशी परिसराला झोडपून काढले होते. यंदा मात्र परिस्थिती पूर्णपणे उलट झाली आहे. पावसाअभावी जमि नीतील ओलावा कमी झाला असून अनेक ठिकाणी पिके करपून गेली आहेत. विहिरी, बोअरवेल आणि शेततळ्यांमधील पाणीसाठाही दिवसेंदिवस कमी होत असल्याने पिकांना पाणी देणे शेतकऱ्यांना शक्य होत नाही.

शेतीपिकांसोबतच जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. शेतांमध्ये हिरवा चारा उपलब्ध नसल्याने जनावरे जगवायची कशी, त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची व्यवस्था भविष्यात कशी करायची, असा प्रश्न पशुपालकांसमोर निर्माण झाला आहे.

‘ना पाऊस, ना पीक आणि ना जनावरांना चारा’ अशी गंभीर परिस्थिती सध्या तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने परिस्थितीची तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष शेतांमध्ये जाऊन पिकांची पाहणी करावी, पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

## कृषी व्यवसायिक धर्मराज चावरे यांना 'मराठवाडा रत्न पुरस्कार



तभा. वृत्तसेवा

अहमदपूर दि. १८ सप्टेंबर : येथील सोनालिका ट्रॅक्टर व ट्रेलर्सचे संचालक, युवा उद्योजक धर्मराज चावरे यांना कृषी व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित शानदार पुरस्कार सोहळ्यात प्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते 'मराठवाडा रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत गेल्या ३१ वर्षांपासून शेतकरी आणि शेतीला पूरक यंत्रसामग्रीच्या क्षेत्रात चावरे यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन कृषी यांत्रिकीकरणाला चालना देण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

धर्मराज चावरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी मंत्री विनायकराव पाटील, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके पाटील, माजी आमदार बब्रुवाहन खंदाडे, नगराध्यक्ष स्वप्निल हत्ते, उपनगराध्यक्ष आयाज शेख, शिवकुमार सोनटक्के, गुंडप्पा तत्तापुरे, ओम भाऊ पुणे, राम तत्तापूरे, धनराज चावरे, ज्ञानोबा बडगीरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# पाणी टंचाईच्या आढावा बैठकीत पीक,पाणी, चाऱ्यांवर चर्चा

## औसा मतदारसंघातील परिस्थितीबाबत आमदार अभिमन्यू पवारांनी मांडली व्यथा



तभा वृत्तसेवा

औसा दि.१८ सप्टेंबर : अपुरा पाऊस, खरीप पिकांचे नुकसान आणि आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्ह्यातील पाणी व चारा उपलब्धतेसह पीक परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.या बैठकीत आमदार अभिमन्यू पवार यांनी ओसा मतदारसंघातील भीषण परिस्थिती मांडून चर्चा केली.

सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक झाली. आमदार विक्रम काळे, आमदार संजय बनसोडे यांनी दूरदृश्य प्रणाली द्वारे सहभाग घेतला.जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील,कृषी व पशुसंवर्धन सभापती कविता गोरे, महानोर जयश्री सोनकांबळे, जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाड अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, महापालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक अमोल तांबे व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत औसा मतदारसंघातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, उपलब्ध जलसाठा, संभाव्य पाणीटंचाई तसेच पशुधनासाठी उपलब्ध चारा याबाबत आमदार अभिमन्यू पवार यांनी सविस्तर माहिती मांडली. आगामी काळात पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन, जलवाहिन्यांची दुरुस्ती तसेच पाण्याचा अपव्यय व अवैध उपसा रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता त्यांनी बैठकीत मांडली. पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत जनजागृती करण्यावरही त्यांनी भर दिला.

पावसाचे प्रमाण कमी असल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे पीक कापणी प्रयोगात नुकसानीची वस्तुस्थिती अचूकपणे नोंदवून शासनाकडे अहवाल सादर करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे सूक्ष्म नियोजन आतापासूनच करण्याच्या सूचना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिल्या. संभाव्य टंचाई लक्षात घेऊन प्रशासनाने पूर्ण तयारी ठेवावी, तसेच गावागावांत पाणीटंचाई निर्माण झाल्यास तातडीने उपाययोजना करून पाणीपुरवठा सुरू करावा, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

### अवैध उपसा रोखण्यासाठी कारवाईचे निर्देश

जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पातील पाणी साठा पिण्यासाठी आरक्षित करण्यात आला असून त्याचा उपसा रोखण्यासाठी विशेष पथके गठित करून सातत्याने कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले आहेत.तसेचमांजरा धरणातून होणारा अवैध उपसा व लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यातून होणारी पाणी चोरी रोखण्यासाठी महापालिका, महावितरण, पोलीस व महसूल विभागाने संयुक्त मोहीम राबवावी.असे त्यांनी यावेळी सांगितले.

## भोजराजनगर शाळेत २५० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी गरजू लाभार्थ्यांना चष्म्यांचे वाटप



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १८ सप्टेंबर : विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोजराजनगर येथे मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिर उत्साहात पार पडले. सुरज दादा चव्हाण, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या सौजन्याने तसेच शिवश्री फाउंडेशन व शिवश्री व्हिजन केअर सेंटर, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात तब्बल २५० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीत आवश्यक असलेल्या ४ लाभार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना डोळ्यांची निगा, नियमित नेत्र तपासणी आणि दृष्टीशी संबंधित समस्या उद्भवल्यास वेळेत उपचार घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमास शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुजाता बरबटले, उपाध्यक्ष संदिप धुमाळे, सौ. दिपाली कांबळे, मुख्याध्यापक परमेश्र्वर तोंडारे, नगरसेवक सुधीर लखनगावे तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते शिवशंकर होनमाने, नंदू तांबोळकर, जनक बिरादार, रुद्रा जळकोटे, अंगद शेंडगे, श्रीकांत कदम यांच्यासह कार्यकर्ते व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे आरोग्य हीच त्यांची उज्ज्वल भविष्यासाठीचे खरे भांडवल आहे. शाळेच्या माध्यमातून अशा आरोग्यविषयक उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे, असे मत शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष संदिप धुमाळे यांनी व्यक्त केले. तसेच शिबिराच्या आयोजनासाठी सुरज दादा चव्हाण, शिवश्री फाउंडेशन आणि शिवश्री व्हिजन केअर सेंटरचे त्यांनी आभार मानले.

## परिस्थितीचे भांडवल न करता त्यावर मात करण्यासाठी प्रयत्न करावा : प्राचार्य डॉ. पौळ

## महाराष्ट्र महाविद्यालयात पालक-शिक्षक समन्वय सभा संपन्न



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १८ सप्टेंबर : महाविद्यालय हा समाज विकासाचा एक महत्त्वाचा घटक आहे. महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या भोतिक सुविधा, गुणी शिक्षक यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. नितीवान पिढी घडते. महाविद्यालयात होत असलेल्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होतो. आज ग्रामीण भागातील परिस्थिती निसर्गाच्या लहरीपणामुळे फार बिकट बनली आहे, यातूनच आर्थिक,सामाजिक, शैक्षणिक समस्या निर्माण झाल्या आहेत. परंतु अशा परिस्थितीचे भांडवल न करता त्यावर मात करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, असे मत महाराष्ट्र औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात आयोजित शिक्षक-पालक समन्वय सभेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपलं ध्येय निश्र्चित करावे व त्या दिशेने वाटचाल करावी, त्या वाटचालीत येणाऱ्या अडचणी आपले पालक व शिक्षक यांच्या समन्वयावातून सोडवाव्यात. जिथे ज्ञान मिळेल त्यांच्या संपर्कात जाऊन आपलं नेटवर्क ॲक्टिव्ह करून घ्यावं असा सल्लाही त्यांनी दिला. महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष पाटील निलंगेकर, सचिव सरतापे यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्यात.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम होते. अध्यक्ष समारोपात त्यांनी महाविद्यालयात होत असलेल्या विविध उपक्रमाबाबत माहिती दिली. कौशल्यावर आधारित शिक्षण पद्धती असल्यामुळे पुस्तकी ज्ञानाबरोबरच विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करून घ्यावीत, त्यासाठी त्यांनी वर्गात आले पाहिजे. पालकांचीही ही महत्त्वाची जबाबदारी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड यांनी या समन्वय सभेत मनोगत व्यक्त करताना, पालकांनी आपल्या घरातील वातावरण तणावमुक्त ठेवावे, अपयश मिळालं तर आपल्या पाल्याला समजून सांगावे व त्याचा आत्मविश्र्वास वाढवावा, तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल महत्त्वाचा असला तरी त्याचा वापर ज्ञानार्जनासाठीच करावा, आपल्या पाल्याच्या प्रगतीबद्दल महाविद्यालयात येऊन प्राचार्य किंवा शिक्षकांशी संवाद साधावा अशा विविध मुद्द्यावर आपले मत व्यक्त केले. काही पालकांनीही आपल्या प्रतिक्रिया यात व्यक्त केल्यात त्यातून महाविद्यालयातून मिळणाऱ्या विविध सुविधा व शिक्षणाबद्दल समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नुकत्याच जाहीर केलेल्या गुणवत्ता यादीत महाविद्यालयातील नऊ विद्यार्थ्यांचा समावेश आहे त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक- पालक समन्वय समितीचे समन्वयक प्रा. शिवरुद्र बदनाळे यांनी केले, सूत्रसंचालन कु. अंकिता मुळे व कु. अंकिता आगलावे यांनी तर आभार प्रा. संदीप सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. रवींद्र मदरसे, प्रा. संदीप सूर्यवंशी, प्रा. विकास खरात, प्रा. अभिमन्यू गंगाजी यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमासाठी विविध शाखेतील विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समाज संघटन काळाची गरज : संजय विभूते

तभा वृत्तसेवा

उदगीर, दि. १८ सप्टेंबर : कोल्हापूरच्या ऐतिहासिक भूमीत २३ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र प्रांतिक तेलिक महासभेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य राज्यस्तरीय समाज मेळावा संपूर्ण महाराष्ट्रातील समाज बांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यशस्वी झाला.

या मेळाव्याबद्दल समाज बांधवांचे प्रत्यक्ष आभार मानण्यासाठी मेळाव्याचे संयोजक, महाराष्ट्र प्रांतिक तेलिक महासभेचे उपाध्यक्ष तथा शिवसेना शिंदे गटाचे सांगली जिल्हाप्रमुख संजय विभूते व पश्र्चिम विभागीय उपाध्यक्ष राजाभाऊ लोखंडे व प्रवीण मुखेडकर (खढ एपस.) यांनी कृतज्ञता व आभार दौरा आयोजित केला आहे. या दौऱ्यादरम्यान रविवारी उदगीरमध्ये आगमन झाल्यानंतर महाराष्ट्र प्रांतिक तेलिक महासभा व तेली समाजाच्या वतीने विशेष अतिथी शनि देव मंदिर, उदगीर येथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना संजय विभूते म्हणाले की, समाज संघटित असेल तरच समाजाच्या समस्या प्रभावीपणे सोडविता येतात. त्यामुळे समाज संघटन ही काळाची गरज आहे.

कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय मेळाव्याला संपूर्ण महाराष्ट्रातून समाज बांधवांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा समाजाच्या एकजुटीचे आणि ताकदीचे दर्शन घडविणारा होता. ते पुढे म्हणाले, आपल्या अथांग उत्साहामुळे आणि अभूतपूर्व उपस्थितीमुळे कोल्हापूर येथील राज्यस्तरीय मेळावा प्रचंड यशस्वी झाला. या मेळाव्याचे खरे शिल्पकार संपूर्ण महाराष्ट्रातील समाज बांधव आहेत. आपल्या अफाट प्रतिसादाबद्दल आभार मानण्यासाठी शब्द अपुरे पडतात.

हा केवळ मेळावा नव्हता, तर समाजाच्या वज्रमुठीचे आणि एकतेचे दर्शन होते. याच प्रेमाचा स्वीकार करण्यासाठी आणि समाज बांधवांचे प्रत्यक्ष आभार मानण्यासाठी आपण आभार दौऱ्याच्या माध्यमातून विविध ठिकाणी भेटी देत असल्याचे त्यांनी सांगितले.

एकच ध्यास... समाजाची एकजूट! एकच संकल्प... तेली समाजाची ताकद! गट-तट विसरून एकत्र येऊया आणि समाजाची ताकद दाखवूया, असे आवाहनही संजय विभूते यांनी यावेळी केले.

कार्यक्रमात उपस्थित राजेश चिल्लरगे, महाराष्ट्र प्रांतिक तेलिक महासभा लातूर जिल्हा सचिव तसेच इतर मान्यवर शिवशंकर चिल्लरगे, ओम विश्र्वनाथे, सुरेश चौधरी, कुमार विश्र्वनाथे, बाबुराव चिल्लरगे, अशोक हुडगे, चंद्रकांत भद्रशेट्टे, कुमार चौधरी, शंकर विश्र्वनाथे, ॲड. सोमेश्र्वर राऊत, सुभाष बडीहवेली, भद्रू चौधरी, गंगाधर बडीहवेली, उमाकांत गुडले, सोमनाथ चिल्लरगे यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी व तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार चिल्लरगे यांनी केले, तर आभार व्यक्त अमर खेडे यांनी मानले.

## माहेश्वरी समाजात ऋषी पंचमी राखी बंधन उत्साहात

### राखी बांधण्याची वर्षानुवर्षांची अनोखी परंपरा; प्रेम, आपुलकी आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १८ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात माहेश्र्वरी समाजाची भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेमाची परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडली. गणेश चतुर्थीला गणरायाचे आगमन झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी समाजबांधव एकत्र येऊन राखी बंधनाचा सण साजरा करतात. वर्षानुवर्षे जपली गेलेली ही परंपरा केवळ राखी बांधण्यापुरती मर्यादित नसून, नात्यांमधील प्रेम, विश्र्वास, जिव्हाळा आणि सामाजिक एकोपा अधिक दृढ करणारी ठरत आहे.

माहेश्र्वरी समाजातील महिला आपल्या भावाच्या मनगटावर प्रेमाने राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची, सुख-समृद्धीची कामना करतात. तर भाऊही बहिणीच्या सुख-दुःखात सदैव सोबत राहण्याचे आणि तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्र्वासन देतो. त्यामुळे राखीचा हा धागा केवळ मनगटावर बांधला जात नाही, तर तो आयुष्यभराच्या प्रेमाची, विश्र्वासाची आणि आपुलकीची गाठ अधिक घट्ट करतो.

ऋषी पंचमीच्या निमित्ताने सप्तर्षींचे स्मरण आणि पूजन करण्याची धार्मिक परंपरा असताना, याच कालखंडात माहेश्र्वरी समाजातील राखी बंधनाची परंपरा नात्यांना नव्याने उजाळा देणारी ठरते. आधुनिक जीवनशैलीमुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होत असताना अशा परंपरांमुळे कुटुंबातील सदस्य तसेच समाजबांधव एकत्र येतात आणि आपुलकीचे बंध अधिक मजबूत होतात.

या उत्सवासाठी समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक-युवती तसेच लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले. बहिणींनी भावांना राखी बांधली, औक्षण केले आणि त्यांच्या सुखी व निरोगी आयुष्यासाठी ईश्र्वरचरणी प्रार्थना केली. भावांनीही बहिणींना प्रेम, सन्मान आणि सुरक्षिततेची भावना देत त्यांच्या प्रत्येक सुख-दुःखात सहभागी होण्याचा संकल्प व्यक्त केला.

चार-पाच दशकांपासून ही परंपरा पाहणाऱ्या ज्येष्ठांच्या मते, काळ बदलला, जीवनशैली बदलली; मात्र राखीच्या या धाग्यातील प्रेम आणि आपुलकी आजही तितकीच घट्ट आहे. गणरायाच्या आगमनानंतर समाजातील प्रत्येक घरात आणि कुटुंबात निर्माण होणारे हे आनंदाचे वातावरण माहेश्र्वरी समाजाच्या एकजुटीचे आणि संस्कृतीशी असलेल्या नात्याचे सुंदर दर्शन घडवते.

# लेखी आश्वासनानंतर भादेकरांचे आमरण उपोषण स्थगित

## शिक्षण विभागाचा पुढाकार उपोषणाला तिसऱ्या दिवशी यशकन्या प्रशाला आणि जिल्हा परिषद शाळा स्वतंत्रच विघ्नहर्त्यांच्या आरतीने उपोषणाची सांगता



तरुण भारत इफेक्ट

तभा वृत्तसेवा

औसा दि.१८ सप्टेंबर : उपोषण कर्तव्यांची केलेल्या मागण्या पुर्णपणे मान्य करून जिल्हा परिषद कन्या माध्यमिक शाळा व जिल्हा परिषद माध्यमिक प्रशाला या दोन्ही शाळांच्या एकत्रिकरणाचा अधिकृत निर्णय झाला नाही.आजही या दोन्ही शाळा स्वतंत्रच आहेत.शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन न करता जी शाळा पाडण्यात आली. त्यात अनियमितता आढळून आली असून या तक्रारीची चौकशी तक्रारदारांना सोबत घेऊन करण्यात येईल. तोपर्यंत चालू काम ३० सप्टेंबर पर्यंत स्थगित करण्यात येईल.असे गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांनी लेखी आश्र्वासन यावेळी देवून विघ्नहर्ता श्री गणेशाची आरती करून राम पाटील यांचे आमरण उपोषण सोडविले आहे.तसेच शाळा पाडकाम करताना विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था केली नाही. ती लगेच संबंधित एजन्सीने स्वखर्चाने करावी.असे यावेळी ठरले आहे.

भेटा केंद्रप्रमुख शाम क्षिरसागर व बांधकाम विभागाचे उप अभियंता प्रदिप देवशेटवार , ग्रामपंचायत अधिकारी आर आर शिंदे व गावकरी उपस्थित होते.

तालुक्यातील भादा येथे जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सुरू होती.तर ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी.यासाठीतत्कालिन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा शिक्षण समितीचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांच्या प्रयत्नातून गेल्या २५ वर्षांपासून कन्या माध्यमिक शाळा सुरू करण्यात आली.एका गावात एकाच मैदानावर दोन शाळा असतील तर दोन्ही शाळाचे एकत्रीकरण करावे.असा आदेश राज्य सरकारने दिला. स्वतंत्र मुलींची शाळा असल्याने सुधारलेली मुलींच्या शिक्षणाची गुणवत्तेचे काय होणार.असा प्रश्र्न मुलींच्या पालकांना पडला. कन्या माध्यमिक शाळा स्वतंत्र असावी अशी ग्रामपंचायत कार्यालयाकडे मागणी केली.ग्रामपंचायत कार्यालयाने ठराव मंजूर केला. आणि ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यात आला.याचबरोबशालेय व्यवस्थापन समितीने ठराव मंजूर करून स्वतंत्र कन्या माध्यमिक शाळेची मागणी केली.तसेच गावात मुलींची स्वतंत्र शाळा असावी.म्हणून गावातील ३५-४०जणांनी घरांची दोन एकर जागा शाळेसाठी दानं देऊन शाळेच्या नावाने केली.केवळ मुलींच्या शाळेसाठी गावकऱ्यांची ओढ पाहून शाळेच्या बांधकामासाठी आमदार रमेश कराड यांनी जिल्हा नियोजन समिती कडून ९०लाख रूपयांचा निधी मंजूर करून घेतला. शाळेच्या बांधकामाचा आदेश निघून कारवाई पुर्ण झाली.

यानंतर गावकऱ्यांनी दान दिलेल्या दोन एकर जागेत कन्या माध्यमिक शाळेचे बांधकाम अपेक्षित असताना जिल्हा परिषद माध्यमिक शाळा त्या कांहीं वर्ग खोल्या पाडण्यात आल्या. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवून नये.यासाठी कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. शिवाय शाळेचे शैक्षणिक वेळापत्रक बदलण्यात आले . यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करून रास्ता रोको चा इशारा देण्यात आला होता.पण तांत्रिक कारणांमुळे झाले नाही.यानंतर आमरण उपोषणाचा इशारा देत मंगळवारपासून उपोषणास सुरुवात करण्यात आली.गेली दोन दिवस शिक्षण विभागाच्या वतीने उपोषण स्थळी भेट देऊन चौकशी करण्यात आली.आणि तिसऱ्या दिवशी गटशिक्षणाधिकारी यांनी लेखी आश्र्वासन देत आमरण उपोषण आंदोलन थांबवले आहे. लेखी आश्र्वासनामुळे राम पाटील यांच्या आंदोलनास यश आले आहे.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## समर्थ तरुण गणेश मंडळातर्फे नाण्यांचे प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ सप्टेंबर -**

१९७१ मध्ये स्थापन झालेल्या समर्थ तरुण गणेश मंडळाच्या ५५ व्या वर्षानिमित्त जिजामाता प्राथमिक विद्यामंदिर येथे दुर्मिळ जुन्या नाण्यांचे प्रदर्शन आणि भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या उपक्रमाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रदर्शनात प्राचीन काळापासून ब्रिटिशकालीन तसेच स्वतंत्र भारतातील विविध दुर्मिळ नाणी व नोटा मांडण्यात आल्या. नाणी संकलकांनी विद्यार्थ्यांना त्यांचा इतिहास व महत्त्व समजावून सांगितले. चित्रकला स्पर्धेत शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेत 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव' व 'आपली संस्कृती' या विषयांवर चित्रे साकारली. यावेळी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**इतिहास, संस्कृती आणि कलेची आवड जोपासण्याचा उपक्रम**





### संक्षिप्त वृत्त...



## गणेशोत्सवानिमित्त सात दिवसांची वैचारिक व्याख्यानमाला

**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात गणेशोत्सवानिमित्त गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेली वैचारिक व्याख्यानमालेची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली आहे. संस्थेचे विश्वस्त मल्हारदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सलग सात दिवस विविध वैचारिक व प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेत पोलीस निरीक्षक दराडे यांनी कायदे व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत, तर सहाय्यक संचालक अमोल ताकभाते यांनी शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीबाबत मार्गदर्शन केले. विश्वस्त अशोकभाऊ शिंदे, ह.भ.प. अनसुर्डीकर महाराज व प्रतिभाताई अनसुर्डीकर यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबाहेरील विविध विषयांचे ज्ञान मिळत असून, 'भक्तीसोबत विचार आणि उत्सवासोबत प्रबोधन' या संकल्पनेतून गणेशोत्सव साजरा होत आहे.



## डॉ. सर्फराज तांबोळी यांचे यश

**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**

के.टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सर्फराज बशीर तांबोळी यांनी PharmD पदवीनंतर पीएच.डी. पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली. अलवर, राजस्थान येथील सुनराईझ विद्यापीठातून डॉ. विजय तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी 'टाईप-२ डायबेटिस मेलिटसमधील डायबेटिक रेटिनोपॅथी' या विषयावर संशोधन केले. या शैक्षणिक कामगिरीमुळे महाराष्ट्रातील पहिले PharmD-PhD धारक होण्याचा मान मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यांच्या यशात कुटुंबीय, सहकारी व मित्रपरिवाराचे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. पत्नी डॉ. अलीशा शेख यांनीही त्यांना सातत्याने प्रोत्साहन दिले. या यशाबद्दल महाविद्यालय परिवार, विद्यार्थी व मित्रपरिवाराकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.




## जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत स्वराली, प्रेरणा प्रथम

**तुळजापूर, दि.१८ सप्टेंबर -**

विहिरीतील मानाचा कोट गणपती जय भारत तरुण मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत लहान गटात स्वराली श्रीपाद शिंदे, तर मोठ्या गटात प्रेरणा गंधुरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. लहान गटात प्रबुद्ध किशोर वडरराव यांनी द्वितीय, भक्ती ज्ञानेश्वर वाघ यांनी तृतीय क्रमांक मिळविला. मोठ्या गटात कुणाल नरवडे द्वितीय, तर जना क्षीरसागर तृतीय ठरले. स्पर्धेचे उद्घाटन युवास्पंदन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेंद्र कावरे व जय भारत तरुण मंडळाचे आधारस्तंभ इंद्रजीत साळुंके यांच्या हस्ते झाले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, सभासद व स्पर्धक उपस्थित होते.



## श्री. कुलस्वामिनी विद्यालयात मुक्तिसंग्राम दिन उत्साहात

**तुळजापूर, दि.१८ सप्टेंबर -**

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित श्री. कुलस्वामिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा ज्योतिबा फुले रात्रशाळेत १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य नागनाथ पिसे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# 'चला शाळेत जाऊया' उपक्रम : एकाच दिवशी १,०८० शाळांची अधिकाऱ्यांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**

आपला जीव धाराशिव - व्हिजन २०३० आणि 'चला शाळेत जाऊया' या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषदेच्या तब्बल १,०८० शाळांची एकाच दिवशी वरिष्ठ व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. ग्रामीण भागातील शाळांमधील भौतिक सुविधांची सद्यस्थिती जाणून घेऊन आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दि. १५ सप्टेंबर रोजी ही विशेष मोहीम राबविण्यात आली.



या मोहिमेत मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, प्रकल्प संचालक अनुप शेंगुलवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम भालके, शिक्षणाधिकारी कैलास पिकवणे यांच्यासह जिल्हा परिषदेतील सर्व विभागप्रमुख तसेच वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ स्तरावरील क्षेत्रीय अधिकारी सहभागी झाले. अधिकाऱ्यांनी विविध तालुक्यांतील जिल्हा परिषद शाळांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. शाळा भेटीदरम्यान शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, सरपंच, माजी विद्यार्थी संघाचे प्रतिनिधी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधण्यात आला.

प्रत्येक शाळेतील उपलब्ध आणि आवश्यक भौतिक सुविधांची माहिती निर्धारित नमुन्यात संकलित करण्यात आली. वर्गखोल्या, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वीज, संगणक, डिजिटल सुविधा, क्रीडा साहित्य, फर्निचर आदींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. उपलब्ध नसलेल्या अथवा अपुऱ्या सुविधांची माहिती घेऊन त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठीही माहिती संकलित करण्यात आली.

विशेष शाळा तपासणी मोहिमेदरम्यान शाळांकडून 'एव्हिलेश्रश्रशलीं' मोबाईल पद्धारे यापूर्वी संकलित केलेल्या भौतिक सुविधांच्या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. त्यामुळे शाळानिहाय उपलब्ध सुविधा आणि आवश्यक सुविधांची वस्तुनिष्ठ माहिती प्रशासनाला उपलब्ध झाली आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतील 'सात ते नऊ - टीव्ही व मोबाईल बंद, अभ्यास सुरू' या उपक्रमाचाही शाळा भेटीदरम्यान आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी अधिकारी, पालक व ग्रामस्थांशी संवाद साधण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना नियमित अभ्यासासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला असून, उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती उषाताई रविंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनातून जिल्ह्यातील शाळांमधील शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे.

## इनोव्हा गाड्या स्वस्तात देण्याचे आमिष; ३२ लाखांची फसवणूक

### उमरग्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल...




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**

डीएसके मोटार्स प्रा. लि. कंपनीच्या एनसीएलटी प्रकरणात आपण वकील व एजंट असल्याची बतावणी करून कंपनीच्या इनोव्हा गाड्या कमी किमतीत खरेदी करून देण्याचे आमिष दाखवत उमरग्यातील एका व्यक्तीसह त्याच्या मित्रांकडून तब्बल ३२ लाख ३ हजार ६०१ रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. गाड्या न देता आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी उमरगा पोलिसांनी पुण्यातील दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ऋषीकेश केशव करवंदे आणि चंद्रिका ऋषीकेश करवंदे, दोघे रा. वक्रतुंड अपार्टमेंट, हिंगणे खुर्द, पुणे, अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी संतोष हरिश्चंद्र जाधव (५२, रा. सुंदरवाडी, ह.मु. डिग्गी रोड, उमरगा) यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी उमरगा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

फिर्यादीनुसार, २७ मार्च २०२५ ते ५ जुलै २०२६ या कालावधीत आरोपींनी पुणे व उमरगा येथे फिर्यादीशी संपर्क साधला. आपण डीएसके मोटार्स प्रा. लि. कंपनीच्या एनसीएलटी प्रकरणात वकील/एजंट असल्याचे सांगून कंपनीच्या इनोव्हा गाड्या बाजारभावापेक्षा कमी किमतीत मिळवून देण्याचे आमिष त्यांनी दाखविले. त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून फिर्यादी संतोष जाधव तसेच त्यांचे मित्र मधुकर चौधरी व अमोल मंजुळकर यांनी फोन-पे आणि रोख स्वरूपात एकूण ३२,०३,६०१ रुपये दिले.

मात्र, पैसे घेतल्यानंतर आरोपींनी आश्वासन दिलेल्या इनोव्हा गाड्या दिल्या नाहीत. पैसे परत न करता फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पोलिसांत धाव घेतली. तसेच तक्रार केल्यास मी वकील आहे, हे लक्षात असू द्या, अशी धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अनाळा जि. प. शाळेला सीसीटीव्ही यंत्रणा भेट



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ सप्टेंबर -**

विद्यार्थ्यांची सुरक्षितता व शाळेतील शिस्त अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने अनाळा येथील जिल्हा परिषद शाळेला शालेय समितीचे अध्यक्ष विनोद चिंतामणी यांच्या वतीने संपूर्ण सीसीटीव्ही यंत्रणा भेट देण्यात आली. या यंत्रणेचे उद्घाटन आंबी पोलिस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक अर्जुन चौधर, पोलिस उपनिरीक्षक सुनील खचकड व ग्रेड पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब होडशिल यांच्या हस्ते झाले.

शाळेच्या विविध भागांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यामुळे परिसरावर देखरेख ठेवण्यास मदत होणार आहे. सामाजिक बांधिलकीतून केलेल्या या मदतीबद्दल शाळेच्या वतीने विनोद चिंतामणी यांचे आभार मानण्यात आले.

यावेळी विस्तार अधिकारी रेवनाथ कदम, उपाध्यक्ष जालिंदर शिंदे, मुख्याध्यापक मुबारक पठाण, पोलिस कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## तृतीयपंथीयाच्या हाती 'आपले सरकार सेवा केंद्र'

### मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते उद्घाटन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालय, धाराशिव अंतर्गत जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या संकल्पनेतून सर्व सुविधांनी सुसज्ज करण्यात आलेल्या आदर्श 'आपले सरकार सेवा केंद्रा'चे उद्घाटन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी खा. राजेनिंबाळकर, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. नागरिकांना विविध शासकीय सेवा, दाखले आणि योजनांचा लाभ सुलभ व तत्परतेने मिळावा, या उद्देशाने हे सेवा केंद्र आधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्यात आले आहे. शासकीय कामकाजासाठी नागरिकांना करावी लागणारी धावपळ कमी करून एकाच ठिकाणी विविध सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या आदर्श सेवा केंद्राचे व्यवस्थापन तृतीयपंथी देवांशी काकडे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

जिल्हाधिकारी पुजार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या सेवा केंद्रामुळे नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ अधिक सुलभतेने मिळणार असल्याची माहिती तहसीलदार डॉ. जाधव यांनी दिली.

## पावसाच्या खंडाने धाराशिवचा खरीप संकटात; दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाचा मोठा खंड पडल्याने पिके धोक्यात आली आहेत. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करावी आणि संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत व विविध शासकीय सवलती द्याव्यात, अशी मागणी एमआयएमचे धाराशिव जिल्हाध्यक्ष शहेबाज काझी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, पावसाअभावी खरीप पिकांची वाढ खुंटली असून अनेक भागांत पिके वाळण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणींमुळे आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांवर पावसाच्या अनियमिततेमुळे आणखी मोठे संकट ओढवले आहे.

जिल्ह्यात तातडीने दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करून दुष्काळी मदत लागू करावी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविमा योजनेअंतर्गत तातडीने भरपाई मिळवून द्यावी, पशुधनासाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी तसेच गरजेनुसार चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. पाणीटंचाई निर्माण झालेल्या गावांत तात्काळ टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा आणि पुढील हंगामासाठी दर्जेदार व सुरक्षित बियाणे उपलब्ध करून द्यावे, असेही निवेदनात नमूद आहे.

## माझी जादूची शिकवण्याची पिशवी ठरतेय विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची जादू

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ सप्टेंबर -**

'चला शाळेत जाऊ या' अभियानांतर्गत पंचायत समिती, तुळजापूरच्या विस्ताराधिकारी श्रीमती जे.पी. नाईक यांनी दि.१५ सप्टेंबर रोजी जि. प. प्राथमिक शाळा, आरळी बुद्रुक येथे भेट देऊन शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती घेतली.

यावेळी शिक्षिका प्रीती आंबुरे यांनी विकसित केलेल्या 'माझी जादूची शिकवण्याची पिशवी' या नवोपक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या अध्ययनस्तरानुसार दररोज आनंददायी, बहुविषयक, कृतीशील आणि विद्यार्थी-केंद्रित अध्ययनाची संधी मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या सादरीकरणात विद्यार्थिनी जारा सलमान कारभारी हिने 'आजची जादूगार' म्हणून उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध शैक्षणिक साहित्य आणि कृतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अध्ययनाचा आनंद कसा मिळवून देता येतो, याचे प्रत्यक्ष सादरीकरण यावेळी करण्यात आले.

'जादूची शिकवण्याची पिशवी' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाबाबत उत्सुकता निर्माण होत असून, त्यांचा सहभाग वाढण्यासोबतच अनुभवाधारित शिक्षणाला चालना मिळत असल्याचे यावेळी दिसून आले.

## नळदुर्ग किल्ल्यावर मराठवाडा मुक्ती दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ सप्टेंबर -**

नळदुर्ग येथे १७ सप्टेंबर रोजी ७९ वा मराठवाडा मुक्ती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील शाळा, महाविद्यालये, नगरपालिका, पोलिस ठाणे, महामार्ग पोलिस कार्यालय तसेच हुतात्मा स्मारक आदी ठिकाणी राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला.

ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्यावर झाला. नगराध्यक्ष बसवराज धरणे व उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार यांच्या उपस्थितीत तहसीलदार प्रमोद गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी, शिक्षक तसेच नागरिक उपस्थित होते.

## गणपती मंडळात 'इंडिया पोस्ट'चे रात्र शिबिर; धाराशिव शहरातील विविध मंडळांत २५ सप्टेंबरपर्यंत आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ सप्टेंबर -**

गणपती उत्सवाच्या कालावधीत नागरिकांना टपाल विभागाच्या विविध सेवा सहज उपलब्ध करून देण्यासाठी धाराशिव डाक विभागाच्या वतीने शहरातील विविध गणपती मंडळांमध्ये 'गणपती रात्र शिबिरां'चे आयोजन करण्यात येत आहे. गणेश नगर गणपती मंडळ येथे गुरुवारी (दि. १७) सायंकाळी ७.३० ते रात्री ११.३० या वेळेत विशेष शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.

उत्सवाच्या काळात टपाल विभागाला नागरिकांच्या अधिक जवळ नेणे, सुरक्षित बचत, विमा, पार्सल वितरण तसेच आधुनिक टपाल सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. शिबिरामध्ये नागरिकांना टपाल विभागाच्या विविध सेवांची माहिती घेण्यासह आवश्यक सुविधांचा लाभ घेता येणार आहे.

या शिबिरात टपाल सेवा, पार्सल सेवा, आंतरराष्ट्रीय टपाल सेवा, पोस्टल लाइफ इन्शुरन्स), ग्रामीण पोस्टल लाइफ इन्शुरन्स, पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक तसेच नागरिक-केंद्रित सेवा याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

पार्सल सेवेद्वारे देशभरात वस्तू पोहोचविण्याची सुविधा, तर आंतरराष्ट्रीय टपाल सेवेद्वारे भारताला जगाशी जोडण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच PLI व RPLI अंतर्गत विमा योजना आणि पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या सुरक्षित बचत योजनांची माहितीही नागरिकांना या शिबिरातून देण्यात येणार आहे.



दि.१७ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत धाराशिव शहरातील विविध गणपती मंडळांमध्ये रात्र शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

गणपती उत्सवाच्या निमित्ताने नागरिकांनी या शिबिरांना भेट देऊन इंडिया पोस्टच्या विविध सेवा व सुविधांची माहिती घ्यावी, असे आवाहन धाराशिव डाक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गणेशोत्सवात सामाजिक बांधीलकीतून ७१ हेल्मेटचे वाटप

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा संदेश देत पोलीस स्टेशन गांधी चौक हद्दीतील श्री शिवछत्रपती गणेश मंडळ, मोती नगर यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

तसेच नागरिकांच्या रस्ते सुरक्षेचा विचार करून मंडळाच्या वतीने ५० हेल्मेटचे वाटप करण्यात आले. याच उपक्रमांतर्गत सुवर्णा सराफ गणेश मंडळ, सराफ लाईन यांच्या वतीनेही २१ हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

पोलीस प्रशासनाच्या वतीने गणेश मंडळांनी उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवावेत तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले होते.



## विविध वृत्त.....

## लातूरमध्ये मोफत कापडी पिशव्यांचे वाटप; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून 'प्लास्टिकमुक्त भारत' अभियानांतर्गत लातूर शहरात पर्यावरण जनजागृतीचा उपक्रम राबविण्यात आला. 'आपले आरोग्य - आपलीच जबाबदारी फाउंडेशन' आणि 'सप्तफेरे मॅट्रिमनी' यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद गेटसमोर नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. प्लास्टिकच्या पिशव्यांचा वाढता वापर पर्यावरणासाठी गंभीर समस्या ठरत आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाची होणारी हानी लक्षात घेता नागरिकांनी दैनंदिन जीवनात प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर टाळून त्याऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

'प्लास्टिकला नकार - कापडी पिशवीचा स्वीकार' या घोषवाक्यासह नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. दयानंद गेट परिसरात खरेदीसाठी येणार्या नागरिकांना मोफत कापडी पिशव्या देण्यात आल्या. नागरिकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कापडी पिशव्या स्वीकारल्या. पर्यावरणाचे संरक्षण ही केवळ शासन किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमास सीआरपीसी ऑफिसर शिरीषकुमार शेरखाने तसेच वीरभद्र तरगुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीत नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

# लातूर जिल्ह्यात श्री ज्येष्ठा गौरींचे पूजन थाटात संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ सप्टेंबर : संपूर्ण लातूर जिल्ह्यात गुरुवारी श्री ज्येष्ठा गौरींचे सोन्याच्या पाऊलांनी आगमन झाले. तर शुक्रवारी सायंकाळी ज्येष्ठा गौरींची मंगल आरती करून त्यांना पंचपक्वानांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. यावेळी घरोघरी महालक्ष्मीकडेभिषण दुष्काळाचे सावट दूर करुन समाधानकारक पावसासाठी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.

यावर्षीचापावसाळा संपत आला तरी अद्याप पर्यंत जिल्ह्यात म्हणावा तेवढा पाऊस झालेला नाही. पावसाअभावी पिके करपून जात असून खरीप हंगाम पुरता हातचा गेल्यात जमा आहे. पर्यावरणाच्या असमतोलामुळे यावर्षी पावसाचे प्रमाण जेमतेम राहील असा अंदाज वर्तवला जात होता. त्यातच जागतिक पातळीवर एल निनोच्याप्रभावानेहीदुष्काळसदृश्य वातावरणाचे संकेत देण्यात आले होते. एकंदरच यावर्षीच्या पावसाळ्याच्याप्रारंभ ापासूनचदुष्काळाची चिन्हे दिसत होती. संभाव्य दुष्काळाच्या सावटाने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आतापासूनच गंभीर होताना दिसतआहे. पाऊसचनसेल तर संपूर्ण बाजारपेठही ठप्प झाल्याचेपोळा दुष्काळाच्या भीषण छायेतसाजरा झाला. पोळा हा सण शेतकरी बांधवांसाठी अत्यंत महत्वाचा असतो. वर्षभर आपल्या शेतात काबाडकष्ट करणाऱ्या बैलांना शेतकरी खांदेमळणीच्या दिवशी न्हाऊ माखू घालून पोळ्यादिवशी पुरणपोळी खायला घाला असतो. पण, यावर्षी दुष्काळाच्या छायेतचहा सण साजरा झाला. पोळ्यानंतर आलेल्या श्री गणरायाचे स्वागत उत्साहात करण्यात आले. पण त्या उत्साहावरहीदुष्काळाची छाया दिसून आली. त्यानंतर श्री महालक्ष्मी अर्थात ज्येष्ठा गौरीचा सण साजरा करण्यात येत आहे. ज्येष्ठा गौरींचासणहीप्रतिवर्षी उत्साहपूर्ण वातावरणात साजराहोतो. यावर्षी दुष्काळामुळे बाजारात आधीच महागाई वाढल्याने खरेदीसाठी गृहिणींवर



मर्यादा आल्याचे दिसून आले. गौरींच्या मुखवट्यासहसजावटीच्या सामग्रीचे दरातही वाढ झाल्याने अनेकांना त्यासाठी हात आखडता घ्यावा लागल्याचे दिसत होते.महालक्ष्मीच्या उत्सवासाठी घरोघर अगदी दिवाळीसारखी तयारी केली जाते. महालक्ष्मीच्या समोर मांडण्यात येणाऱ्या आरासीतसर्व प्रकारची मिष्टाने, मिठाई, आकर्षक खेळणी ठेवण्यात येतात. त्यासाठी गृहिणी अनेक दिवसांपासून पूर्वतयारी करत असतात. गौरींच्या आगमनाच्या पार्श्र्वभूमीवर घरात आकर्षक मखर सजवलेजाते. त्यामध्ये विद्युत रोषणाई करून शोभिवंत केले जाते. भारतीय संस्कृतीतमहालक्ष्मीच्या सणाचे एक आगळे वेगळे वैशिट्यआहे. सर्वच हिंदू परिवारातहा सण अतिशय श्रद्धेने साजरा केला जातो. ग्रामीण भागात तर या सणाचे औचित्य साधून महिला भगिनी एकमेकींच्या घरी जाऊन गौरींचे दर्शन व देखावेपाहण्यासाठी गर्दी करताना आढळून येतात. शहरातहीमागच्या वीस वर्षांपूर्वी हीच प्रथा होती. पण, मागच्या कालखंडात आलेल्या फ्लॅट संस्कृतीमुळे एकमेकींच्या घरी जाऊन गौरी - देखावेपाहण्याचेप्रमाण काहीसे कमी झाले आहे. तरीही अनेक महिला भगिनी एकमेकींना आग्रहाने त्यासाठी निमंत्रित करताना दिसतात. ज्येष्ठा गौरींनाचमहालक्ष्मी म्हणूनहीओळखले -पुजले जाते. महालक्ष्मीसाठी सोळा भाज्यांसह पंचपक्वानांचा प्रसाद तयार केला जातो. पूर्वी सोळा भाज्या स्वतंत्ररित्या केल्या जायच्या. मात्र, आता सगळ्या भाज्या थोड्या थोड्या अशा एकत्रित करूनच शिजवून त्यांचा नैवेद्यात समावेश केला जातो. शुक्रवारी सायंकाळी घरोघरी महालक्ष्मीची मंगला आरती झाल्यानंतर त्यांना पंचपक्वानाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. दुष्काळाचे सावट असल्याने भाज्यांसह फळे, फुले अगदी नैवेद्यासाठी आवश्यक असणाऱ्या केळीच्या पानाच्या किमतीतही भरीव वाढ झाल्याचे दिसून आले. केळीचे पान दहा ते वीस रुपयांना एक याप्रमाणे विकले जात होते. यावरून यावर्षीच्या महागाईची कल्पना येऊ शकते. तरीही महागाईच्या सावटाखाली का असेना पण महालक्ष्मी, ज्येष्ठा गौरीचा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

## राजकरणी आणि पत्रकार एकाच नाण्याच्या दोन बाजू : शिवेंद्रसिंहराजे भोसले

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या 'लातूर भूषण' पुरस्कारांचे शानदार कार्यक्रमात वितरण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : पत्रकारिता ही समाजाचा आरसा असून त्यात सत्याचे प्रतिबिंब उमटणे गरजेचे आहे. अर्धवट अथवा चुकीच्या माहितीच्या आधारे बातम्या देण्यापेक्षा सत्यता पडताळून, सखोल शहानिशा करून तथ्य समाजासमोर मांडावे. खरे तर पत्रकार आणि राजकारणी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे पत्रकारांनी विकासकामांना सकारात्मक दिशा देणारी भूमिका बजावावी, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या जिल्हा शाखा लातूरच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून 'लातूर भूषण' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे तर स्वागताध्यक्ष म्हणून आमदार अभिमन्यू पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, प.पू. श्री विद्यानंद सागर महाराज, जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड, जी. प. मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे आदी उपस्थित होते. समाजसेवा, शिक्षण, प्रशासन, कला-संस्कृती-साहित्य, उद्योग व सहकार, वैद्यकीय सेवा, महिला सक्षमीकरण, पत्रकारिता तसेच अध्यात्म आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या कार्याचा गौरव यावेळी करण्यात आला.यावेळी पालकमंत्री भोसले म्हणाले की, पत्रकार आणि राजकारणी यांचा अंतिम उद्देश समाज हितासाठी काम करणे आणि विकासाला गती देणे हा असतो. त्यामुळे पत्रकारांनी लोकप्रतिनिधींची भूमिका, पार्श्र्वभूमी आणि वस्तुस्थिती समजून घेऊन बातमी मांडावी. एखाद्या व्यक्तीची प्रतिमा केवळ अर्धवट माहितीच्या आधारे मलीन करण्यापेक्षा संपूर्ण वस्तुस्थिती जाणून घेऊन तथ्य समाजासमोर ठेवले, तर पत्रकारितेच्या धर्मालाच खरी प्रतिष्ठा प्राप्त होईल, असे त्यांनी नमूद केले.

स्वागताध्यक्ष आमदार अभिमन्यू पवार यांचा मिश्कील शैलीत उल्लेख करताना पालकमंत्री भोसले यांनी उपस्थितांमध्ये हास्याची लहर निर्माण केली. ते म्हणाले, आपले औशाचे आमदार अभिमन्यू पवार हे महाभारतातले अभिमन्यू नाहीत. ते चक्रव्यूहात अडकणारे नव्हे, तर चक्रव्यूहात अडकवणारे अभिमन्यू आहेत. त्यांच्या आग्रह आणि पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांच्या पाठपुराव्यामुळे आपण या कार्यक्रमाला वेळ देऊ शकलो, असे सांगत भोसले यांनी आमदार पवार यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचे कौतुक केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांनी पुरस्कार वितरणामागील भूमिका स्पष्ट केली. समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देणे आणि पुढील वाटचालीस बळ देणे, हा पुरस्कारामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार समाजप्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. मात्र समाजाला योग्य दिशा देण्यात साधुसंत, महाराज आणि विविध क्षेत्रांतील प्रबोधनकारांचेही मोठे योगदान आहे. त्यामुळे पत्रकारांनी केवळ राजकीय घडामोडींना प्रसिद्धी देण्यापुरते मर्यादित न राहता साधुसंत, महाराज यांच्या विचारांना आणि समाजप्रबोधनाच्या कार्यालाही व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे. त्यांच्या विचारांचा प्रकाश समाजाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवून प्रबोधनाची समृद्ध परंपरा पुढे नेण्याचे काम पत्रकारांनी करावे, असे आवाहन भोकरे यांनी केले. सूत्रसंचालन यु. डी. गायकवाड आणि सुशील सूर्यवंशी यांनी केले तर आभार अशोक हनवते यांनी मानले.

## संत गोपाळ बुवा साखर कारखान्याचे बॉयलर अग्नी प्रदीपन

### शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करणार : चेअरमन कराड

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : ऊस उत्पादक शेतकऱ्याची हित डोळ्यासमोर ठेवून नव्याने उभ्या राहिलेल्या संत श्री गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदिपन दुष्काळी परिस्थिती पाहता १७ सप्टेंबर २०२६ रोजी अत्यंत साध्या पद्धतीने करण्यात आले. येत्या घटस्थापने दिवशी गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात येणार असून शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक केली जाईल अशी ग्वाही कारखान्याचे चेअरमन राजेश कराड यांनी यावेळी दिली.



हक्काचा साखर कारखाना व्हावा हे असंख्य शेतकऱ्यांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरले. लातूर तालुक्यातील मौजे रामेश्र्वर परिसरात दिमाखाने उभा असलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. या साखर कारखान्याचा दुसरा बॉयलर अग्नी प्रदीपन गुरुवार १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता कारखान्याचे प्रवर्तक श्री. तुळशीराम अण्णा कराड, प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड, सौ. कौशल्या कराड, कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, सौ. शुभांगी कराड, रणविर कराड, देव कराड यांच्यासह अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावर्षी पावसाचे अत्यल्प प्रमाण झाल्याने बॉयलर अग्निपदीपन अत्यंत साध्या पद्धतीने करण्यात आला. तत्पूर्वी श्री. बालासाहेबतात्या कराड आणि त्यांच्या सुविद्यपत्नी सौ. आशाताई कराड यांच्या शुभहस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी कारखान्याचे भागधारक, ऊस उत्पादक, शेतकरी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राजेश कराड म्हणाले की, गेल्या वर्षी सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सहकार्याने एक लाख ३५ हजार टन उसाचे गाळप करण्यात आले. आज बॉयलर अग्नी प्रदीपन करण्यात आले. कारखान्याच्या गाळप क्षमते बरोबरच गळीत हंगाम पूर्वतयारी पूर्ण झाली असून येत्या ११ ऑक्टोबर २०२६ घटस्थापने दिवशी या साखर कारखान्याचा प्रत्यक्ष गळीत हंगाम सुरू करण्यात येणार आहे. येणाऱ्या काळातील हंगामात ११ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर दरम्यानच्या ऊसाला ३१५१, एक डिसेंबर ते १५ जानेवारी दरम्यानच्या उसाला प्रति टन ३२५१, आणि १५ जानेवारी नंतर येणाऱ्या ऊसाला ३३५१ रुपयाचा भाव देण्यात येणार आहे. सदरील भाव दोन टप्प्यात असून पहिली उचल २८०० रुपये असेल उर्वरित रक्कम दोन टप्प्यात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल असे बोलून दाखवले.

## पालकमंत्री भोसले यांच्या हस्ते मुख्याध्यापक गणेश राणबा सावळकर यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा, ता. रेणापूर, जि. लातूर येथील मुख्याध्यापक गणेश राणबा सावळकर यांना लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.



यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आ. विक्रम काळे, उपाध्यक्ष दयानंद सुरवशे,शिवकन्या महेंद्र गोडभरले, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड , सीईओ.राहुलकुमार मीना, एसपी. अमोल तांबे, शिक्षणाधिकारी विकास कुकडे,उत्तम माने,इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

गणेश राणबा सावळकर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा येथे मुख्याध्यापक म्हणून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. आदर्श शिक्षक

पुरस्कार मिळाल्याबद्दल मा. आ.ज्ञानराज चौगुले, मा.आ.धर्माजी सोनकवडे, रेणापूर पंचायत समितीचे बीडीओ.सुमित जाधव, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया, समस्त ककय्या महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष निवृत्ती सावळकर, उपक्रमशील शिक्षक जाकिर शेख, चर्मकार समाजाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर,पत्रकार विठ्ठल कटके, ककय्या समाजाचे जिल्हाध्यक्ष श्रीमंत कावळे, पत्रकार अनिल सावळे, पतसंस्थेचे चेअरमन गोपाळ पडिले, संभाजी गुळवे, केंद्रप्रमुख गौतम टाकळीकर, जिल्हाध्यक्ष दिनेश कांबळे, संजय सोनकांबळे , शिरिष शेरखाने,रवी कुरील, बालाजी प्रभाकर कोकणे, दिगंबर खरटमोल, प्रा.महावीर कटके, त्र्यंबक राठोड, बालाजी सावळकर सर, नारायण राठोड, शहर युवक काँग्रेसचे मेघराज सावळकर, राम खरटमोल,आदींनी अभिनंदन केले.

## रितसर नोंदणी दस्तऐवजांद्वारे खरेदी केलेल्या जमिनीवर ताबा मिळविण्यासाठी धमकावणाऱ्यांवर कारवाई करा : विजय मस्के

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ सप्टेंबर : आपण कायदेशीर मार्गाने रितसर दस्तऐवजांद्वारे खरेदी केलेल्या मौजे वरवंटी येथील गट क्रमांक ८५ मधील जमिनीवर अनधिकृतपणे

ताबा मिळविण्यासाठी आपल्याला धमकावणाऱ्यांवर मंडळींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विजय अशोकराव मस्के यांनी शुक्रवारी लातुरात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांनी सदरील जमिनीच्या नोंदणीकृत दस्तऐवजांच्या सत्यप्रतीही प्रसार माध्यमांपुढे सादर करून या प्रकरणी योग्य त्या न्याय निवाड्याची अपेक्षा व्यक्त केली.



लातूरमध्ये प्लॉट, जमिनीवर अनधिकृतरित्या ताबा मिळविण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे सांगून लातूर येथील राजा मणियार आणि त्यांच्या परिवारातील सदस्यांनी अशा प्रकारचे गैरकृत्य करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी माध्यमांसमोर केली होती. मणियार यांच्या मागणीसंदर्भात सत्य कथन करण्यासाठी विजय मस्के, सचिन देशमुख, गोपाळ लवटे यांनी सदरची जमीन रहेमतुल्ला नियमतुल्ला शेख, अजीम नियमतुल्ला शेख, बशीर नियमतुल्ला शेख यांच्याकडून दि. २७ जून २०२६ रोजी नोंदणीकृत दस्त क्रं . ६०९५/ २०२६ अन्वये खरेदी केल्याचे पुरावेच माध्यमांसमोर प्रस्तुत केले. ही जमीन खरेदी केल्याच्या तारखेपासून आपल्याच कब्जात आहे. परंतु अब्दुल गफार अब्दुल रशीद मणियार यांनी ही जमीन खरेदी करण्यास मी इच्छुक असून तुम्ही ती खरेदी करू नका, माझी शेतजमीन लागून असलेल्या गट क्रं . ७७ पाखरसांगवी मध्ये आहे. मला सदरील जमीन घेऊन बार्शी मेनरोडला सलग जमीन करायची आहे, म्हणून ते धमकावत असल्याचा आरोपही विजय मस्के यांनी यांनी यावेळी केला.

या जमिनीची खरेदी केल्याचा राग मनात धरून मणियार यांनी आपल्याला व आपल्या सहकाऱ्यांना त्रास देण्याचा प्रयत्न चालविला आहे. आमच्या विरुद्ध एमआयडीसी पोलिसात खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही बाब आपण एमआयडीसी पोलिसांचाही निदर्शनास आणून दिली असून या जमिनीच्या खरेदीखताचे पुरावेही पोलीस प्रशासनापुढे सादर केले आहेत. आपण अनुसूचित जातीतून आलेलो असल्याने मणियार मला जाणीवपूर्वक त्रास देत आहेत. माझे शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसान करून माझी कब्जे वहिवाटीची जमीन बळकावण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप मस्के यांनी यावेळी केला. आपल्याला नाहक त्रास देणाऱ्या या मंडळींविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी,अशी मागणीही आपण पोलीस प्रशासनाकडे केल्याचे विजय मस्के यांनी सांगितले.

माजी नगरसेवक सचिन मस्के यांनी यावेळी आपले मत व्यक्त करताना या कारणासाठी आपल्या बंधूंनी, विजय मस्के यांनी आठ दिवस पोलिसांकडे चकरा मारल्या होत्या. पण पोलिसांनी त्यांच्याकडे लक्ष न देता दुसऱ्या मंडळींकडून राजकीय दबाव आल्याने आमच्यावरच गुन्हा दाखल केला असे सांगितले. जमीन बळकावण्याचे धंदे याच लोकांचे असून प्रशासनाने आमचीही कागदपत्रे बघावीत व त्यांचीही कागदपत्रे बघावीत असेही त्यांनी सांगितले. पोलीस प्रशासनाने गणेश चतुर्थीच्या बंदोबस्तासाठी आलेला ताफा या कामी आपल्या बंधूंवर अन्याय करण्यासाठी उपयोगात आणल्याचा आरोपही सचिन मस्के यांनी केला.

यावेळी विजय मस्के यांनी या जमिनीच्या खरेदीची कागदपत्रे, जमिनीचा नकाशा, धारण जमिनीची नोंदवही, फेरफार नोंदवहीच्या सत्यप्रतीही माध्यमांसमोर प्रस्तुत केल्या. या सगळ्या कागदपत्रांवरून कोण, कोणाची जमीन बळकावण्याचा प्रयत्न करत आहे, हे आता माध्यमांनीच आपल्याला सांगावे,अशी विनंती केली. यावेळी विष्णुपंत साठे, सचिन देशमुख, जाफर शेख यांचीही उपस्थिती होती.